रामायण

युद्धकाण्ड ६

मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी

२७

मूळ संस्कृत आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-श्रीवाल्मिकी रामायण-

खंड २७- युद्धकाण्ड

मूळ संस्कृत – आद्यकवि वाल्मिकी मुनी

मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

-श्रीवाल्मिकी रामायण – खंड २७

मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

२० ऑक्टोबर २०२६ (विजयाद्शमी)

©esahity Pratishthan®2026

•विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

•आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)

यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त.

लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनीळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी

Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्ह्यायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)



श्रीवाल्मिकी रामायण- यापूर्वीचे खंड वाचण्यासाठी

https://www.esahity.com/230923432381235123 66234023812350.html

-अथ श्रीवाल्मिकी रामायण- २७

युद्धकाण्ड सर्ग ७६

प्रवृत्ते संकुले तस्मिन् घोरे वीरजनक्षये।
अङ्गद: कम्पनं वीरमाससाद् रणोत्सुक:॥१॥
अनेक वीरांचा नाश रणात असता होत ।
रणोत्सुक अङ्गद धावे लढण्या कम्पनाकडे॥१॥
आहूय सोऽङ्गदं कोपात् ताडयामास वेगित:।
गदया कम्पन: पूर्वं स चचाल भृशाहत:॥२॥

बोलुनी अंगदा कोपे कम्पन गदेने करी।
अंगदावरि आघात डळमळे तो त्यामुळे॥२॥
स संज्ञा प्राप्य तेजस्वी चिक्षेप शिखरं गिरे:।
अर्दितश्च प्रहारेण कम्पन: पतितो भुवि॥३॥
सावध होउनि फेकी गिरिशिखरा अंगद।
प्रहारामुळे त्याच्या पडे कम्पन भूवरी ॥३॥
ततस्तु कम्पनं दृष्ट्वा शोणिताक्षो हतं रणे।
रथेनाभ्यपतत् क्षिप्रं तत्राङ्गदमभीतवत्॥४॥

कम्पना मृत पाहून शोणिताक्ष येई पुढे।
रथात बसुनी वेगे चालुनिया अंगदावरी॥४॥
सोड्गदं निशितैर्बाणैस्तदा विव्याध वेगित:।
शरीरदारणैस्तीक्ष्णै: कालग्निसमविग्रहै:॥५॥
कालाग्निसम तेजस्वी तीर तो मारि अंगदा ।
वेगाने जे अंगदाच्या शरीरा फाडण्यास्तव ॥५॥
क्षुरक्षुरप्रनाराचैर्वत्सदन्तै शिलीमुखै:।
कर्णिशल्यविपाठैश्च बहुभिर्निशितै: शरै:॥६॥

अंगदा करती विद्ध टोकदार सुरीसम।
काही अर्धचन्द्राकार तीक्ष्ण बाण सोडूनिया॥६॥
अङ्गद: प्रतिविद्धांगो वालिपुत्र: प्रतापवान्।
धनुरुग्रं रथं बाणान् ममर्द तरसा बली॥७॥
जरी अंगद जखमी वालिपुत्र प्रतापवान्।
शोणिताक्षाचे करी नष्ट रथ बाण धनुष्यही॥७॥
शोणिताक्षस्तत: क्षिप्रमसिचर्म समाददे।
उत्पपात तदा क्रुद्धो वेगवानविचारयन्॥८॥

तलवार ढाल वेगे शोणिताक्ष घेऊनिया।
रागाने अतिवेगाने धावे उताविळ होउनी॥८॥
तम् क्षिप्रतरमाप्लुत्य परामृश्याङ्गदो बली।
करेण तस्य तं खड्गं समाच्छिद्या ननाद च॥९॥
झटक्यात उडी मारुनि शोणिताक्षा अंगद।
पकडुनी हिसकुन त्याची तलवार घेई गर्जुनी॥९॥
तस्यांसफलके खड्गं निजधान ततोऽङ्गदः।
यज्ञोपवीतवच्चैनं चिच्छेद कपिकुञ्जरः॥१०॥

त्याच्याच तलवारीने करुनी वार अङ्गद।
जानव्यासम चिरुनी दोन भाग करीतसे॥१०॥
तं प्रगृह्य महाखड्गं विनद्य च पुन:पुन:।
वालिपुत्रोऽभिदुद्राव रणशीर्षे परापरीन्॥११॥
खड्ग ते घेऊन हाती वालीपुत्र पुन: पुन्हा।
गर्जना करूनी धावे शत्रुसैन्यावरी रणी॥११॥
प्रजङ्घसहितो वीरो यूपाक्षस्तु ततो बली।
रथेनाभिययौ क्रुद्धो वालिपुत्रम् महाबलम्॥१२॥

प्रजङ्घासह त्यानंतर यूपाक्ष महावीर जो।
रथातुनी धावतसे रागाने अंगदावरी ॥१२॥
आयसीं तु गदां गृह्य स वीर कनकाङ्गदः।
शोणिताक्षः समाश्वस्य तमेवानुपपात ह॥१३॥
लोहगदा घेउनि उभा सुवर्णभूषित अङ्गद।
शुद्धित येता त्यावर शोणिताक्ष जाई धावुन्॥१३॥
प्रजङ्घस्तु महावीरो यूपाक्षसहितो बली।
गदयाभिययौ क्रुद्धो वालिपुत्रं महाबलम्॥१४॥

प्रजंघ राक्षस वीर दुसरा यूपाक्षासह ।
गदा घेउनि क्रुद्ध धावे वालिपुत्रावरी॥१४॥
तयोर्मध्ये कपिश्रेष्ठ: शोणिताक्षप्रजङ्घयो:।
विशाखयोर्मध्यगत: पूर्णचन्द्र इवाबभौ॥१५॥
शोणिताक्ष प्रजङ्घांच्या मध्ये वालिपुत्र दिसे।
पूर्णचन्द्र जसा दोन विशाखा नक्षत्रांमधे॥१५॥
अङ्गदं परिरक्षन्तौ मैन्दो द्विविद एव च।
तस्य तस्थतुरभ्याशे परस्परदिदृक्षया ॥१६॥

अंगदा रक्षण्यासाठी मैन्द द्विविद धावती।
युद्ध करण्या आतुर ते जाती राक्षसांपुढे॥१६॥
अभिपेतुर्महाकाया: प्रतियत्ता महाबला:।
राक्षसा वानरान् रोषादसिबाणगदाधरा:॥१७॥
महाकाय महाबली राक्षस गदा बाण ।
तलवारीसह क्रोधे धावती वानरांवरी॥१७॥
त्रयाणां वानरेन्द्राणां त्रिभी राक्षसपुङ्गवै:।
संसक्तानां महद् युद्धमभवद् रोमहर्षणम्॥१८॥

तीन वानरयोद्धे तीन राक्षसयोद्ध्यांसवे।
युद्ध रोमहर्षक मोठे घनघोर जाहले सुरु॥१८॥
ते तु वृक्षान् समादाय सम्प्रचिक्षिपुराहवे।
खड्गेन प्रतिचिक्षेप तान् प्रजङ्घो महाबल:॥१९॥
फेकती वानरवीर उपटूनी वृक्ष महा।
टाकी तोडुनि ती खड्गे प्रजंघ महाबळी॥१९॥
रथानश्वान् द्रुमाञ्छैलान् प्रतिचिक्षिपुराहवे।
शरौघै: प्रतिचिच्छेद तान् यूपाक्षो महाबल:॥२०॥

रथ घोडे महावृक्ष वानरे उचलुनि फेकता।
मध्येच् गदेने तोडी यूपाक्ष महाबळी॥२०॥
सृष्टान् द्विविदमैन्दाभ्यां द्रुमानुत्पाट्य वीर्यवान्।
बभञ्ज गदया मध्ये शोणिताक्षः प्रतापवान्॥२१॥
द्विविद मैन्द वीर झाडे उपटुनि फेकती।
गदेने मध्येच तोडी शोणिताक्ष प्रतापवान्॥२१॥
उद्यम्य विपुलं खड्गं परमर्मविदारणम् ।
प्रजङ्घो वालिपुत्राय अभिदुद्राव वेगितः॥२२॥

उचलुनी महाखड्ग मर्मभेदी भयानक।
प्रजंघ धाउनि जाई मारण्या अंगदावर॥२२॥
तमभ्याशगतं दृष्ट्वा वानरेन्द्रो महाबल:।
आजघानाश्वकर्णेन द्रुमेणातिबलस्तदा॥२३॥
पाहुनी त्यास येताना वानरेन्द्र महाबळी।
उपटुनी अश्वकर्ण वृक्ष मारी फेकुनिया॥२३॥
बाहुं चास्य सनिस्त्रिंशमाजघान स मुष्टिना।
वालिपुत्रस्य घातेन स पपात क्षितावसि:॥२४॥

तलवारीसह हात मुष्टिप्रहारे अंगद।
उडवी त्यामुळे आघाते पडे तो भूमीवरी॥२४॥
तं दृष्ट्वा पतितं भूमौ खड्गं मुसलसंनिभम्।
मुष्टिं संवर्तयामास वज्रकल्पं महाबल:॥२५॥
त्यास पडता भूवरी खडगासह पाहुनी ।
वज्रकल्प वज्रासम आपली मूठ आवळी॥२५॥
स ललाटे महावीर्यमड्गदं वानरर्षभम्।
आजघान महातेजा: स मुहूर्तं चचाल ह॥२६॥

भालावरि अंगदाच्या जोराने मुष्टिप्रहार।
शोणिताक्षे करता येतसे त्यास भोवळ॥२६॥
स संज्ञा प्राप्य तेजस्वी वालिपुत्र प्रतापवान्।
प्रजङ्घस्य शिर: कायात् पातयामास मुष्टिना॥२७॥
परि येई शुद्धीवर वालिपुत्र प्रतापवान्।
आणि उडवी प्रजंघशिर मुष्टिप्रहारे तेधवा॥२७॥
स यूपाक्षोऽश्रुपूर्णाक्ष: पितृव्ये निहते रणे।
अवरुह्य रथात् क्षिप्रं क्षीणेषु खडगनाददे॥२८॥

पित्यास मृत पाहूनी अश्रुपूर्ण यूपाक्ष तो।
रथातुन उतरुनी तत्काळ खड्ग घेतसे॥२८॥
तमापतन्तं सम्प्रेक्ष्य यूपाक्षं द्विविदस्त्वरन्।
आजघानोरसि कृद्धो जग्राह च बलाद् बली॥२९॥
पाहुनी यूपाक्षा येता द्विवद करतसे त्वरा।
रागाने करि प्रहार छातीवर पकडुनी तया॥२९॥
गृहीतं भ्रातरं दृष्ट्वा शोणिताक्षो महाबल:।
आजघान महातेजा वक्षसि द्विविदं तत:॥३०॥

पकडले बन्धूस हे पाहुनी शोणिताक्ष।
येत करी रागाने द्विविद वक्षी प्रहार तो॥३०॥
स ततोऽभिहतस्तेन चचाल च महाबल:।
उद्यतां च पुनस्तस्य जहार द्विविदो गदाम्॥३१॥
प्रहारे डगमगला द्विविद परि सावरी।
उठुनि हिसकावुनि घेई त्याच्या हातुनि गदा॥३१॥
एतस्मिन्नन्तरे मैन्दो द्विविदाभ्याशमागमत्।
यूपाक्षं ताडयामास तलेनोरसि वीर्यवान्॥३२॥

तेवढ्यात येई मैन्द द्विविधाच्या मदतिला।
तळहाते करी प्रहार जोराने यूपाक्षावरी॥३२॥
तौ शोणिताक्षयूपाक्षौ प्लवङ्गाभ्यां तरस्विनौ।
चक्रतु: समरे तीव्रमाकर्षोत्पाटनं भृशम्॥३३॥
यूपाक्ष शोणिताक्ष आणि द्विविद मैन्द हे।
ओढती एकमेका करती झटापटही तशी॥३३॥
द्विविद: शोणिताक्षं तु विददारनखैर्मुखे।
निष्पिपेष स वीर्येण क्षितावाविध्य वीर्यवान्॥३४॥

फाडले शोणिताक्षमुख द्विदाने पराक्रमी।
आपटुनी भूमीवरती त्यास मारुनि टाकले॥३४॥
यूपाक्षमभिसंक्रुद्धो मैन्दो वानरपुङ्गवः।
पीडयामास बाहुभ्यां पपात स हतः क्षितौ॥३५॥
मैन्द वानरवीर रागाने यूपाक्षावरि धावला।
दाबला त्यास बाहूंनी आणि मारुनि टाकला॥३५॥
हतप्रवीरा व्यथिता राक्षसेन्द्रचमूस्तथा।
जगामाभिमुखी सा तु कुम्भकर्णात्मजो यतः॥३६॥

मुख्य वीर हत ऐसे पाहुनी रावणसैन्य ते।
पळू लागुनि जाती कुम्भकर्ण पुत्र जिथे॥३६॥
आपतन्तीं च वेगेन कुम्भस्तां सान्त्वयच्चमूम् ।
अथोत्कृष्टं महावीर्यैर्लब्धलक्षैः प्लवङ्गमैः॥३७॥
पाहुनि स्वसेना येता कुम्भ सान्वन देइ त्यां।
महापराक्रमी वानर करती हर्षे गर्जना॥३७॥
निपातितमहावीरां दृष्ट्वा रक्षश्चमूं तदा।
कुम्भः प्रचक्रे तेजस्वी रणे कर्म सुदुष्करम् ॥३८॥

राक्षसांचे महावीर रणी पडता पाहुनी।
कुम्भ तेजस्वी करी पराक्रम कर्म दुष्कर॥३८॥
स धनुर्धन्विनां श्रेष्ठः प्रगृह्य सुसमाहितः।
मुमोचाशीविषप्रख्याण्छरान् देहविदारणान् ॥३९॥
कुम्भ श्रेष्ठ धनुर्धारी एकाग्र सावध होउनी।
सर्पासम तीक्ष्ण बाण सोडी जे देहा फाडती ॥३९॥
तस्य तच्छुशुभे भूयः सशरं धनुरुत्तमम्।
विद्युदैरावतार्चिष्मद् द्विती येन्द्र्धनुर्यथा॥४०॥

बाणासहित धनुष्य त्याचे शोभते जसे।
ऐरावत तेज वीज युक्त इन्द्रधनू जणु॥४०॥
आकर्णकृष्टमुक्तेन जघान द्विविदं तदा।
तेन हाटकपुङ्खे पत्रिणा पत्रवाससा ॥४१॥
आकर्ण ओढुन धनु बाणाने सुवर्णपंखी। ।
कुम्भ मारी पत्रवेषी द्विविद वानरवीरा ॥४१॥
सहसाभिहतस्तेन विप्रमुक्तपदः स्फुरन्।
निपपात त्रिकूटाभो विह्वलन् प्लवगोत्तमः॥४२॥

प्रहारे बाणाच्या लागे वानरश्रेष्ठ तडफडू।
त्रिकूट पर्वताएवढा तो विह्वल पडे भूवरी॥४२॥
मैन्दस्तु भ्रातरं तत्र भग्नं दृष्ट्वा महाहवे।
अभिदुद्राव वेगेन प्रगृह्य विपुलां शिलाम्॥४३॥
पाहुनी बन्धुला जखमी मैन्द कोपित होतसे।
मोठी शिळा घेउनि तो घेई धाव कुम्भाकडे॥४३॥
तांशिलां तु प्रचिक्षेप राक्षसाय महाबल:।
बिभेद तां शिलं कुम्भ: प्रसन्नै: पञ्चभि: शरै:॥४४॥

मैन्दाने फेकलेली ती मोठी शिला कुम्भावरी।
करुनी टाकी तुकडे तो बाणांनी पांच प्रसन्न ॥४४॥
संधाय चान्यं सुमुखं शरमाशीविषोपमम्।
आजघान महातेजा वक्षसि द्विविदाग्रजम्॥४५॥
विषारी सर्पासम दुसरा सुन्दर बाण सोडुनी।
कुम्भ महातेजस्वी मैन्दाच्या छातीत मारला॥४५॥
स तु तेन प्रहारेण मैन्दो वानरयूथप:।
मर्मण्यभिहतस्तेन पपात भुवि मूर्च्छित:॥४६॥

प्रहारे त्या बाणाच्या त्याच्या मर्मी लागता।
मुर्च्छित होउनी पडे मैन्द वानर भूवरी॥४६॥
अङ्गदो मातुलौ दृष्ट्वा मथितौ तु महाबलौ।
अभिदुद्राव वेगेन कुम्भमुद्यतकार्मुकम्॥४७॥
पाहुनी मातुलां दोघां मूर्च्छित होत महाबली।
अङ्गद धावला वेगे धनुर्धारी कुम्भाकडे॥४७॥
तमापतन्तं विव्याध कुम्भः पञ्चभिरायसैः।
त्रिभिश्चान्यै शितैर्बाणैर्मातंगमिव तोमरैः।

सोड्गदं बहुभिर्बाणै: कुम्भो विव्याध वीर्यवान्॥४८॥

त्यास येणाऱ्या पाहुनी कुम्भ सोडी पांच शर।

आणखी तसेच तीन जसे तोमर गजावरी।

कुम्भ ऐसा करी विद्ध अड्गदा बाणांनी बहु॥४८॥

अकुण्ठधारैर्निशितैस्तीक्ष्णै: कनकभूषणै:।

अड्गद: प्रतिविद्धाड्गो वालिपुत्रो न कम्पते॥४९॥

अकुण्ठित धार ज्यांची तीरे सुवर्णभूषित।

विद्ध वालीपुत्र नसे त्यामुळे कम्प पावत ॥४९॥

शिलापादपवर्षाणि तस्य मूर्ध्नि ववर्ष ह।
स प्रचिच्छेद तान् सर्वान् बिभेद च पुनः शिलाः॥५०॥
शिळा वृक्षांचा मारा करी अंगद कुम्भावरी।
परी वृक्षांस कापूनी शिळा तोडुनि टाकि तो॥५०॥
कुम्भकर्णात्मजः श्रीमान् वालिपुत्रसमीरितान्।
आपतन्तं च समीक्ष्य कुम्भो वानरयूथपम्॥५१॥
भ्रुवौ विव्याध बाणाभ्यामुल्काभ्यामिव कुञ्जरम्।
तस्य सुस्राव रुधिरं पिहिते चास्य लोचने॥५२॥

पुत्र तो कुम्भकर्णाचा वालिपुत्रास पाहुनी।
येताना पाहता सोडी बाण भुवयांच्या मध्ये॥५१॥
मशाल हतीवरी जैसी त्याच्या वाहे त्यामुळे ।
रक्त नेत्रातुनी वाहे दिसेनासे होई तया॥५२॥
अङ्गद: पाणिनां नेत्रे पिधाय रुधिरोक्षिते।
सालमासन्नमेकेन परिजग्राह पाणिना॥५३॥
नेत्र रक्ते भरलेले हाताने पुसुनी एका।
पकडे सालवृक्षास हस्ते दुसऱ्या अङ्गद॥५३॥

सम्पीड्योरसि सस्कन्धं करेणाभिनिवेश्य च।
किंचिदभ्यवनम्यैनमुन्ममाथ महारणे॥५४॥
दाबुनि छातीवरी वृक्षा पकडुनि तो वाकवी।
आणि उपटुनि काढी मुळासह वृक्षास् तो॥५४॥
तमिन्द्रकेतुप्रतिमं वृक्षं मन्दरसंनिभम्।
समुत्सृजत वेगेन मिषतां सर्वरक्षसाम्॥५५॥
इन्द्रध्वजसम उंच विशाल् मन्दरासम।
कुम्भावरि फेकुनि मारी अङ्गद राक्षसांपुढे॥५५॥

स चिच्छेद शितैर्बाणैः सप्तभिः कायभेदनैः।
अङ्गदो विव्यथेऽभीक्ष्णं स पपात् मुमोह च॥५६॥
परि सप्त शरीरभेदी बाणाने कुम्भ छेदि ते।
आणि जखमी अङ्गद पडे मूर्च्छित भूवरी॥५६॥
अङ्गद पतितं दृष्ट्वा सीदनतमिव सागरे।
दुरासदं हरिश्रेष्ठा राघवाय न्यवेदयन्॥५७॥
अंगदा पडता पाहुनी जसे जहाज सागरी।
सांगती वानरवीर अजिंक्य श्रीरामा जाउनी॥५७॥

रामस्तु व्यथितं श्रुत्वा वालिपुत्रं महाहवे।
व्यादिदेश हरिश्रेष्ठाञ्जाम्बवत्प्रमुखांस्तत:॥५८॥
ऐकोनि व्यथित राम रणी जखमी अङ्गद।
देई आदेश वानरां जाम्बुवन्तप्रमुख ज्यां॥५८॥
ते तु वानरशार्दूला: श्रुत्वा रामस्य शासनम्।
अभिपेतु: सुसंक्रुद्धा: कुम्भमुद्यतकार्मुकाम्॥५९॥
ऐकुनी रामाची आज्ञा क्रुद्ध वानरश्रेष्ठ ते।
धनुष्य उगारलेल्या कुम्भावर जाति धावुनि॥५९॥

ततो द्रुमशिलाहस्ता: कोपसंरक्तलोचना।
रिरक्षिषन्तोऽभ्यपतन्नङ्गदं वानरर्षभा:॥६०॥
घेउनि हाती शिला वृक्ष रागाने लाल हो उनी।
कुम्भावर तुटुनी पडती अंगदरक्षणास्तव॥६०॥
जाम्बवांश्च सुषेणश्च वेगदर्शी च वानर:।
कुम्भकर्णात्मजं वीरं क्रुद्धा: समभिदुद्रुवु:॥६१॥
जाम्बवान् वेगदर्शी सुषेण हे वानरत्रय।
क्रुद्ध धावुनिया जाती कुम्भकर्णपुत्रावरी॥६१॥

समीक्ष्यापततस्तास्तु वानरेन्द्रान् महाबलान्।
आववार शरौघेन नगेनेव जलाशयम्॥६३॥
पाहुनि येता कुम्भ त्यां वानरांना महाबली।
अडवी बाणवर्षावे जसा पर्वत जलाशया॥६२॥
तस्य बाणपथं प्राप्य न शेकुरपि वीक्षितुम्।
वानरेन्द्रा महात्मानो वेलामिव महोदधि:॥६३॥
बाणाच्या टप्प्यात त्याच्या येता पाहु न शकति ते।
वानरश्रेष्ठ थाम्बति जसा समुद्र किनाऱ्या आपल्या॥६३॥

तांस्तु दृष्ट्वा हरिगणान् शरवृष्टिभिरर्दितान्।
अङ्गदं पृष्ठत: कृत्वा भ्रातृजं प्लवगेश्वर:॥६४॥
पाहुनी वानरगणां कुंठित शरवर्षावामुळे।
अंगदा भ्रातृजास्तव पुढती येई सुग्रीव॥६४॥
अभिदुद्राव सुग्रीव: कुम्भकर्णात्मजं रणे।
शैलसानुचरं नागं वेगवानिव केसरी॥६५॥
चालुनि जाइ सुग्रीव कुम्भावर रणामध्ये।
जसा हत्तीवरी सिंह पर्वतशिखरावरी ॥६५॥

उत्पाट्य च महावृक्षानश्वकर्णादिकान् बहून्।
अन्यांश्च विविधान् वृक्षांश्चिक्षेप स महाकपि:॥६६॥
उपटुनी महावृक्ष अश्वकर्णादिकासम।
कुम्भावरी आणखीही काही फेकुनि मारि तो॥६६॥
तां छान्दयन्तीमाकाशं वृक्षवृष्टिं दुरासदाम्।
कुम्भकर्णात्मज: श्रीमांश्चिच्छेद स्वशरै: शितै:॥६७॥
नभा झाकुनि टाके जी वृक्षवृष्टि दुरासद।
कुम्भ आपल्या बाणांनी कापुनि टाकीत ती॥६७॥

अभिलक्ष्येण तीव्रेण कुम्भेन निशितै: शरै:।
आचितास्ते द्रुमा रेजुर्यथा घोरा: शतघ्नय:।
द्रुमवर्षं तु तद् भिन्नं दृष्ट्वा कुम्भेन वीर्यवान्॥६८॥
अभिलक्ष्येण तीव्रेण कुम्भेन निशितै: शरै:।
वानराधिपति: श्रीमान् महासत्त्वो न विव्यथे।
स विध्यमान: सहसा सहमानस्तु ताञ्छरान् ॥६९॥
कुम्भस्य धनुराक्षिप्य बभञ्जेन्द्रधनु:प्रभम्।
अवप्लुत्य तत: शीघ्रं कृत्वा कर्म सुदुष्करम्॥७०॥

तीव्रलक्ष्यी कुम्भ सर्व वृक्ष बाणांनी टोचुनी।
करी नष्ट शोभती ते शतघ्नि शस्त्रापरी ।
छिन्न वृक्षवर्षाव कुम्भे केलेला तो पाहुनी॥६८॥
न घाबरे किंचितही वानाराधिप सुग्रिव।
राही सहन करीत वर्षाव बाणाचा तदा॥६९॥
हिसकावुनि तो घेई कुम्भाचे इन्द्रधनूसम।
धनुष्य टाके मोडुनी कठीण कर्म करुनीया॥७०॥
अब्रवीत् कुपित: कुम्भं भग्नशृङ्गमिव द्विपम्।

निकुम्भाग्रज वीर्यं ते बाणवेगं तदद्भुतम्॥७१॥
गजासम दन्तहीन सुग्रीव कोपित वदे।
कुम्भा तू अससी वीर शरवेग अद्भुत तुझा॥७१॥
संनतिश्च प्रभावश्च तव वा रावणस्य वा।
प्रह्लादबलिवृत्रघ्नकुबेरवरुणोपम॥७२॥
प्रभाव तव् नम्रपणा रावणाचाही त्यासवे।
प्रह्लाद बलि वृत्रघ्न कुबेर वरुणासम्॥७२॥
एकस्त्वमनुजातोऽसि पितरं बलवत्तरम्।

त्वामेवैकं महाबाहुं शूलहस्तमरिंदमम्॥७३॥

अससी एकटा तू बलवान पित्याहूनही।

महाबाहु शत्रुसंहारी शूल हाती असे जया॥७३॥

त्रिदशा नातिवर्तन्ते जितेन्द्रियमिवाधय:।

विक्रमस्व महाबुद्धे कर्माणि मम पश्य च॥७४॥

स्पर्श न करी रोग जितेन्द्रिय मानवा जसा।

तसे न करू शकती देवही तुजला स्पर्श।

पहा विक्रमी वीरा पराक्रम आता मम॥७४॥

वरदानात् पितृव्यस्ते सहते देवदानवान् ।
कुम्भकर्णस्तु वीर्येण सहते च सुरासुरान्॥७५॥
चुलता रावण वरदाने जिंकी देवदानवा।
कुम्भकर्णही शौर्याने जिंकीतसे सुरासुरां॥७५॥
धनुषीन्द्रजितस्तुल्य: प्रतापे रावणस्य च।
त्वमद्य रक्षसां लोके श्रेष्ठोऽसि बलवीर्यत:॥७६॥
धनुष्यी इन्द्रजितासम प्रतापी रावणासम।
अससी राक्षसलोकी बलवीर्ये श्रेष्ठ आज तू॥७६॥

महाविमर्दं समरे मया सह तवाद्भुतम्।
अद्य भूतानि पश्यन्तु शक्रशम्बरयोरिव॥७७॥
तुझ्यासह महायुद्ध प्राणीमात्रांस पाहुदे।
जसे पूर्वी इन्द्र आणि शम्बरासुरात जाहले॥७७॥
कृतमप्रतिमं कर्म दर्शितं चास्त्रकौशलम्।
पतिता हरिवीराश्च त्वयैते भीमविक्रमा:॥७८॥
केलेस अपूर्व कर्म अस्त्रकौशल्या दावसी।
अनेक तू मारिलेस वानर भीमपराक्रमे ॥७८॥

उपालम्भभयाच्चैव नासि वीर मया हत:।
कृतकर्मपरिश्रान्तो विश्रान्त: पश्य मे बलम्॥७९॥
लोकांनी निंदू नये म्हणुनी तुजला नच मारतो ॥
श्रांत तू घे विश्रान्ती मग पाही माझे बळ्॥७९॥
तेन सुग्रीववाक्येन सावमानेन मानित:।
अग्नेराज्यहुतस्येव तेजस्तस्याभ्यवर्धत्॥८० ॥
तदा सुग्रीववाक्य अपमानास्पद वाटुनी।
वाढे अग्नि घृते जैसा कुम्भाचे तेज वाढले॥८०॥

ततः कुम्भस्तु सुग्रीवं बाहुभ्यां जगृहे तदा।
गजाविवातीतमदौ निःश्वसन्तौ मुहुर्मुहुः॥८१॥
आणि कुम्भ पकडे सुग्रीवा स्वबाहूंमध्ये।
मदोन्मत हत्तीसम श्वास मोठा टाकती॥८१॥
अन्योन्यगात्रग्रथितौ घर्षन्तावितरेतरम्।
सधूमां मुखतो ज्वालां विसृजन्तौ परिश्रमात्॥८२॥
गुन्तलेले शरीरात एकमेकांस घासती।
धुरासह मुखातुनि ज्वाला निघती परिश्रमे॥८२॥

तयो: पादाभिघाताच्च निमग्ना चाभवन्मही।
व्याघूर्णिततरङ्गश्च चेक्षुभे वरुणालय:॥८३॥
पदाघाते त्या दोघांच्या पृथ्वी खचू लागली।
वरुणालय क्षुब्ध होई तरंग घुसळोनिया॥८३॥
तत: कुम्भं समुत्क्षिप्य सुग्रीवो लवणाम्भसि।
पातयामास वेगेन दर्शयन्नुदधेस्तलम्॥८४॥
नंतर सुग्रीव कुम्भास उचलुनी देत फेकुनी।
खाऱ्या पाण्यात वेगे दाखवुनी सागरतळ॥८४॥

ततः कुम्भनिपातेन जलराशिः समुत्थितः।
विन्ध्यमन्दरसंकाशो विससर्प समन्ततः॥८५॥

नन्तर पडता कुम्भ जलराशि उसळे उंच।
मन्दर पर्वतासारखा आणि पसरे सर्वत्र॥८५॥

ततः कुम्भः समुत्पत्य सुग्रीवमभिपात्य च।
आजघानोरसि क्रुद्धो वज्रकल्पेन मुष्टिना॥८६॥

ननतर् क्रोधित कुम्भ उडूनी सुग्रीवावरी।
झेपावत छातीवरी प्रहार वज्रमुष्टिने करी॥८६॥

तस्य वर्म च पुस्फोट संजज्ञे चापि शोणितम्।
तस्य मुष्टिर्महावेग: प्रतिजघ्नेऽस्थिमण्डले॥८७॥
प्रहारे त्या चिलखत सुग्रीवाचे फुटूनिया।
रक्त वाहे परी त्याची मूठ हाडांवरि आदळे॥८७॥
तस्य वेगेन तत्रासीत् तेज: प्रज्वलितं महत्।
वज्रनिष्पेषसंजाता ज्वाला मेरोर्यथा गिरे:॥८८॥
वेगामुळे मोठे तेज प्रज्वलित त्या जाहले।
जशी ज्वाला उत्पन्न वज्र आपटता मेरूवरि॥८८॥

स तत्राभिहतस्तेन सुग्रीवो वानरर्षभः।
मुष्टिं संवर्तयामास वज्रकल्पं महाबलः॥८९॥
प्रहार् कुम्भाकडुनी झालेल्या त्या महाबली।
सुग्रीवे कठोर मूठ आवळली वज्रासम ॥८९॥
अर्चिः सहस्रविकचरविमण्डलवर्चसम्।
स मुष्टिं पातयामास कुम्भस्योरसि वीर्यवान् ॥९०॥
प्रकाशणाऱ्या सहस्र ज्वालांनी सूर्यमंडलासम।
तेजस्वी मूठ कुम्भाच्या छातीवर मारि तो॥९०॥

स तु तेन प्रहारेण विह्वलो भृशपीडित:।
निपपात तदा कुम्भो गतार्चिरिव पावक:॥९१॥
प्रहारे त्या पीडित कुम्भ अत्यंत व्याकुळ।
ज्वाला विझलेल्या अग्नीसम पडे भूमीवरी॥९१॥
मुष्टिनाभिहतस्तेन निपपाताशु राक्षस:।
लोहिताङ्ग इवाकाशाद् दीप्तरश्मिर्यदृच्छया॥९२॥
राक्षस तत्काल पडे खाली त्या प्रहारे जसा।
मंगळ ग्रह तेजस्वी अचानक खाली पडे॥९२॥

कुम्भस्य पततो रूपं भग्नस्योरसि मुष्टिना।
बभौ रुद्राभिपन्नस्य यथा रूपं गवां पते:॥९३॥

मुष्टिने भग्न कुम्भाचे रूप वृषभासम।
रुद्रप्रहारे पडलेल्या वृषभापरि शोभले॥९३॥

तस्मिन् हते भीमपराक्रमेण प्लवंगमानामृषभेण युद्धे।
महीं सशैला सवना चचाल भयं च रक्षांस्यधिकं विवेश॥९४॥

युद्धात वानरश्रेष्ठाकडुनी तो मारला जाता पर्वत वनासहित ।
कांपे थरथरा पृथ्वी आणि अधिक होती भयभीत सर्व राक्षस॥९४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे षटसप्ततितम: सर्ग:॥७६॥

युद्धकाण्ड सर्ग ७७

निकुम्भो भ्रातरं दृष्ट्वा सुग्रीवेण निपातितम्।
प्रदहन्निव कोपेन वानरेन्द्रमुदैक्षत॥१॥
बन्धु कुम्भास सुग्रीवे मारिले पाहूनिया ।
निकुम्भ येइ कोपाने पाहि वानरेन्द्राकडे॥१॥
ततः स्रग्दामसंनद्धं दत्तपञ्चाङ्गुलं शुभम्।
आददे परिघं धीरो महेन्द्रशिखरोपमम्॥२॥

हेमपत्तपरिक्षितं वज्तविद्रुमभूषितम्।
यमदण्डोपमं भीमं रक्षसा भयनाशनम्॥३॥
मग वीर निकुम्भाने परिघ मोठा उचलला।
अलंकृत पुष्पमाले अङ्गुलिठसे ज्यावर्।
महेन्द्र शिखरासम सुवर्णपट्टे ज्यावरी।
हिरे पोवळे शोभित घोर यमद्डासम॥२-३॥
तमाविध्य महातेजा: शक्रध्वजसमौजसम्।
निननाद विवृत्तास्यो निकुम्भो भीमविक्रम:॥४॥

इन्द्रध्वजासम तेजस्वी त्या हाति घेउनी।
निकुम्भ आरोळ्या ठोकी स्वमुख विस्फारुनी॥४॥
उरागतेन निष्केण भुजस्थैरङ्गदैरपि।
कुण्डलाभ्यां च चित्राभ्यां मालया च सचित्रया॥५॥
छातिवर सुन्दर् हार बाजुबन्द भुजांवर।
कुण्डले सुन्दर कानी गळ्यात माळाही तश्या॥५॥
निकुम्भो भूषणैर्भाति तेन स्म परिघेण च।
यथेन्द्रधनुषां मेघः सविद्युत्स्तनयित्नुमान्॥६॥

भूषणे निकुम्भ शोभे हाती परिघ घेउनी ।
मेघापरी इन्द्रधनू वीज गडगडाटासह॥६॥
परिघाग्रेण पुस्फोट वातग्रन्थिर्महात्मन:।
प्रजज्वाल सघोषश्च विधूम इव पावक:॥७॥
फोडुता परिघाग्राने तेधवा वात भोवरा ।
जळे महाध्वनीसह जणु अग्नि धुराविना॥७॥
नगर्या विटपावत्या गन्धर्वभवनोत्तमै:।
सतारागननक्षत्रं सचन्द्रसमहाग्रहम्।

निकुम्भपरिघाघूर्णं भ्रमतीव नभस्थलम्॥८॥

फिरविता निकुम्भाने परिघ ऐसे भासते।

फिरे आकाश जणु तारागण नक्षत्रासह।

लंकेतील घरे बागा गन्धर्वभवने तशी ॥८॥

दुरासदश्च संजज्ञे परिघाभरणप्रभ:।

क्रोधेन्धनो निकुम्भाग्निर्युगान्तारिवोत्थित:॥९॥

निकुम्भ क्रोधाग्निसह पेटे प्रलयाग्नीसम।

परिघ आभरण तेजे कठिण जवळी जावया॥९॥

राक्षसा वानराश्चापि न शेकु: स्पन्दितुं भयात्।
हनुमांस्तु विवृत्योरस्तस्थौ प्रमुखतो बली॥१०॥
न राक्षसां वानरांही भयाने शक्य हालणे ।
बलवान हनुमान मात्र छाती काढुनि उभा॥१०॥
परिघोत्तमबाहुस्तु परिघं भास्करप्रभम्।
बली बलवतस्तस्य पातयामास वक्षसि॥११॥
स्थिरे तस्योरसि व्यूढे परिघ: शतधा कृत:।
विकीर्यमाण: सहसा उल्काशतमिवाम्बरे॥१२॥

परिघासम बाहु ज्याचे हनूमान् उचलुनी।
परिघा भास्करसम निकुम्भवक्षी आदळे॥११॥
अभेद्य छातीवरी त्याच्या परिघ शतखण्डित।
तुकडे विखुरती जैशा शत उल्का नभातुनी॥१२॥
स तु तेन प्रहारेण न चचाल महाकपि:।
परिघेण समाधूतो यथा भूमिचलेऽचल:॥१३॥
परिघाच्या प्रहाराने न हाले महाकपि।
जसा पर्वत भूकम्पे राहतसे स्थिर उभा॥१३॥

स तथाभिहतस्तेन हनूमान् प्लवगोत्तमः।
मुष्टिं संवर्तयामास बलेनातिमहाबलः॥१४॥
ऐसे मारता त्याने हनूमान् प्लवगोत्तम।
आवळी आपुली मुष्टि जोराने तो महाबली॥१४॥
तमुद्यम्य महातेजा निकुम्भोरसि वीर्यवान्।
अधिचिक्षेप वेगेन वेगवान् वायुविक्रमः॥१५॥
वायूसम पराक्रमी महातेजस्वी मारुती।
वेगाने मूठ आदळी निकुम्भाच्या छातिवरी॥१५॥

तत्र पुस्फोट वर्मास्य प्रसुस्राव च शोणितम्।
मुष्टिना तेन संजज्ञे मेघे विद्युदिवोत्थिता॥१६॥
मूठ छातीवरी चमके जशी वीज नभातुनी।
चिलखत फुटे त्याने रकत वाहू लागे तदा॥१६॥
स तु तेनप्रहारेण निकुम्भो विचचाल च।
स्वस्थश्चापि निजग्राह हनूमन्तं महाबलम्॥१७॥
त्याच्या प्रहाराने डळमळे निकुम्भ जरी।
तरी सावरूनि पकडे हनुम्न्ता महाबलि॥१७॥

चुक्रुशुश्च तदा संख्ये भीमं लङ्कानिवासिन:।
निकुम्भेनोद्यतं दृष्ट्वा हनूमन्तं महाबलम्॥१८॥
उचली निकुम्भ रणी हनूमन्तास पाहुनी।
गर्जना करती सर्व राक्षस लंकानिवासि ते॥१८॥
स तथा ह्रियमाणोऽपि हनूमांस्तेन रक्षसा।
आजघानानिलसुतो वज्रकल्पेन मुष्टिना॥१९॥
राक्षसे उचललेल्या हनुमानाने यापरी।
वज्रमुष्टि आघात करी राक्षसावरी॥१९॥

आत्मानं मोक्षयित्वाथ क्षितावभ्यवपद्यत।
हनूमानुन्ममाथाशु निकुम्भं मारुतात्मज:॥२०॥
सोडवुनिया स्वत;ला त्याच्या पकडीतुनी।
पाडुनि खाली त्याला मन्थन त्याचे करी॥२०॥
निक्षिप्य परमायत्तो निकुम्भं निष्पिपेष च।
उत्पत्य चास्य वेगेन पपातोरसि वेगवान्॥२१॥
निकुम्भा पूर्ण शक्तीने आपटूनी भूमीवरी।
उडी मारुनि वेगाने त्याच्या छातीवरि बैसला॥२१॥

परिगृह्य च बाहुभ्यां परिवृत्य शिरोधराम्।
उत्पाटयामास शिरो भैरवं नदतो महत्॥२२॥
बाहूत पकडुनि मान महाभैरव गर्जना।
करीत मस्तक त्याचे काढी तो उपटुनी॥२२॥
अथ निनदति सादिते निकुम्भे पवनसुतेन रणे बभूव युद्धम्।
दशरथसुतराक्षसेन्द्रसून्वोर्भृशतरमागतरोषयो: सुभीमम्॥२३॥
ऐसे युद्धात निकुम्भा हनुमाने मारता होइ गर्जना तदा।
नन्तर युद्ध सुरू भयंकर दशरथपुत्र श्रीराम इन्द्रजितामध्ये ॥२३॥

व्यपेते तु जीवे निकुम्भस्य हृष्टा विनेदु: प्लवंगा दिश: सस्वनुश्च।
चचालेव चोर्वी पपातेव सा द्यौर्बलं राक्षसानां चाविवेश॥२४॥
पाहूनि जीव गेला निकुम्भाचा वानर गर्जेनेने दिशा दुमदुमवती।
त्यामुळे वाटे पृथ्वी हालली कोसळे नभराक्षस सैन्यात भय शिरे॥२४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे सप्तसप्ततितम: सर्ग:॥७७॥

युद्धकाण्ड सर्ग ७८

निकुम्भं निहतं श्रुत्वा कुम्भं च विनिपातितम्।
रावण: परमामर्षी प्रजज्वालानलो यथा॥१॥
निकुम्भ मारला जाई कुम्भही पडला तसा।
ऐकुनी रावण क्रोधे अग्नीसम लागे जळू॥१॥
नैर्ऋत: क्रोधशोकाभ्यां द्वाभ्यां तु परिमूर्च्छित:।
खरपुत्रं विशालाक्षं मकराक्षमचोदयत् ॥२॥

मूर्च्छित होत क्रोधाने शोक क्रोधे रावण।
आज्ञापी तो विशालाक्षा खरपुत्रास नन्तर॥२॥
गच्छ पुत्र मयाऽऽज्ञप्तो बलेनाभिसमन्वित:।
राघवं लक्ष्मणं चैव जहि तौ सवनौकसौ॥३॥
जा पुत्रा मम आज्ञेने सैन्यास घेऊनिया।
श्रीराम लक्ष्मणा टाक मारूनि वानरांसह॥३॥
रावणस्य वच:श्रुत्वा शूरमानी खरात्मज:।
बाढमित्यब्रवीद्धृष्टो मकराक्षो निशाचरम्॥४॥

ऐकुनि रावणाज्ञा खरपुत्र जो स्वत:स शूर।
समजणारा हर्षाने मान्य करुनी जावया॥४॥
सोऽभिवाद्य दशग्रीवं कृत्वा चापि प्रदक्षिणम्।
निर्जगाम गृहाच्छुभ्राद् रावणाज्ञया बली॥५॥
अभिवादुनि दशग्रीवा घालुनी प्रदक्षिणा तया।
निघे शुभ्र गृहातून रावणाज्ञेने वीर तो ॥५॥
तस्य तद् वचनं श्रुत्वा बलाध्यक्षो निशाचर:।
स्यंदनं च बलं चैव समीपं प्रतिपादयत् ॥७॥

सेनापति राक्षसांचा वचन त्याचे ऐकुनी।
रथ आणि सैन्य त्याच्यापुढे देइ आणुनि॥७॥
प्रदक्षिणं रथं कृत्वा समारुह्य निशाचरः।
सूतं संचोदयामास शीघ्रं वै रथमावह् ॥८॥
प्रदक्षिणा घालुनिया रथात शिरे राक्षस।
आज्ञापी सुतास तो हाकण्यास शीघ्र रथ॥८॥
अथ तान् राक्षसान् सर्वान् मकराक्षोऽब्रवीदिदम्।
यूयं सर्वे प्रयुध्यध्वं पुरस्तान्मम राक्षसाः॥९॥

मकराक्ष तदा बोले त्यावेळी सर्व राक्षसां।
तुम्ही सर्व करा युद्धा माझ्या राहुनि पुढे॥९॥
अहं राक्षसराजेन रावणेन महात्मना।
आज्ञप्त: समरे हन्तुं तावुभौ रामलक्ष्मणौ ॥१०॥
महात्मा राक्षसराज आज्ञापी मजला असे।
मारण्या रणि जाऊनी उभया रामलक्ष्मणा॥१०॥
अद्य रामं वधिष्यामि लक्ष्मणं च निशाचरा:।
शाखामृगं च सुग्रीवं वानरांश्च शरोत्तमै:॥११॥

उत्तम बाणांनी आज मारीन रामलक्ष्मणा।
त्यापरी वानरवीरा शाखामृग सुग्रिवा॥११॥
अद्य शूलनिपातैश्च वानराणां महाचमूम्।
प्रदहिष्यामि सम्प्राप्तां शुष्केन्धनमिवानिल:॥१२॥
शूलप्रहारे जाळीन महावानरसैन्यास।
जसा इन्धना शुष्क अग्नी जाळुनि टाकतो॥१२॥
मकराक्षस्य तच्छ्रुत्वा वचनं ते निशाचरा:।
सर्वे नानायुधोपेता बलवन्त: समाहिता:॥१३॥

ऐकुनी मकराक्षाचे बोल राक्षसवीरही।
नाना शस्त्रांसह होती तयार सावधपणे ॥१३॥
ते कामरूपिण: क्रूरा दंष्ट्रिण: पिङ्गलेक्षणा:।
मातंगा इव नर्दन्तो ध्वस्तकेशा भयावहा:॥१४॥
उग्रदन्त इच्छारूपी क्रूर पिवळे नेत्र ज्यां।
हत्तीसम गर्जती केश अस्ताव्यस्त भयावह॥१४॥
परिवार्य महाकाया महाकायं खरात्मजम्।
अभिजग्मुस्तदा हृष्टाश्चालयन्तो वसुन्धराम्॥१५॥

महाकाय राक्षस ते महाकाय मकराक्षा घेरुनी।
हर्षाने त्यासवे जाती करुनी कम्पित धरा।
शङ्खभेरीसहस्राणामाहतानां सम्न्तत:।
क्ष्वेलितास्फोटितानां च तत्र शब्दो महानभूत्॥१६॥
सर्व बाजूंनी हजारो शंख भेरी नगाऱ्यांसह ।
गर्जना आणि टाळ्यांचा राक्षसांच्या निघे ध्वनी॥१६॥
प्रभ्रष्टोऽथ करात् तस्य प्रतोद: सारथेस्तदा।
पपात सहसा दैवाद् ध्वजस्तस्य तु रक्षस:।

अचानक सारथ्याच्या हातातुनि खाली पडे।
चाबूक तदा ध्वजही राक्षसाचा खाली पडे॥१७॥
तस्य ते रथसंयुक्ता हया विक्रमवर्जिता:।
चरणैराकुलैर्गत्वा दीना: सास्रमुखा मधु:॥१८॥
रथाचे अडखळती अश्व निस्त्राण हो उनी ।
दीन होत नेत्री अश्रु घेउनि चालू लागले॥१८॥
प्रवाति पवनस्तस्मिन् सपांसु: ख्रदारुण:।
निर्याणे तस्य रौद्रस्य मकराक्षस्य दुर्मते:॥१९॥

भयंकर कठोर वारा तेव्हां वाहु लागला।
निघण्याच्या समयी मकराक्षाच्या रौद्र जो॥१९॥
तानि दृष्ट्वा निमित्तानि राक्षसा वीर्यवत्तमा:।
अचिन्त्य निर्गता: सर्वे यत्र तौ रामलक्ष्मणौ॥२०॥
पाहूनि लक्षणे ऐसी विचारात न घेउनी ।
निघती राक्षस वीर जाण्या जेथे रामलक्ष्मण॥२०॥
घनगजमहिषाङ्गतुल्यवर्णा: समरमुखेष्वसकृद्गदासिभिन्ना:।
अहमहमिति युद्धकौशलास्ते रजनिचरा: परिबभ्रमुर्मुहुस्ते॥२१॥

घन गज महिषासम वर्णे युद्धे घाव खड्ग गदा सोसति जे।
युद्धकुशल ते अहमहिकेने युद्धभूमीवरी घालति घिरट्या॥२१॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे अष्टसप्ततितम: सर्ग:॥७८॥

युद्धकाण्ड सर्ग ७९

निर्गतं मकराक्षं ते दृश्ट्वा वानरपुङ्गवा:।
आप्लुप्त्य सहसा सर्व्र् योद्धुकामा व्यवस्थिता:॥१॥
पाहुनी मकराक्षा येता उड्या मारुनि वानर।
राहती त्वरेने सर्व युद्धास तयार् होउनी॥१॥
तत: प्रवृत्तं सुमहत् तद् युद्धं लोमहर्षणम्।
निशाचरै: प्लवङ्गानां देवानां दानवैरिव॥२॥

झाले तेथ सुरू युद्ध महान् रोमहर्षक।
वानर राक्षसांमध्ये देवांचे दैत्यांचे जणु॥
वृक्षशूलनिपातैश्च गदापरिघपातनै:।
अन्योन्यं मर्दयन्ति स्म तदा कपिनिशाचरा:॥३॥
वृक्ष शूल आघाते गदा परिघ यांसवे ।
एकमेका चिरडती वानर आणि निशाचर॥३॥
शक्ति खड्गगदाकुन्तैस्तोमरैश्च निशाचरा:।
पट्टिशैर्भिन्दिपालश्च बाणपातै: समन्तत:॥४॥

निशाचर शक्ति खड्ग गदा तोमर पट्टिश।
बाणाघातांनी करती वर्षाव वानरांवरी॥४॥
पाशमुद्गरदण्डैश्च निर्घातैश्चापरैस्ततहा।
कदनं कपिसिंहानां चक्रुस्ते रजनीचरा:॥५॥
पाश मुद्गर काठ्यांनी काही निर्घात तसे।
वधती अन्य शस्त्रेंही कपिसिंहांस राक्षस ॥५॥
बाणौघैरर्दिताश्चापि खरपुत्रेण वानरा:।
सम्भ्रान्तमनस: सर्वे सुद्रुवुर्भयपीडिता:॥६॥

खरपुत्राच्या बाणौघे पीडित होति वानर ।
आणि भयपीडित ते सर्वत्र पळू लागति ॥६॥
तान् दृष्ट्वा राक्षसा: सर्वे द्रवमाणान् वनौकस:।
नेदुस्ते सिंहवद् दृप्ता राक्षसा जितकाशिन:॥७॥
पळताना पाहुनि त्यांना सर्व गर्विष्ठ राक्षस।
जिंकलो समजुनी करती सिंहासम गर्जना॥७॥
विद्रवत्सु तदा तेषु वानर्षु समन्तत:।
रामस्तान् वारयामास शरवर्षेण राक्षसान्॥८॥

सर्वत्र वानर पळती पाहूनिया श्रीराम हे।
थाम्बवले राक्षसांना शरवर्षाव करुनिया॥८॥
वारितान् राक्षसान् दृष्ट्वा मकराक्षो निशाचरः।
कोपानमसमाविष्टो वचनं चेदमब्रवीत्॥९॥
पाहुनी भ्यालेल्या त्यांना मकराक्ष निशाचर।
होत क्रोधाग्निने व्याप्त वचन ऐसे बोलला॥९॥
तिष्ठ राम मया सार्थ द्वन्द्वयुद्धं भविष्यति।
त्याजयिष्यामि ते प्राणान् धनुर्मुक्यैः शितैः शरैः॥१०॥

थाम्ब रामा तुझ्यासंगे द्वंद्वयुद्ध करीन मी।
घेतील धनुष्यातिल मम तीर प्राण तुझे॥१०॥
यत् तदा दण्डकारण्ये पितरं हतवान् मम।
तदग्रत: स्वकर्मस्थं स्मृत्वा रोषोऽभिवर्धते ॥११॥
दण्डकारण्ये पित्यास जेव्हां मम तू मारिले।
स्वकर्मे रत स्मरुनी वाढतोय मम रोष ॥११॥
दह्यन्ते भृशमङ्गानि दुरात्मन् मम राघव।
यन्मयासि न दृष्टस्त्वं तस्मिन् काले महावने॥१२॥

होतसे आग अंगाची दुरात्म्या मम राघवा।
महावनी त्या काळी मी न तुजला पाहिले॥१२॥
दिष्ट्यासि दर्शनं राम मम त्वं प्राप्तवानिह।
कांक्षितोऽसि क्षुधार्तस्य सिंहस्येवैतरो मृग:॥१३॥
सुदैवाने रामा आज आलास आज तू दर्शना।
भुकेल्या सिंहाच्या पुढे मृग येत असे जसा॥१३॥
अद्य मद्बाणवेगेन प्रेतराड्विषयं गत:।
ये त्वया निहता: शूरा: सह तैश्च वसिष्यसि॥१४॥

आज मम बाणवेगे जाशील यमलोकी तू।
राहशील वीरांसंगे शूर ज्या मारलेस तू॥१४॥
बहुनात्र किमुक्तेन श्रृणु राम वचौ मम।
पश्यन्तु सकला लोकास्त्वां मां चैव रणाजिरे॥१५॥
कशास अधिक बोलू ऐक रामा माझे वच।
पाहूदे सर्व लोकांना युद्ध माझ्या तुझ्यातिल॥१५॥
अस्त्रैर्वा गदया वापि बाहुभ्यां वा रणाजिरे।
अभ्यस्तं येन वा राम वर्ततां तेन वा मृधम्॥१६॥

अस्त्रांनी गदेने वा बाहूंनी तुज योग्य जे ।
लढ तू त्याचप्रकारे अभ्यास तुझा ज्यामध्ये ॥१६॥
मकराक्षवचः श्रुत्वा रामो दशरथात्मजः।
अब्रवीत् प्रहसन् वाक्यमुत्तरोत्तरवादिनम्॥१७॥
मकराक्षवच ऐकोनी राम दशरथात्मज ।
बोलला हासूनिया उत्तर देई त्याला असे॥१७॥
कत्थसे किं वृथा रक्षो बहून्यसदृशानि ते।
न रणे शक्यते जेतुं विना युद्धेन वाग्बलात्॥१८॥

बडबड का फुकाची करसी राक्षसा अयोग्य जी।
नच जिंकू शकसी युद्ध बडबड करुनी केवळ॥१८॥
चतुर्दश सहस्राणि रक्षसां त्वपिता च यः।
त्रिशिरा दूषणश्चापि दण्डके निहतो मया॥१९॥
चौदा हजार राक्षस तुझा पिताही ज्यांमध्ये।
त्रिशिर दूषण सर्वां मारिले मी दंडकवनी॥१९॥
स्वाशिताश्चापि मांसेन गृध्रगोमायुवायसाः।
भविष्यन्त्यद्य वै पाप तीक्ष्णतुण्डनखाङ्कुशाः॥२०॥

हे पाप्या तुझ्या मांसाने तीक्ष्ण नख चोचधारी।
गिधाडे कावळे कोल्हे तृप्त होतिल आजला॥२०॥
राघवेणैवमुक्तेस्तु मकराक्षो महाबल:।
बाणौघानमुचत् तस्मै राघवाय रणाजिरे॥२१॥
राघवे म्हणता ऐसे मकराक्ष महाबली।
सोडी बाणांचे ओघ त्याच्यावरि रणामधे॥२१॥
ताञ्छराञ्छरवर्षेण रामश्चिच्छेद नैकधा।
निपेतुर्भुवि विछिन्ना रुक्मपुङ्खा: सहस्रश:॥२२॥

त्या शरां शरवर्षेने छेदी राम अनेकदा।
सुवर्णपंखी सहस्र पडती बाण भूवरी॥२२॥
तद् युद्धमभवत् तत्र समेत्यान्योन्यमोजसा।
खरराक्षसपुत्रस्य सूनोर्दशरथस्य च॥२३॥
खरराक्षसपुत्राचे दशरथपुत्राचे तसे ।
बळाने एकमेकांच्या सवे युद्ध घडतसे॥२३॥
जीमूतयोरिवाकाशे शब्दो ज्यातलयोरिव।
धनुर्मुक्त: स्वनोऽन्योन्यं श्रूयते च रणाजिरे॥२४॥

ध्वनि धनुप्रत्यंचांचा दोघांच्या बाणासवे।
येतसे जसा ढगांचा भिडता नभि होतसे॥२४॥
देवदानवगन्धर्वा: किंनराश्च महोरगा:।
अन्तरिक्षगता: सर्वे द्रष्टुकामास्तदद्भुतम्॥२५॥
देवदानव गन्धर्व नाग किन्नरही सवे।
जमती नभी पहाया इच्छेने युद्ध पाहण्या॥२५॥
विद्धमन्योन्यगात्रेषु द्विगुणं वर्धते बलम्।
कृतप्रतिकृतान्योन्यं कुरुतां तौ रणाजिरे॥२६॥

विद्ध गात्रे होता होई द्विगुणित त्यांचे बळ।
एकमेकावरी प्रहार दोघे करति रणावरी॥२६॥
राममुक्तांस्तु बाणौघान् राक्षसस्त्वच्छिनद् रणे।
रक्षोमुक्तांस्तु रामो वै नैकधा प्राच्छिनच्छरै:॥२७॥
बाणौघ रामे मुक्त राक्षस छिन्न करि रणी।
राक्षसाने सोडलेले रामे छिन्न अनेकदा॥२७॥
बाणौघविताता:सर्वा दिशश्च प्रदिशस्तथा।
संछन्ना वसुधा चैव समन्तान्न प्रकाशते॥२८॥

बाणांचा ओघाने दिशा उपदिशा पृथ्वी तशी।
झाकली सर्वबाजूनी त्यामुळे न प्रकाशते॥२८॥
ततः क्रुद्धो महाबाहुर्धनुश्चिच्छेद संयुगे।
अष्टाभिरथ नाराचैः सूतं विव्याध राघवः॥२९॥
मग क्रुद्ध श्रीरामाने तोडले राक्षस धनु।
आणि आठ तीक्ष्ण बाणांनी सारथ्याला मारले॥२९॥
भित्त्वा रथं शरे रामौ हत्वा अश्वानपातयत्।
विरथो वसुधास्थः स मकराक्षो निशाचरः॥३०॥

बाणांनी रथ भेदून रामाने अश्व मारले।
मकराक्ष रथहीन मग उतरे भूवरी॥३०॥
तत्तिष्ठद् वसुधां रक्षः शूलं जग्राह पाणिना।
त्रासनं सर्वभूतानां युगान्ताग्निसमप्रभम्॥३१॥
मग तो उतरे भूवरी शूल हाती धरूनिया ।
त्रास दे सर्व प्राण्यांना तेजाने युगान्तासम॥३१॥
दुरवापं महच्छूलं रुद्रदत्तं भयंकरम्।
जाज्वल्यमानमाकाशे संहारास्त्रमिवापरम्॥३२॥

दुर्मिळ भयंकर शूळ जो रुद्राने दिला असे।
आकाश उजळुनि टाकी संहारस्त्रच ते जणु॥३२॥
यं दृष्ट्वा देवता: सर्वा भयार्ता विद्रुता दिश:।
विभ्राम्य च महच्छूलं प्रज्वलन्तं निशाचर:॥३३॥
पाहुनि सर्व देवता पळाल्या दिशांस सर्व।
फिरवीत पेटता तो महाशूल निशाचर॥३३॥
स क्रोधात् प्राहिणोत् तस्मै राघवाय महाहवे।
तमापतन्तं ज्वलितं खरपुत्रकराच्युतम्॥३४॥

बाणैश्चतुर्भिराकाशे शूलं चिच्छेद्य राघव:।
स भिन्नो नैकशा शूलो दिब्यहाटकमण्डित:।
व्यशीर्यत महोलेन रामबाणार्दितो भुवि॥३५॥

क्रोधे फेकीतसे शूल महायुद्धी रामावर।
खरपुत्राच्या हातुन पेटता शूल येता रणी॥३४॥
चार बाणांनी आकाशी रामाने तो छेदला।
सुवर्णमण्डित होई भग्न अनेक तुकड्यांमधे।
आणि उल्केसम मोठ्या विखरे जमिनीवरी॥३५॥

तच्छूलं निहतं दृष्ट्वा रामेणाक्लिष्टकर्मणा।
साधु साध्विति भूतानि व्याहरन्ति नभोगता:॥३६॥

क्लिष्टकर्मी श्रीरामाने पाहूनि पाडता शूल।
साधु साधु असे प्राणी बोलती जे नभागत॥३६॥

तं दृष्ट्वा निहतं शूलं मकराक्षो निशाचर:।
मुष्टिमुद्यम्य काकुत्स्थं तिष्ठ तिष्ठेति चाब्रवीत्॥३७॥

पाहुनी पडता शूळ मकराक्ष निशाचर।
मूठ उगारुनि थांब थांब म्हणतो राघवा॥३७॥

स तं दृष्ट्वा पतन्तं तु प्रहस्य रघुनन्दनः।
पावकास्त्रं ततो रामः संदधे तु शरासने॥३८॥
पाहुनि पडता त्याला हास्य करुनी राघव।
पावकास्त्र काढुनि त्याचा प्रयोग करि राघव॥३८॥
तेनास्त्रेण हतं रक्षः काकुत्स्थेन तदा रणे।
संछिन्नहृदयं तत्र पपात च ममार च॥३९॥
हत राक्षस अस्त्रे त्या श्रीरामाने रणांगणी।
पडे भग्न हृदये तो पडे मरुनी भूवरी॥३९॥

दृष्ट्वा ते राक्षसा: सर्वे मकराक्षस्य पातनम्।
लङ्कामेव प्रधावन्त रामबानभयर्दिता:॥४०॥
पाहुनी राक्षस सर्व मकराक्षा पडता भूवरी।
बाणभये श्रीरामाच्या धाव घेती लङ्केकडे ॥४०॥
दशरथनृपसूनुबाणवगैरजनिचरं निहतं खरात्मजं तम्
प्रददृशुथ देवता: प्रहृष्टा गिरिमिव वज्रहतं यथा विकीर्णम्॥४१॥
दशरथपुत्र बाण मारुनि ठार करी राक्षसपुत्र खरास।
गिरिसम वज्र आघाते छिन्न पाहुनि देवता सर्व आनंदित॥४१॥
इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोनाशीतितम: सर्ग:॥७९॥

युद्धकाण्ड सर्ग ८०

मकराक्षं हतं श्रुत्वा रावण: समितिंजय:।
रोषेण महताविष्टो दन्तान् कटकटाय्य च॥१॥
मकराक्ष मरे ऐकुनि लंकाधिपति रावण।
दांतओठ खाऊ लागे भयंकर राग येउनी॥१॥
कुपितश्च तदा तत्र किं कार्यमिति चिन्तयन्।
आदिदेशाथ संक्रुद्धो रणायेन्द्रजितं सुतं॥२॥

होत क्रुद्ध तदा काही विचार करुनी मनी।
आदेश रणी जाण्या इन्द्रजितास देतसे॥२॥
जहि वीर महावीर्यौ भातरौ रामलक्ष्मणौ।
अदृश्यो दृश्यमानो वा सर्वथा त्वं बलाधिक:॥३॥
जा मार त्या महावीरां रामलक्ष्मण बन्धुना।
अदृश्य वा दृश्य बलवान तू त्यांच्याहुनी॥३॥
त्वमप्रतिमकर्माणमिन्द्रं जयसि संयुगे।
किं पुनर्मानुषौ दृष्ट्वा न वधिष्यसि संयुगे॥४॥

इन्द्रा अप्रतिम कर्मी जिंकसी युद्धात तू।
मग माणसां युद्धात का न मारू शकसि तू ॥४॥
तथोक्तो राक्षसेन्द्रेण प्रतिगृह्य पितुर्वचः।
यज्ञभूमौ स विधिवत् पावकः जुहुवेन्द्रजित्॥५॥
इन्द्रजित म्हणे ठीक पित्याचे वचन ऐकुनी।
यज्ञभूमीवरी विधिवत् अग्निपूजा तो करी॥५॥
जुह्वतश्चापि तत्राग्निं रक्तोष्णीषधराः स्त्रियः
आजग्मुः समाभ्रान्ता राक्षस्यो यत्र रावणिः॥६॥

अग्नीत आहुति देता येती तेथ राक्षसस्त्रिया।
शिरी लाल वस्त्रधारी भयभीत असती त्या ॥६॥
शस्त्राणि शरपत्राणि समिधोऽथ बिभीतका:।
लोहितानि च वासांसि स्रुवं काष्णायसं तथा॥७॥
आणति त्या यज्ञासाठी शरपत्रे शस्त्रे तोमर।
समिधा बेहड्याच्या लाल वस्त्रे लोहस्रुवा॥७॥
सर्वतोऽग्निं समास्तीर्य शरपत्रै: सतोमरै:।
छागस्य सर्वकृष्णस्य गलं जिह्वाह जीवत:॥८॥

बाण् तोमर रचना अग्नीभोवति तो करी।
पूर्ण काळ्या बोकडाचा गळा मग हाती धरी॥८॥
सकृद्धोमसमिद्धस्य् विधूमस्य महार्चिष:।
बभूवुस्तानि लिङ्गानी विजयं दर्शयन्ति च॥९॥
आहुति देता अग्नी धुराविण ज्वालांनी महा।
विजयाची शुभचिह्ने पेटूनि उठे दर्शवी॥९॥
प्रदक्षिणावर्तशिखस्तप्तहाटकसंनिभ:।
हविस्तत् प्रतिजग्राह पावक: स्वयमुत्थित:॥१०॥

तप्त सुवर्णासम ती अग्निज्वाला प्रदक्षिणा।
करुनि स्वत उठुनी आहुती स्वीकारि ती॥१०॥
हुताग्निं तर्पयित्वाथ देवदानवराक्षसान्।
आरुरोह रथश्रेष्ठमन्तर्धानगतं शुभम्॥११॥
हुताग्नि तर्पण करुनी देवदानव राक्षसां।
अदृश्य होणाऱ्या रथी तो इन्द्रजित् बैसला॥११॥
स वाजिभिश्चतुर्भिस्तु बाणैस्तु निशितैर्युत:।
आरोपितमहाचाप: शुशुभे स्यन्दनोत्तम:॥१२॥

जोडलेला अश्व चार तीक्ष्ण बाणांनी समृद्ध।
ज्यावरि महा धनुष्य शोभे रथ तो उत्तम॥१२॥
जाज्वल्यमानो वपुषा तपनीयपरिच्छद:।
मृगैश्चन्द्रार्धचन्द्रैश्च स रथ: समल्कृत:॥१३॥
झळके वपु तेजाने सुवर्णवस्त्रे झाकला।
मृग अर्धचन्द्र चिह्ने सजलेला सुशोभित॥१३॥
जाम्बूनदमहाकम्बुर्दीप्तपावकसंनिभ:।
बभूवेन्द्रजित: केतुर्वैदूर्यसमल्कृत:॥१४॥

रथाचा इन्द्रजिताच्या ध्वज सुवर्णकलशासम।
अग्नीसम तेजस्वी वैडूर्य रत्ने सुशोभित॥१४॥
तेन चादित्यकल्पेन ब्रह्मास्त्रेण च पालित:।
स बभूव दुराघर्षो रावणि: सुमहाबल:॥१५॥
सूर्यासम तेजस्वी जो ब्रह्मास्त्राने रक्षित।
रथामुळे होत अजेय इन्द्रजित बलवान् महा॥१५॥
सोऽभिनिर्याय नगरादिन्द्रजित् समितिंजय:।
हुत्वाग्नि राक्षसैर्मन्त्रैरन्तर्धानगतोऽब्रवीत्॥१६॥

नगरातुनि निघाला इन्द्रजित रण जिंकण्या।
हवने राक्षसमन्त्रे अदृश्य तो बोले असा॥१६॥
अद्य हत्वा रणे यौ तौ मिथ्या प्रव्रजितौ वने।
जयं पित्रे प्रदास्यामि रावणाय रणेऽधिकम्॥१७॥
बनुनी संन्यासी खोटे वनी वसति दोघां त्या।
मारुनी रणी करीन पित्यास विजयी रणी॥१७॥
अद्य निर्वानरामुर्वी हत्वा रामं च लक्ष्मणम्।
करिष्ये परमां प्रीतिमित्युक्त्वान्तरधीयत॥१८॥

मारूनि उभया आज निर्वानर करेन भू।
पित्या आनन्द देईन अदृश्य होई बोलुनि॥१८॥
आपपाताथ संक्रुद्धो दशग्रीवेण चोदित:।
तीक्ष्णकार्मुकनाराचैस्तीक्ष्णस्त्विन्द्ररिपू रणे ॥१९॥
रावणे प्रेरित क्रुद्ध इन्द्रजित इन्द्ररिपु।
तीक्ष्ण नाराच बाण धनुष्यासह येतसे॥१९॥
स ददर्श महावीर्यौ नागौ त्रिशिरसाविव।
सृजन्ताविषुजालानि वीरौ वानरमध्यगौ॥२०॥

पाही दोन महावीर त्रिशिर नागासम।
करती शरवर्षाव वानरमध्ये राहुनी॥२०॥
इमौ ताविति संन्त्य सज्यं कृत्वा च कार्मुकम्।
संततानेषुधाराभि: पर्जन्य इव वृष्टिमान्॥२१॥
हेच दोघे जाणुनि तो सज्ज करुनिया धनु।
संतत पर्जन्यधारेपरी करी बाणवर्षाव तो॥२१॥
स तु वैहायसरथो युधि तौ रामलक्ष्मणौ।
अचक्षुर्विषये तिष्ठन् विव्याध निशितै: शरै:॥२२॥

रथी आकाशी फिरत्या बैसुनी अदृश्यपणे।
तीक्ष्ण बाणांनी विद्ध दोघांना करु लागला॥२२॥
तौ तस्य शरवेगेन परीतौ रामलक्ष्मणौ।
धनुषी सशरे कृत्वा दिव्यमस्त्रं प्रचक्रतु:॥२३॥
बाणांनी घेरलेले त्या रामलक्ष्मण लावुनी।
दिव्य अस्त्रा धनूवरी लावुनि बाण सोडती॥२३॥
प्रच्छादयन्तौ गगनं शरजालैर्महाबली।
तमस्त्रै: सूर्यसंकाशैर्नैव पस्पर्शतु: शरै:॥२४॥

टाकती नभ झाकूनी शरजाले महाबली।
परि स्पर्शु न शकती अस्त्रे तेजस्वी सूर्यासम॥२४॥
स हि धूमान्धकारं च चक्रे प्रच्छादयन्नभः।
दिशश्चान्तर्दधे श्रीमान् नीहारतमसा वृताः॥२५॥
तो करी धुराने अन्धार झाकुनि टाकी नभ।
झाकल्या जाउनी दिशा दिसेनासा होइ तो॥२५॥
नैव ज्यातलनिर्घोषो न च नेमिखुरस्वनः।
शुश्रुवे चरतस्तस्य न च रूपं प्रकाशते॥२६॥

ऐकू न येइ आवाज त्याच्या धनुच्या दोरिचा।
रथचक्रांचा अश्वखुरांचा वा तोही न दिसे।२६॥
घनान्धकारे तिमिरे शिलावर्षमिवाद्भुतम्।
स ववर्ष महाबाहुर्नाराचशरवृष्टिभि:॥२७॥
अन्धारी दाट काळोखी शिलावृष्टिपरी करी।
वर्षाव इन्द्रजित तो नाराच बाणांचा तदा॥२७॥
स रामं सूर्यसंकाशै: सरैदत्तवरैर्भृशम्।
विव्याध समरे क्रुद्ध: सर्वगात्रेषु रावणि:॥२८॥

वरे प्राप्त सूर्यासम तेजस्वी शरवर्षावे।
रणी श्रीरामावरी प्रहार सर्वांगावरि करी ॥२८॥
तौ हन्यमानौ नाराचैर्धाराभिरिव पर्वतौ।
हेमपुङ्खान् नरव्याघ्रौ तिग्मान् मुमुचतु: शरान॥२९॥
नाराचे बाणवर्षावे घायाळ रामलक्ष्मण ।
जलवृष्टिने पर्वत भिजावा दिसती तसे।
तेव्हां सुवर्णपङ्खी बाण सोडू लागती॥२९॥
अन्तरिक्षे समासाद्य रावणिं कंकपत्रिण:।
निकृत्य पतगा भूमौ पेतुस्ते शोणिताप्लुता:॥३०॥

इन्द्रजिता मारलेले कंकपत्री बाण त्यांचे।
जाउनी कापले पडती रक्तलांछित भूवरी॥३०॥
अतिमात्रं शरौघेण दीप्यमानौ नरोत्तमौ।
तानिषून् पततो भल्लैरनेकैर्विचकर्ततु:॥३१॥
अतिबाणवर्षावे ते तेजस्वी रामलक्ष्मण।
तोडती इन्द्रजिताचे बाण भल्ल बाणांनी मधे॥३१॥
यतो हि ददृशाते तौ शरान् निपतिताञ्छितान्।
ततस्तु तौ दाशरथी ससृजातेऽस्त्रमुत्तमम्॥३२॥

पाहाता आपले बाण तोडिले पडताक्षणी।
तेव्हां दाशरथी दोघे अस्त्र उत्तम योजती॥३२॥
रावणिस्तु दिश: सर्वा रथेनातिरथोऽपतत्।
विव्याध तौ दाशरथी लघ्वस्त्रो निशितै: शरै:॥३३॥
इन्द्रजित् सर्व दिशांना वेगाने फिरता रथी।
लघ्वस्त्रनिपुण विद्ध रामलक्ष्मणा करी॥३३॥
तेनातिविद्धौ तौ वीरौ रुख्मपुंखै: सुसंहितै:।
बभूवतुर्दाशरथी पुष्पिताविव किंशुकौ॥३४॥

विद्ध सोनेरी पिसांच्या बाणांनी ते उभयतां।
फुललेल्या पळसाच्या वृक्षासम लागती दिसू॥३४॥
नास्य वेगगतिं कश्चिन्नच रूपं धनु: शरान्।
न चास्य विदितं किंचित् सूर्यस्येवाभ्रसम्प्लवे॥३५॥
त्याचा वेग गति रूप धनुष्य बाण त्याचे तसे।
न कळती कोणा जैसी अभ्रांकित सूर्याची गति॥३५॥
तेन विद्धाश्च हरयो निहताश्च गतासव:।
बभूवु: शतशस्तत्र पतिता धरणीतले॥३६॥

बाणांनी विद्ध होउनि शेकडो वानर सैनिक।
प्राणा गमावुनी पडती तेथेच जमिनीवर॥३६॥
लक्ष्मणस्तु ततः क्रुद्धो भ्रातरं वाक्यमब्रवीत्।
ब्राह्ममस्त्रं प्रयोक्ष्यामि वधार्थं सर्व रक्षसाम्॥३७॥
लक्ष्मण क्रुद्ध होऊनि ऐसे बन्धूस बोलला।
ब्रह्मास्त्राचा करतो मी सर्व राक्षस मारण्या॥३७॥
तमुवाच ततो रामो लक्ष्मणं शुभलक्ष्मणम्।
नैकस्य हेतो रक्षांसि पृथिव्यां हन्तुमर्हसि॥३८॥

तेव्हां त्यास वदे राम लक्ष्मणा योग्य हे नसे।
एकासाठी भूवरील सर्व राक्षस मारणे॥३८॥
अयुद्धमानं प्रच्छन्नं प्राञ्जलिं शरणागतम्।
पलायमानं मत्तं वा न हन्तुं त्वमिहार्हसि॥३९॥
जो न करी युद्ध लपे जो हात जोडत् जो उभा।
जो पळे वा मद्ये मत्त अशास तू न मारणे॥३९॥
तस्यै तु वधे यन्तं करिष्यामि महाभुज।
आदेक्ष्वावो महावेगानस्त्रानाशीविषोपमान्॥४०॥

वधीन इन्द्रजिता फक्त त्यासाठी दोघे आपण।
वेगवान सर्पासम दिव्यास्त्र सोडू तयावर॥४०॥
तमेन मायिनं क्षुद्रमन्तर्हितरथं बलात्।
राक्षसं निहनिष्यन्ति दृष्ट्वा वानरयूथपा:॥४१॥
क्षुद्र मायेने अदृश्य रथासह जाहला तया ।
मारतील यूथपति जर पाहू शकती तया॥४१॥
यद्येष भूमिं विशते दिवं वा रसातलं वापि नभस्थलं वा।
एवं विगूढोऽपि ममास्त्रदग्ध:पतिष्यते भूमितले गतासु:॥४२॥

शिरे जरी भूमित स्वर्गात किंवा रसातळी वा नभी लपे।
असा अदृश्य जरि मम अस्त्राने पडेल मरून भूमिवरी तो॥४२॥
इत्येवमुक्त्वा वचनं महार्थं रघुप्रवीर: प्लवगर्षभैर्वृत:।
वधाय रौद्रस्य नृशंसकर्मणस्तदा महात्मा त्वरितं निरीक्षते॥४३॥
बोलूनि ऐसे अर्थपूर्ण बोल श्रीराम वानरसैन्यानी वेढलेला।
वधास्तव रौद्रनृशंस कर्मी निरीक्षण महात्मा करु लागे तदा॥४३॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे अशीतितम: सर्ग:॥८०॥

युद्धकाण्ड सर्ग ८१

विज्ञाय तु मनस्तस्य राघवस्य महात्मन:।
स निवृत्याहवात् तस्मात् प्रविवेश पुरं तत:॥१॥
जाणुनी महात्म्याच्या राघवाच्या मनी काय।
युद्धनिवृत्त होऊन लंकेत इन्द्रजित जातसे॥१॥
सोऽनुस्मृत्य वधं तेषां राक्षसानाम् तरस्विनाम्।
क्रोधताम्रेक्षण: शूरो निर्जगामाथ रावणि:॥२॥

राक्षसांचा बलवान त्या वध स्मरुनि शूर तो।
इन्द्रजित् नेत्र लाल करुनि निघे तेथुनी॥२॥
स पश्चिमेन द्वारेण निर्ययौ राक्षसैर्वृत:।
इन्द्रजित सुमहावीर्य: पौलस्त्यो देवकण्टक:॥३॥
इन्द्रजित महावीर पौलस्त्य देवघातकी।
राक्षसांच्या सेनेसह पश्चिम द्वाराने निघे॥३॥
इन्द्रजित्तु ततो दृष्ट्वा भ्रातरौ रामलक्ष्मणौ।
रणायाभ्युद्यतौ वीरौ मायां प्रादुष्करोत् तदा॥४॥

पाहुनी रामलक्ष्मणा बन्धुद्वया युद्धास्तव ।
सज्ज इन्द्रजित् करी मायेचा प्रयोग तदा॥४॥
इन्द्रजित्तु रथे स्थाप्य सीतां मायामयीं तदा।
बलेन महतावृत्य तस्या वधमरोचयत्॥५॥
बसवूनी मायामयी सीतेस इन्द्रजित रथी।
तिच्या वधाचा देखावा करण्याचा विचार करी॥५॥
मोहनार्थं तु सर्वेषां बुद्धिं कृत्वा सुदुर्मतिः।
हन्तुं सीतां व्यवसितो वानराभिनमुखो ययौ॥६॥

गोंधळविण्या सर्वां विचार दुर्मति तो करी।
करण्या वध सीतेचा सर्व वानरमुख्यां पुढे॥६॥
तं दृष्ट्वा त्वभिनिर्यान्तं सर्वे ते काननौकसः।
उत्पेतुरभिसंक्रुद्धाः शिलाहस्ता युयुत्सवः॥७॥
पाहुनि पुढे येता त्या प्रक्षोभित सर्व वानर।
शिला घेउनिया हाती रागाने धावती पुढे॥७॥
हनूमान् पुरतस्तेषां जगाम कपिकुञ्जरः।
प्रगृह्य सुमहच्छृंङ्गं पर्वतस्य दुरासदम्॥८॥

घेउनि हाती शिखर पर्वताचे मोठे दुर्गम।
चालती सर्वांपुढे त्या हनूमान कपिश्रेष्ठ॥८॥
स ददर्श हतानन्दां सीतामिन्द्रजितो रथे।
एकवेणीधरां दीनामुपवासकृशाननाम्॥९॥
पाही इन्द्रजित रथी तो सीतेस दु:खविह्वल।
घातलेली एक वेणी दीन उपवासे कृश॥९॥
परिक्लिष्टैकवसनाममृजां राघवप्रियाम्।
रजोमलाभ्यामालिप्तैर्वरस्त्रियम्॥१०॥

एकच वस्त्र ल्यालेली मळ् धूळ अंगावरी।
अस्वच्छ जी श्रेष्ठ नारी परी राघवाला प्रिय॥१०॥
तां निरीक्ष्य मुहूर्तं तु मैथिलीमध्यवस्य च।
बभूवाचिरदृष्टा हि तेन सा जनकात्मजा॥११॥
पाहुनी कांही काल मैथिलीच ही ओळखे।
कारण त्याने पाहिले होते अशोकवनी तिज॥११॥
अब्रवीत् तां तु शोकार्ता निरानन्दां तपस्विनीम्।
दृष्ट्वा रथस्थितां दीनां राक्षसेन्द्रसुतश्रिताम्॥१२॥

किं समर्थितमस्येति चिन्तयन् स महाकपि:।
सह तैर्वानरश्रेष्ठैरभ्यधावत रावणिम्॥१३॥
रथातील शोके व्याप्त आनंदहीन दीन ती।
राक्षसराजपुत्राच्या ताब्यातिल तपस्विनी॥१२॥
सीतेस पाहुनी याने ठरवले काय करायचे।
विचारे धावे हनूमान वानरांसह त्यावरी॥१२॥
तद् वानरबलं दृष्ट्वा रावणि: क्रोधमूर्च्छित:।
कृत्वा विकोशं निस्त्रिंशं मूर्ध्नि सीतामकर्षयत्॥१४॥

वानरसैन्य ते पाहुनी इन्द्रजित अति क्रोधे।
सीतेचे ओढी केश तलवार हाती घेउनि ॥१४॥
तां स्त्रियं पश्यतां तेषां ताडयामास राक्षसः।
क्रोशन्तीं रामरामेति मायया योजितां रथे॥१५॥
सर्व पाहत असता मारतसे तिज राक्षस ।
राम राम आक्रन्दे ती मायावी रथि बैसुनी॥१५॥
गृहीतमूर्धजां दृष्ट्वा हनूमान् दैन्यमागतः।
दुःखजं वारि नेत्राभ्यामुत्सृजन् मारुतात्मजः॥१६॥

पाहुनी ओढिता केस तिचे हनुमान दु:खित।
दु:खाने डोळ्यातुनि त्याच्या अश्रु वाहू लागती॥१५॥
गृहीतमूर्धजां दृष्ट्वा हनूमान् दैत्यमागत:।
दु:खजं वारि नेत्राभ्यामुत्सृजन् मारुतात्मज:॥१६॥
पाहुनि तिचे मस्तक धरलेले दु:खी होतसे
आणि नेत्रातुन् अश्रू मारुती गाळु लागला॥१७॥
तां दृष्ट्वा चारुसर्वाङ्गी रामस्य महिषीं प्रियाम्।
अब्रवीत् परुषं वाक्यं क्रोधाद् रक्षोधिपात्मजम्॥१७॥

पाहुनी चारुसर्वांगी रामाची महिषी प्रिय।
इन्द्रजितास क्रोधाने कठोर वाक्य बोलल॥१७॥
दुरात्मन्नात्मनाशाय केशपक्षे परामृश:।
ब्रह्मर्षीणां कुले जातो राक्षसी योनिमाश्रित॥१८॥
दुरात्म्या स्वनाशार्थ केसांना ओढसी तिच्या।
जन्मुनी ब्रह्मर्षी कुले आश्रयसि राक्षस कुला॥१८॥
धिक् त्वां पापसमाचारं यस्य ते मतिरीदृशी।
नृशंसानार्य दुर्वृत्त क्षुद्र पापपराक्रम।

अनार्यस्येदृशं कर्म घृणा ते नास्ति निर्घृण॥१९॥
धिक्कार तुझा पाप्या दुर्बुद्धि ज्याची अशी।
क्रूरा अनार्या दुराचारी पाप हाच पराक्रम।
ऐसे कृत्य करताना लाज कैसी न वाटते॥१९॥
च्युता गृहाच्च राज्याच्च रामहस्ताच्च मैथिली।
किं तवैषापराद्धा हि यदेनां हंसि निर्दय॥२०॥
गृह राज्या रामापासुनी दूर गेलेली मथिली।
तिचा काय अपराध निर्दयपणे मारसी तिला॥२०॥

सीतां हत्वा तु न चिरं जीविष्यसि कथंचन।
वधार्ह कर्मणा तेन मम हस्तगतो ह्यसि॥२१॥
मारुनिया सीतेस तू जगशील न फार काळ।
जणू मरण्यास्तव तू आलास माझ्यासमोर॥२१॥
ये च स्त्रीघातिनां लोका लोकवध्यैश्च कुत्सिता:।
इह जीवितमुत्सृज्य प्रेअत्य तान् प्रति लप्स्यसे॥२२॥
स्त्रीघातकांसाठी जे लोक सज्जने निंदित असे।
या जगातुनि जाता त्या लोकास जाशील तू॥२२॥

इति ब्रुवाणो हनूमान् सायुधैर्हरिभिर्वृतः।
अभ्यधावत् सुसंक्रुद्धो राक्षसेन्द्रसुरं प्रति॥२३॥
असे म्हणुनी संतप्त मारुती वानरांसह।
शस्त्रधारी जाई धावुनि राक्षसेन्द्राप्रति॥२३॥
आपतन्तं महावीर्यं तदनीकं वनौकसाम् ।
रक्षसा भीमकोपानामनीकेन न्यवारयत्॥२४॥
पाहुनी महापराक्रमि वानरसेनेस धावुनी।
येता पाहुनि राक्षससैन्य अडवी क्रोधे भयंकर॥२४॥

स तां बाणसहस्रेण विक्षोभ्य हरिवाहिनीम्।
हनूमन्तं हरिश्रेष्ठमिन्द्रजित प्रत्युवाच ह॥२५॥
हजारो बाणांनी करी वानरसैन्यास व्याकुळ।
हरिश्रेष्ठ हनुमन्ता इन्द्रजित ऐसे वदे॥२५॥
सुग्रीवस्त्वं च रामश्च यन्निमित्तमिहागता:।
तां वधिष्यामि वैदेहीमद्यैव तव पश्यत:॥२६॥
राम सुग्रीव आणि तू आलात ज्यास्तव् इथे।
वधेन त्या वैदेहीस तुम्ही असता पाहता॥२६॥

इमां हत्वा ततो रामं लक्ष्मणं त्वां च वानर।
सुग्रीवं च वधिष्यामि तं चानार्य विभीषणम्॥२७॥
वानरा तिला मारूनी श्रीराम आणि लक्ष्मणा।
मारीन तुला सुग्रीवा तैश्या अनार्य बिभीषणा ॥२७॥
न हन्तव्या: स्त्रियश्चेति यद् ब्रवीषि प्लवङ्गम।
पीडाकरममित्राणां यच्च कर्तव्यमेव तत्॥२८॥
मारू नये स्त्रियांना हे जे वदसी प्लवंगमा।
पण् शत्रूस पीडादायी करणे ते उचित आम्हा॥२८॥

तमेवमुक्त्वा रुदतीं सीतां मायामयीं च ताम्।
शितधारेण् खड्गेन निजघानेन्द्रजित् स्वयम्॥२९॥
असे म्हणुनि मायावी रडणाऱ्या सीतेस त्या।
खड्गाने आपुल्या तीक्ष्ण वधी इन्द्रजित् स्वत:॥२९॥
यज्ञोपवीतमार्गेण छिन्ना तेन तपस्विनी।
सा पृथिव्यां पृथुश्रोणी पपात प्रियदर्शना॥३०॥
जानव्यासम वार् करुनी वधी तपस्विनी।
पृथुलश्रोणि पडली ती भूवरी प्रियदर्शनी॥३०॥

तामिन्द्रजित् स्त्रियं हत्वा हनूमन्तमुवाच ह।
मया रामस्य पश्येमां प्रियां शस्त्रनिषूदिताम्।
एषा विशस्ता वैदेही निष्फलो वः परिश्रमः॥३१॥
मारूनि तिला इन्द्रजित हनुमन्तास ऐसे वदे।
पहा रामाची शस्त्राने प्रिय भार्या मी मारिली।
सीता मृत झाल्याने व्यर्थ श्रम झाले तुमचे॥३१॥
ततः खड्गेन महता हत्वा तामिन्द्रजित्स्वयम्।
हृष्टः स रथमास्थाय ननाद महास्वनम्॥३२॥

मारुनी तिज खड्गाने ऐसे इन्द्रजित् स्वत:।
हर्षे रथात बसुनी करी मोठ्याने गर्जना॥३२॥
वानरा: शुश्रुवु: शब्दमदूरे प्रत्यवस्थिता:।
व्यादितस्यस्य नदतस्त्दुर्गं संश्रितस्य तु ॥३३॥
उभे वानर जवळी ऐकती इन्द्रजिताच्या।
आवाज गर्जनेचा तटबन्दीजवळी उभ्या॥३३॥
तथा तु सीतां विनिहत्य दुर्मति: प्रहृष्टचेता: स बभूव रावणि:।
तं हृष्टरूपं समुदीक्ष्य वानरा विषण्णरूपा: समभिप्रदुद्रुवु:॥३४॥

अशा प्रकारे सीतेस मारुनी होत आनंदित रावणपुत्र इन्द्रजित।
त्यास आनंदित पाहुनि पळू लागती विषण्ण होउनी सर्व वानर॥३४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकाशीतितम: सर्ग:॥८१॥

युद्धकाण्ड सर्ग ८२

श्रुत्वा तु भीमनिर्ह्रादं शक्राशनिसमस्वनम्।
वीक्ष्यमाणा दिश: सर्वा दुद्रुवुर्वानरा भृशम्॥१॥
भयंकर गर्जनेचा आवाज इन्द्रवज्रासम।
ऐकोनी सर्व दिशांना पाहूनि पळति वानर॥१॥
तानुवाच तत: सर्वान् हनूमान् मारुतात्मज:।
विषण्णवदनान् दीनांस्त्रस्तान् विद्रवत: पृथक्॥२॥

विषण्ण मुख झालेल्या पळणार्या वानरांना।
म्हणतसे त्या सर्वांना हनूमान् मारुतात्मज॥२॥
कस्माद् विषण्णवदना विद्रवध्वं प्लवंगमा:।
त्यक्तयुद्धसमित्साहा: शूरत्वं क्व नु वो गतम्॥३॥
वानरांनो पळता का विषण्ण होउनि असे।
सोडुनिया युद्धोत्साह शौर्य तुमचे गेले कुठे॥३॥
पृष्ठतोऽनुव्रजध्वं मामग्रतो यान्तमाहवे।
शूरैरभिजनोपेतैरयुक्तं हि निवर्तितुम्॥४॥

युद्धात पुढे जातो मी माझ्यामागुनि या तुम्ही।
उत्तम कुळी जन्मून योग्य नसे पळणे असे॥४॥
एवमुक्ता: सुसंक्रुद्धा वायुपुत्रेण धीमता।
शैलशृङ्गान् द्रुमांश्चैव जगृहुहृष्टमानसा:॥५॥
वदता वायुपुत्राने ऐसे सर्व क्रुद्ध होती ।
आणि शैलशृंगे वृक्ष घेती हो उनि हर्षित ॥५॥
अभिपेतुश्च गर्जन्तो राक्षसान् वानरर्षभा:।
परिवार्य हनूम्नतमन्वयुश्च महाहवे॥६॥

आणि गर्जनेसवे राक्षसांवरी धावती।
हनुमन्तास घेरुनी त्याच्या मागे जाति ते॥६॥
स तैर्वानरमुख्यैस्तु हनूमान् सर्वतो वृत:।
हुताशन इवार्चिष्मानदहच्छत्रुवाहिनीम्॥७॥
हनूमान घेरलेला सर्व वानरमुख्यामधे ।
अग्निज्वाळापरी जाळू शत्रुसैन्यास लागला॥७॥
स राक्षसानां कदनं चकार सुमहाकपि:।
वृतो वानरसैन्येन कालन्तकयमोपम॥८॥

वानरसैन्यामध्ये तो करू लागे महाकपि।
संहार राक्षससैन्याचा प्रलयकालि यमापरी॥८॥
स तु शोकेन चाविष्ट: कोपेन महता कपि:।
हनूमान् रावणिरथे महतीं पातयच्छिलाम्॥९॥
महाकपीने शोकाने आणि क्रोधाने फेकली ।
इन्द्रजिताच्या एक मोठी शिला रथावरी ॥९॥
तामापतन्ती दृष्ट्वैव रथ:सारथिना तदा।
विधेयाश्वसमायुक्त: विदूरमपवाहित:॥१०॥

शिला येताना पाहूनी सारथ्याने रथास त्या।
दूर नेले ज्यास अश्व आज्ञाधारक जोडले॥१०॥
तमिन्द्रजितमप्राप्य रथस्थं सहसारथिम्।
विवेश धरणीं भित्त्वा सा शिला व्यर्थमुद्यता॥११॥
त्यामुळे इन्द्रजितास सारथ्यासह जो रथी।
न लागता धरणीत घुसुनी व्यर्थ ती होतसे॥११॥
पतितायां शिलायां तु व्यथिता रक्षसां चमू:।
निपत्यन्त्या च शिलया राक्षसा मथिता भृशम्॥१२॥

शिला पडता व्यथित राक्षससैन्य होतसे।
चिरडले शिलेने त्या पडता अनेक् राक्षसां॥१२॥
तमभ्यधावन् शतशो नदन्त: काननौकस:।
ते द्रुमांश्च महाकाया गिरिशृङ्गाणि चोद्यता:॥१३॥
शेकडो वानर महाकाय गर्जना करुनी धावती।
त्याच्याकडे घेऊनि हाती वृक्ष पर्वतशिखरे महा॥१३॥
क्षिपतीन्द्रजितं संख्ये वानरा भीमविक्रमा:।
वृक्षशैलमहावर्षं विसृजन्त: प्लवङ्गमा:॥१४॥

पराक्रमी वानर ते युद्धात इन्द्रजितावरी।
वृक्षांचा आणि शिलांचा वर्षाव करती महा॥१४॥
शत्रूणां कदनं चक्रुर्नेदुश्च विविधैः स्वनैः।
वानरैस्तैर्महाभीमैर्घोररूपा निशाचराः॥१५॥
वीर्यादभिहता वृक्षैर्व्यचेष्टन्त रणक्षितौ।
स सैन्यमभिवीक्ष्याथ वानरार्दितमिन्द्रजित्॥१६॥
शत्रूंचा करति संहार महाभयंकर वानर।
करती गर्जना घोररूप निशाचरांचे त्यामुळे॥१५॥

रणी तडफडे सैन्य झाडांचा मार खाउनी।
पराक्रमे वानरांच्या इन्द्रजित् पहातसे॥१६॥
प्रगृहीतायुध: क्रुद्ध: परानभिमुखो ययौ।
स शरौघानवसृजन् स्वसैन्येनाभिसंवृत:॥१७॥
रागाने शस्त्र घेऊन इन्द्रजित शत्रूपुढे।
जाउनी शरवर्षाव करी स्वसैन्यी राहुनी॥१७॥
जघान कपिशार्दूलान् सुबहून् दृढविक्रम:।
शूलैरशनिभि: खड्गै: पट्टिशै: शूलमुद्गरै:॥१८॥

अनेक कपिशार्दूला वधी तो दृढविक्रमी।
शूल वज्र तलवार पट्टिश मुद्गर योजुनी॥१८॥
ते चाप्यनुचरांस्तस्य वानरा जघ्नुराहवे।
सुस्कन्धविटपै: शैलै: शिलाभिश्च महाबल:॥१९॥
महाबली वानरही इन्द्रजिताच्या सेवकां।
शिला बळकट वृक्ष योजुनी मारती तदा॥१९॥
हनूमानं कदनं चक्रे रक्षसां भीमकर्मणाम्।
संनिवार्य परानीकमब्रवीत् तान् वनौकस:॥२०॥

हनूमान करि संहार् राक्षसांचा भय्कर।
शत्रुसैन्यास रोखून वदे तो सर्व वानरां॥२०॥
हनूमान् संनिवर्तध्वं न नः साध्यमिदं बलम्।
त्यक्त्वा प्राणान् विचेष्टन्तो रामप्रियचिकीर्षवः॥२१॥
म्हणे तो प्रिय रामाचे करू इच्छिणाऱ्या तुम्ही।
थाम्बा हे जिंकणे युद्ध आम्हास शक्य नसे॥२१॥
यन्निमित्तं हि युध्यामो हता सा जनकात्मजा।
इममर्थं हि विज्ञाप्य रामं सुग्रीवमेव च॥२२॥

जिच्यास्तव लढतो आम्ही हत ती जनकात्मजा।
ही गोष्ट कळवू आधी श्रीराम आणि सुग्रीवा॥२२॥
तौ यत् प्रतिविधास्येते तत् करिष्यामहे वयम्।
इत्युक्त्वा वानरश्रेष्ठो वारयन् सर्व वानरान्॥२३॥
ते सांगतील तैसे करूया तेच आपण।
थांबवी म्हणुनी ऐसे वानरश्रेष्ठ सर्व वानरां॥२३॥
शनैः शंनैरसंत्रस्तः सबलः संन्यवर्तत।
ततः प्रेक्ष्य हनूमन्तं व्रजन्तं यत्र राघवः॥२४॥

हळू हळू सैन्यासह धीराने मागे सरुनी।
पाहुनी जिथे राम हनूमान् जातसे तिथे॥२४॥
स होतुकामो दुष्टात्मा गतश्चैत्यं निकुम्भिलाम्।
निकुम्भिलामधिष्ठाय पावकं जुहवेन्द्रजित्॥२५॥
होम करण्या इच्छेने दुष्टात्मा इन्द्रजित जाई।
मन्दिरी निकुम्भिलेच्या आहुति अग्नी देतसे॥२५॥
यज्ञभूम्यां ततो गत्वा पावकस्तेन रक्षसा।
हूयमानः प्रजज्वाल होमशोणितभुक् तदा॥२६॥

जाऊनि यज्ञभूमीत हवन करिता राक्षसे।
होम रक्ते अग्नी तृप्त प्रज्वलित तदा होतसे॥२६॥
सार्चि:पिनद्धो ददृशे होमशोणिततर्पित:।
संध्यागत इवादित्य: सुतीव्रोऽग्नि: समुत्थित:॥२७॥
होम रक्ताने तृप्त अग्नी ज्वालांनी वेढला।
तेजस्वी सायंकालिन सूर्यापरी दिसु लागला॥२७॥
अथेन्द्रजिद् राक्षसभूतये तु जुहाव हव्यं विधिना विधानवत्।
दृष्ट्वा व्यतिष्ठन्त च राक्षसास्ते महासमूहेषु नयानयज्ञा:॥२८॥

इन्द्रजित जाणणारा विधान राक्षस कल्याणास्तव करीतसे।
विधिवत् हवन् पाहुनी राक्षस सर्व पाहण्या तेथे उभे॥२८॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे द्व्यशीततम: सर्ग:॥८२॥

युद्धकाण्ड सर्ग ८३

राघवश्चापि विपुलम् तं राक्षसवनौकसाम्।
श्रुत्वा संग्रामनिर्घोषं जाम्बवन्तमुवाच ह॥१॥
राक्षसवानरांमधील युद्धाचा मोठा गजर।
ऐकोनि जाम्बवन्तास श्रीराम ऐसे वदे॥१॥
सौम्यं नूनं हनुमता कृतं कर्म सुदुष्करम्।
श्रूयते च ध्था भीम: सुमहानायुधस्वन:॥२॥

हे सौम्य हनुमन्ताने केले निश्चित दुष्कर।
कर्म ज्यामुळे शस्त्रांचा मोठा आवाज येतसे॥२॥
तद् गच्छ कुरु साहाय्यं स्वबलेनाभिसंवृत:।
क्षिप्रमृक्षपते तस्य कपिश्रेष्ठस्य युध्यत:॥३॥
म्हणुनी ऋक्षपते तू जाउनी स्वसैन्यासह।
कपिश्रेष्ठ हनुमन्ताला करी मदत झडकरी॥३॥
ऋक्षराजस्तथेत्युक्त्वा स्वेनानीकेन संवृत:।
आगच्छत पश्चिमं द्वारं हनूमान् यत्र वानर:॥४॥

ऋक्षराज ते मानून स्वसैन्यासह् जाउनी।
येतसे पश्चिमद्वारी हनूमान वानर जिथे॥४॥
अथायन्तं हनूमन्तं ददर्शर्क्षपतिस्तदा।
वानरै: कृतसंग्रामै:श्वसद्भिरभिसंवृतम्॥५॥
ऋक्षपति येता पाही वाटेत हनुमन्तास।
कपींसह श्रान्त युद्धाने घेति श्वास दीर्घ जे॥५॥
दृष्ट्वा पथि हनूमांश्च तदृक्षबलमुद्यतम्।
नीलमेघनिभं भीमं संनिवार्य न्यवर्तत॥६॥

अस्वलसैन्य वाटेत युद्धास्तव सज्ज पाहुनी।
हनूमान् थांबवी त्यांना फिरवी परतण्यास्तव॥६॥
स तेन सह सैन्येन संनिकर्षं महायशा:।
शीघ्रमागम्य रामाय दु:खितो वाक्यमब्रवीत्॥७॥
महायशस्वी मारुति सैन्यासह परतुनी।
रामाजवळी येउनि दु:खी होऊन वदे॥७॥
समरे युध्यमानानामस्माकं प्रेक्षतां च स:।
जघान रुदरीं सीतामिन्द्रजिद् रावणात्मज:॥८॥

रणी युद्ध करताना आम्ही असता पाहत।
वध केला रडणाऱ्या सीतेचा रावणात्मजे॥८॥
उद्भ्रान्तचित्तस्तां दृष्ट्वा विषण्णोऽहमरिंदम।
तदहं भवतो वृत्तं विज्ञापयितुमागत:॥८॥
पाहुनी हे मम चित्त भ्रमिष्ट मी विषण्ण मी।
त्यास्तव तुज हे वृत्त सांगण्यास्तव येत मी॥९॥
तस्य तद् वचनं श्रुत्वा राघव: शोकमूर्च्छित:।
निपपात तदा भूमौ छिन्नमू इव द्रुम:॥१०॥

ऐकोनि वचन त्याचे शोकाने राम मूर्च्छित।
पडे भूवरी वृक्षासम उखडॆ मुळातूनि जो॥१०॥
तं भुमौ देवसंकाशं पतितं दृश्य राघवम्।
अभिपेतु: समुत्पत्य सर्वत: कपिसत्तमा:॥११॥
देवतुल्या श्रीरामास पाहुनी पडता भूवरी।
उड्या मारत वानर सर्व धावति त्याकडे॥११॥
आसिञ्चन् सलिलैश्चैनं पद्मोत्पलसुगन्धिभि:।
प्रदहन्तमसंहार्यं सहसाग्निमिवोत्थितम् ॥१२॥

अनावर अग्नीसम जळणाऱ्या रामावर्।
उत्पलसुगन्धे युक्त सिंचती जल त्यावरी॥१२॥
तं लक्ष्मणोऽथ बाहुभ्यां परिष्वज्य सुदु:खित:।
उवाच राममस्वस्थं वाक्यं हेत्वर्थसंयुतम् ॥१३॥
दु:खी अत्यन्त लक्ष्मण रामा अस्वस्थ घेउनी।
मिठीत वदे कारण अर्थयुक्त वाक्य असे॥१३॥
शुभे वर्त्मनि तिष्ठन्तं त्वामार्य विजितेन्द्रियम्।
अनर्थेभ्यो न शक्नोति त्रातुं धर्मो निरर्थक:॥१४॥

सदैव शुभ मार्गस्थ तुम्ही विजितेन्द्रिय।
तरी न वाचवी तुम्हा धर्म त्यास्तव निरर्थक॥१४॥
भूतानां स्थावरानां च जङ्गमानां च दर्शनम्।
यथास्ति न तथा धर्मस्तेन नास्तीति मे मतिः॥१५॥
स्थावर् जंगम भूते यांचे होत दर्शन जसे।
तसा न दिसे धर्म नसे तो मज वाटते॥१५॥
यथैव स्थावरं व्यक्तं जङ्गमं च तथाविधम्।
नायमर्थस्तर्हा युक्तस्त्वद्विधो न विपद्यते॥१६॥

स्थावर जंगम स्पष्ट दिसती धर्म ना तसा।
असता तर नच पडता विपदी तुझ्यासम ॥१६॥
यद्यधर्मो भवेद् भूतो रावणो नरकं व्रजेत्।
भवांश्च धर्मसंयुक्तो नैव व्यसनमाप्नुयात्॥१७॥
जर अधर्म असता जाता नरकात रावण।
आणि झाले नसते दु:ख धर्मशील तुम्हा॥१७॥
तस्य् च व्यसनाभावाद् व्यसनं चागते त्वयि।
धर्मो भवत्यधर्मश्च परस्परविरोधिनौ॥१८॥

रावणा नसे दु:ख आणि तुम्हा होतसे।
वाटते धर्म अधर्म परस्परविरुद्ध वागती॥१८॥
धर्मेणोपलभेद् धर्ममधर्मं चाप्यधर्मत:।
यद्यधर्मेण युज्येयुर्येष्वधर्म: प्रतिष्ठित:॥१९॥
धर्माने मिळावा धर्म अधर्म अधर्माने तसा ।
भरे अधर्म ज्यांच्यात तसे फळ मिळावे तयां॥१९॥
न धर्मेण वियुज्येरन्नाधर्मरुचयो जना:।
धर्मेणाचरतां तेषां तथा धर्मफलं भवेत्॥२०॥

अधर्मी रुचि ते व्हावे धर्मापासुनी वेगळे।
धर्माने वागती त्याना मिळावे धर्माचे फळ॥२०॥
यस्मादर्था विवर्धन्ते येष्वधर्म: प्रतिष्ठित:।
क्लिश्यन्ते धर्मशीलश्च तस्मादेतौ निरर्थकौ॥२१॥
परि अधर्मे वागती त्यांचेच धन वाढ्ते।
धर्मशील भोगती क्लेश म्हणुनी दोन्ही निरर्थक॥२१॥
वध्यन्ते पापकर्माणो यद्यधर्मेण राघव।
वधकर्महतोऽधर्म: स हतं कं वधिष्यति॥२२॥

अधर्मे मारले जाती पापकर्मेच राघव।
वधकर्मे मृत अधर्म मरता कोणास मारिल॥२२॥
अथवा विहितेनायं हन्यते हन्ति चापरम्।
विधि: स लिप्यते तेन न स पापेन कर्मणा॥२३॥
किंवा विधि मारतो वा अन्याकडून मरे।
पापे लिप्त विधि होतो माणूस तो होत नसे॥२३॥
अदृष्टप्रतिकारेण् अव्यक्तेनासता सता।
कथं शक्यं परं प्राप्तुं धर्मेणारिविकर्षण॥२४॥

प्रतिकार न दिसे ज्याचा अव्यक्त जो असत्।
त्या दैवाने शत्रूचे नुकसान कैसे भरे।
परलोक धर्माने त्या मिळेल कैसा राघवा॥२४॥
यदि सत् स्यात् सतां मुख्य नासत् स्यात् तव किंचन।
त्वया यदीदृशं प्राप्तं तस्मात् तन्नोपपद्यते॥२५॥
दैव असे जर खरे तर सज्जना तुजसारख्या।
दु:ख भोगीतसे का तू असत् फल् मिळे कैसे।
म्हणून वाटते दैव कल्पना न पटे मना॥२५॥

अथवा दुर्बल: क्लीबो बलं धर्मोऽनुवर्तते ।
दुर्बलो हृतमर्यादो न सेव्य इति मे मति:॥२६॥
किंवा धर्म नपुंसक दुबळा बलास मानतो।
मर्यादा न राखी जो योग्य तो नच पाळण्या॥२६॥
बलस्य यदि चेद् धर्मो गुणभूत: पराक्रमै:।
धर्ममुत्सृज्य वर्तस्व यथा धर्मे तथा बले॥२७॥
पराक्रमे बलाधीन जर धर्म दुय्यम होतसे।
तर् सोड धर्म रहा बलात जैसा धर्मात् राहसी॥२७॥

अथ चेत् सत्यवचनं धर्म: किलपरंतप।
अनृतं त्वय्यकरणे किंन बद्धस्त्वया विना॥२८॥
जर धर्म खरा वचन हे सत्य तर तुझ्याविण।
खोटे बोलण्याने बांधला जात नसे का कोणी।
सत्याने वागून तू बद्ध मग् धर्म राहिला कुठे ॥२८॥
यदि धर्मो भवेद् भूत अधर्मो वा परंतप।
न स्म हत्वा मुनिं वज्री कुर्यादिज्यां शतक्रतु:॥२९॥
जर धर्म वा अधर्म असतील परंतप।
वज्रे ऋषीस मारूनी इन्द्र न करता यज्ञ ॥२९॥

अधर्मसंश्रितो धर्मो विनाशयति राघव।
सर्वमेतद् यथाकामं काकुत्स्थ कुरुते नरः॥३०॥
अधर्माधारित धर्म करी विनाश राघवा।
त्यामुळे नर वागतो मनाप्रमाणे आपल्या॥३०॥
मम चेदं मतं तात धर्मोऽयमिति राघव।
धर्ममूलं त्वया छिन्नं राज्यमुत्सृजता तदा॥३१॥
राघवा मत हे माझे जर हा धर्म असेल।
छेदिलेस धर्माचे मूळ देता तू राज्य सोडुनी॥३१॥

अर्थेभ्योऽथ प्रवृद्धेभ्य: संवृत्तेभ्यस्ततस्तत:।
क्रिया: सर्वा: प्रवर्तन्ते पर्वतेभ्य इवापगा:॥३२॥
जश्या पर्वतापासून नद्या वाहति त्यापरी।
क्रिया घडती सर्व संचित अर्थापासुनी॥३२॥
अर्थेन हि विमुक्तस्य पुरुषस्याल्पचेतस:।
विच्छिद्यन्ते क्रिया: सर्वा ग्रीष्मे कुसरितो यथा॥३३॥
नष्ट होति क्रिया सर्व नराच्या अल्पबुद्धि जो।
जसे ग्रीष्म ऋतूमध्ये ओढे नाले आटती॥३३॥

सोऽयमर्थं परित्यज्य सुखकाम: सुखैधित:।
पापमाचरते कर्तुं तदा दोष: प्रवर्ततए॥३४॥
जो सोडुनिया अर्थ सुखाची इच्छा करीतसे।
तेव्हां करीतसे पाप दोष निर्माण होई तदा॥३४॥
यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवा:।
यस्यार्था: स पुमांल्लोके यस्यास्था: स पण्डित:॥३५॥
अर्थ ज्यापाशी तया मित्र असती त्यास बान्धव।
धन ज्यापाशि तो खरा पुरुष पंडितही तो तसा॥३५॥

यस्यार्थाः स च विक्रान्तो यस्यार्थाः स च बुद्धिमान्।
यस्यार्थाः स महाभागो यस्यार्थाः स गुणाधिकः॥३६॥
धन ज्यापाशि तोच विक्रान्त असे तोच बुद्धिमान्।
अर्थ ज्यापाशी तो महाभाग गुणांनीहि अधिक तो॥३६॥
अर्थस्यैते परित्यागे दोषाः प्रव्याहृता मया।
राज्यमुत्सृजता धीर येन बुद्धिस्त्वया कृता॥३७॥
अर्थत्यागे लागती जे दोष सांगितले तुज।
राज्या सोडसी बुद्धीने ज्या त्यामुळे येति सर्व हे॥३७॥

यस्यार्था धर्मकामार्थास्तस्य सर्वं प्रदक्षिणम्।
अधनेनार्थकामेन नार्थ: शक्यो विचिन्वता॥३८॥
असे धन ज्याच्यापाशी धर्म अर्थ काम तया।
मिळती निर्धना अर्थ न मिळे इच्छा असुनही॥३८॥
हर्ष कामश्च दर्पश्च धर्म: क्रोध: शमो दम:।
अर्थादेतानि सर्वाणि प्रवर्तन्ते नराधिप:॥३९॥
हर्ष काम गर्व धर्म क्रोध इन्द्रियनिग्रह ।
धनापासुनि प्रवृत्त होती सर्व नराधिपा॥३९॥

येषां नश्यत्ययं लोकश्चरतां धर्मचारिणाम्।
तेऽर्थास्त्वयि न दृश्यन्ते दुर्दिनेषु यथा ग्रहाः॥४०॥
हा लोक नष्ट न व्हावा त्यास जे अर्थ लागते।
न दिसती तुजपाशी जसे ग्रह ढगांमुळे॥४०॥
त्वयि प्रव्रजिते वीर गुरोश्च वचने स्थिते ।
रक्षसापहृता भार्या प्राणौ प्रियतरा तव॥४१॥
वडिलांच्या वचनास्तव जाशी तू राज्य सोडुनी।
प्राणाहुनि प्रिय भार्या तुझी पळवी राक्षस॥४१॥

तदद्य् विपुलं वीरं दु:खमिन्द्रजिता कृतम्।
कर्मणा व्यपनेष्यामि तस्मदुत्तिष्ठ राघव॥४२॥
म्हणुनी इन्द्रजिताने निर्माण केले दु:ख जे।
करीन दूर मम कर्मे म्हणूनि ऊठ राघवा॥४२॥
उत्तिष्ठ नरशार्दूल दीर्घबाहो धृतव्रत।
किमात्मानं महात्मानमात्मानं नावबुध्यसे॥४३॥
दीर्घबाहु व्रतधारी नरश्रेष्ठा उठी मग।
असूनिया महात्मा का न जाणसि तू स्वतां॥४३॥

अयमनघ तवोदित: प्रियार्थं जनकसुतानिधनं निरीक्ष्य रुष्ट:।
सरथगजहयां सराक्षसेन्द्रां भृशमिषुभिर्विनिपातयामि लङ्काम्॥४४॥
निष्पापा हे तव प्रियार्थ उठलो मी क्रोधित पाहुनि जनकसुतावध।
रथ हत्ती गज राक्षसराजासहित् करीन लंका नष्ट मम बाणांनी॥४४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे त्र्यशीतितम: सर्ग:॥८३॥

युद्धकाण्ड सर्ग् ८४

रामम्माश्वासमाने तु लक्ष्मणे भ्रातृवत्सले।
निक्षिप्य गुल्मान् स्वस्थाने तत्रागच्छत् बिभीषण:॥१॥
लक्ष्मण बन्धुप्रेमे सान्त्वन रामाचे करिता।
सैन्यबल योग्य स्थानी घेऊनि येई बिभीषण॥१॥
नानाप्रहरणैवीरैश्चतुर्भिरभिसंवृत:।
नीलाञ्जनचयाकारैर्मातंगैरिव यूथपै:॥२॥

नाना प्रकारची शस्त्रे धारण करणारे तसे।
शत्रूंना भयभीत करणाऱ्या यूथपतींनी।
काळ्या काजळासम दिसणाऱ्या हत्तींच्या।
वीरांनी बिभीषण असलेला वेढलेला॥२॥

सोऽभिगम्य महात्मानं राघवं शोकलालसम्।
वानरांश्चापि ददृशे बाष्पपर्याकुलैक्षणाम्॥३॥

तेथे जाउनि तो पाही शोकव्याकुळ राघवा।
तसेच वानरांना अश्रु डोळ्यात असती तयां॥३॥

राघवं च महात्मानमिक्ष्वाकुकुलनन्दनम्।
ददर्श मोहमापन्न् लक्ष्मणस्याङ्कमाश्रितम्॥४॥
इक्ष्वाकुकुलनन्दना राघवा मूर्च्छित पाही ।
मांडीवरी लक्ष्मणाच्या ज्याने डोके ठेवले॥४॥
पीडितं शोकसंतप्तं दृष्ट्वा रामं बिभीषण:।
अन्तर्दु:खेन दीनात्मा किमेतदिति सोऽब्रवीत्॥५॥
शोके संतप्त झालेल्या पीडित रामास पाहुनी।
बिभीषण मनी दु;खी वदे हे काय जाहले॥५॥

बिभीषणमुखं दृष्ट्वा सुग्रीवं तांश्च वानरान्।
लक्ष्मणोवाच मन्दार्थमिदं बाष्पपरिप्लुत:॥६॥
पाहुनी बिभीषण मुख् आणि पाहूनि वानरां।
डोळ्यात् अश्रु आलेला लक्ष्मण हळू बोलला॥६॥
हता इन्द्रजिता सीता इतिश्रुत्वैवं राघव:।
हनूमद्वचनात् सौम्य ततो मोहमुपाश्रित:॥७॥
वधी सीतेस इन्द्रजित् ऐसे वदता मारुति।
ऐकताच हे सौम्य श्रीराम मूर्च्छित होतसे॥७॥

कथयन्तं तु सौमित्रिं संनिवार्य बिभीषण:।
पुष्कलार्थमिदं वाक्यं विसंज्ञं राममब्रवीत्॥८॥
हे सांगता लक्ष्मणाला थाम्बवून बिभीषण ।
मूर्च्छित रामास वाक्य अर्थपूर्ण तो बोलला॥८॥
मनुजेन्द्रार्तरूपेण यदुक्तस्त्वं हनूमता।
तदयुक्तमहं मन्ये सागरस्येव शोषणम्॥९॥
दु:खाने व्याकुळ रामा जे वदला मारुति।
मला ते वाटे अशक्य सागर आटवण्यासम॥९॥

अभिप्रायं तु जानामि रावणस्य दुरात्मन:।
सीतां प्रति महाबाहो न च घातं करिष्यति॥१०॥
मी दुरात्मा रावणाचा महाबाहो हेतु जाणतो।
सीतेचा घात निश्चित ऐसा करणार नसे ॥१०॥
याच्यमान: सुबहुशो मया हितचिकीत्षुणा।
वैदेहीमुत्सृजस्वेति न तत् कृतवान् वच:॥११॥
त्याच्या हितास्तव केली याचना मी अनेकदा।
वैदेहीस सोडण्याची परि त्याने न केले तसे॥११॥

नैव साम्ना न दानेन न भेदेन कुतो युधा।
सा द्रष्टुमपि शक्येत नैव चान्येन केनचित॥१२॥
साम दान वा भेदाने युद्धानेहि न शक्य जे।
पाहणेसुद्धा सीतेस येवढी ती सुरक्षित॥१२॥
वानरान् मोहयित्वा तु प्रतियात: स राक्षस:।
मायामयी महाबाहो तां विद्धि जनकात्मजाम्॥१३॥
इन्द्रजित करुनि मोहित वानरां परत जातसे।
ती जनककन्या मायामय होती जाण हे॥१३॥

चैत्यं निकुम्भिलामाद्य प्राप्य होमं करिष्यति।
हुतवानुपयतो हि देवैरपि सवासवै:॥१४॥
चैत्यवृक्षापाशी निकुम्भिला नाम आज तो।
करेल ज्यामुळे होईल इन्द्रासहि अजिंक्य तो॥१४॥
दुराधार्षो भवत्येष संग्रामे रावणात्मज:।
तेन मोहयिता नूनमेषा माया प्रयोजिता॥१५॥
संग्रामात दुराघर्ष रावणपुत्र म्हणून तो।
योजिली माया त्याने मोहात पाडण्या आम्हा॥१५॥

विघ्नमन्विच्छता तत्र वानराणां पराक्रमे।
ससैन्यास्तत्र गच्छामो यावत्तन्न समाप्यते॥१६॥
विघ्न आणण्याच्या इच्छेने वानरांच्या पराक्रमी।
होम पूर्ण होण्यापूर्वी ससैन्य जाउया तिथे॥१६॥
त्यजैनं नरशार्दूल मिथ्या संतापमागतम्।
सीदते हि बलं सर्वं दृष्ट्वा त्वां शोककर्शितम्॥१७॥
निथ्या संताप सोडी आलेला नरशार्दुला।
पाहुनि तुज शोकात खचते बल सैन्याचे॥१७॥

इह त्वं स्वस्थहृदयस्तिष्ठ सत्त्वसमुच्छ्रित:।
लक्ष्मणं प्रेषयास्माभि: सह सैन्यानुकर्षिभि:॥१८॥
धैर्याने युक्त होऊन थाम्ब स्वस्थचित्ते इथे।
लक्ष्मणा सैन्यासह पाठव तू आम्हासवे॥१८॥
एष तं नरशार्दूलो रावणि निशितै: शरै:।
त्याजयिष्यामि तत्कर्म ततो वध्यो भविष्यति॥१९॥
लक्ष्मण रावणपुत्रा तीक्ष्ण बाणे परावृत।
होमापासुनि करता तेव्हां तो वध्य होइल॥१९॥

तस्यैते निशितास्तीक्ष्णा: पत्रिमताड्ग्वाजिन:।
पतत्त्रिण इवासौम्या: सरा: पास्यन्ति शोणितम्॥३०॥
वेगवान् पक्ष्यासम पिसासह तीक्ष्ण बाण।
लक्ष्मणाचे पितील् रक्त इन्द्रजिताचे सौम्य हे॥३०॥
तत् संदिश महाबाहो लक्ष्मणं शुभलक्षणम्।
राक्षसस्य विनाशाय वज्रं वज्रधरो यथा॥२१॥
इन्द्र वज्रास जसा सोडी तसा शुभलक्षणी ।
आज्ञापी लक्ष्मणा राक्षसविनाशास्तव॥२१॥

मनुजवर न कालविप्रकर्षोरिपुनिधनं प्रति यत्क्षमोऽद्य कर्तुम्।
त्वमतिसृज रिपोर्वधाय वज्रं दिविजरिपोर्मथनै यथा महेन्द्रः॥२२॥
मनुजश्रेष्ठा न करि कालविलम्ब शत्रुवधा आज असे शक्य जे।
देवशत्रुवधा महेन्द्र जसा वज्रा पाठवी तसा तू पाठव लक्ष्मणा॥२२॥
समाप्तकर्मा हि स राक्षसर्षभो भवत्य समरे सुरासुरैः।
युयुत्सतां तेन समाप्तकर्मणा बवेत् सुराणामपि संशयो महान्॥२३॥
समाप्त होमान्तर राक्षसश्रेष्ठ तो अदृश्य रणात सुरासुरांसही।
युद्ध करण्याची इच्छा त्यानन्तर करता देवानाही अशक्य होइल॥२३॥
इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये श्रीमद्युद्धकाण्डे चतुरशीतितमः सर्गः॥८४॥

युद्धकाण्ड सर्ग ८५

तस्य तद् वचनं श्रुत्वा राघव: शोककर्षित:।
नोपधारयते व्यक्तं यदुक्तं तेन रक्षसा॥१॥
त्याचे वचन ऐकोनी शोकग्रस्त झाल्यामुळे।
समजूनि घेण्या स्पष्ट शक्य न तया होतसे॥१॥
ततो धैर्यमवष्टभ्य राम: परपुरंजय:।
बिभीषणमुपासीनमुवाच कपिसंनिधौ॥२॥

शत्रुनगरे जिंकणाऱ्या रामाने धरुनी धैर्य।
जो असे वानरसान्निध्ये म्हटले त्या बिभीषणा ॥२॥
नैर्ऋताधिपते वाक्यं यदुक्तं ते बिभीषण।
भूयस्तच्छ्रोतुमिच्छामि ब्रूहि यत्ते विवक्षितम्॥३॥
राक्षसाधिपति वाक्य बोललासी बिभीषणा।
तुज काय म्हणायाचे पुन्हा सांग तू मज॥३॥
राघवस्य वच: श्रुत्वा वाक्यं वाक्यविशारद:।
यत् तत् पुनरिदं वाक्यं बभाषेऽथ बिभीषण:॥४॥

ऐकूनि राघव बोल बिभीषण वाक्यविशारद।
पूर्वी जे बोलला वाक्य तेच पुन्हा बोलला॥४॥
यथाऽऽज्ञप्तं महाबाहो त्वया गुल्मनिवेशनम्।
त तथानुष्ठितं वीर त्वद्वाक्यसमनन्तरम्॥५॥
हे महाबाहो तू जशी रचना सुचविली असे।
सैन्याची तशी केलेली आज्ञेप्रमाणे तुझ्या असे ॥५॥
तान्यनीकानि सर्वाणि विभक्तानि समन्ततः।
विन्यस्ता यूथपाश्चैव यथान्यायं विभागशः॥६॥

विभागुनि सर्व सैन्ये असती ती चहुबाजूस।
नियुक्त केले असती योग्य यूथपती तिथे॥६॥
भूयस्तु मम विज्ञाप्यं तच्छ्रुणुष्व महाप्रभो।
त्व्य्यकारणसंतप्ते संतप्तहृदया वयम्॥७॥
महाप्रभो ऐक माझी विनन्ति एक आणखी।
विनाकारण संतप्त तू होता आम्हीही तसे।
त्यज राजन्निमं शोकं मिथ्या संतापमागतम्।
यदियं त्यजतां चिन्ता शत्रुहरशविवर्धिनी॥८॥

सोड राजन् हा शोक संतापरूपी मिथ्या।
चिन्ता दे सोडुनी हर्ष शत्रूस असे देत जी॥८॥
उद्यम: क्रियतां वीर हर्ष: समुपसेव्यताम्।
प्राप्तव्या यदि ते सीता हन्तव्याश्च निशाचरा:॥९॥
उत्साहाने कर उद्योग वीरा हर्ष धारण।
आवश्यक राक्षसांचा वध सीता मिळावया॥९॥
रघुनन्दन वक्ष्यामि श्रूयतां मे हितं वच:।
साध्वयं यातु सौमित्रिर्बलेन महता वृत:॥१०॥

बोलतो मी हितकारी बोल हे रघुनन्दन।
मोठ्या सैन्यासह सौमित्र त्वरीत जावया हवा॥१०॥
निकुम्भिलायां सम्प्राप्तं हन्तु रावणिमाहवे।
धनुर्मण्डलनिर्मुक्तैराशीविषविषोपमै:॥११॥
मारण्या रावणपुत्रा गेलेल्या निकुम्भिलास।
विषारी सर्पासम बाण धनुमण्डलातून् ॥११॥
शरैर्हन्तुं महेष्वासो रावणिं समितिंजय:।
तेन वीरेण तपसा वरदानात् स्वयंभुव;।

अस्त्रं ब्रह्मशिर: प्राप्तं कामगाश्च तुरङ्गमा:॥१२॥
मारो रावणपुत्रास महाधनुर्धारी लक्ष्मण।
ब्रह्मदेव तपस्येने त्याने प्राप्त केले असे।
ब्रह्मशिरस् अस्त्र ते अश्व इच्छागामी तसे॥१२॥\
स एष किल सैन्येन प्राप्त: किल निकुम्भिलाम्।
यद्युत्तिष्ठेत् कृतं कर्म हतान् सर्वांश्च विद्धि न:॥१३॥
तो सैन्यासह पोचला निकुम्भिला येथे असे।
जर यज्ञ करी पूर्ण कार्य सिद्धि तो पावला।
तर मग मृत सारे जाहलो समज आपण॥१३॥

निकुम्भिलामसम्प्राप्तमकृताग्निं च यो रिपु:।
त्वामाततायिनं हन्यादिन्द्रशत्रो स ते वध:॥१४॥
निकुम्भिला न पोचून् अग्नीस देता न आहुति।
तेव्हांच वधणे शक्य इन्द्रशत्रूस ते आम्हा॥१४॥
वरो दत्तो महाबाहो सर्वलोकेश्वरेण वै ।
इत्येवं विहितो राजन् वधस्तस्यैष धीमत:॥१५॥
ब्रह्मदेवाने दिलेला वर त्या त्यामुळे त्याच्या।
वधाचा उपाय हाच नियोजित केलेला असे ॥१५॥

वधायेन्द्रजितो राम संदिशस्व महाबलम्।
हते तस्मिन् हतं विद्धि रावणं ससुहृदगणम्॥१६॥
इन्द्रजित वधास्तव रामा आज्ञापी लक्ष्मणा।
मरता तो समज मेलाच रावण सुहृदजनांसह॥१६॥
बिभीषणवचः श्रुत्वा रामो वाक्यमथाब्रवीत्।
जानामि तस्य रौद्रस्य मायां सत्यपराक्रम॥१७॥
ऐकता बिभीषणवच जाणतो राम त्या म्हणे।
भयंकर इन्द्रजिताची माया सत्यपराक्रमा॥१७॥

स हि ब्रह्मास्त्रवित् प्राज्ञो महामायो महाबल:।
करोत्यसंज्ञान् संग्रामे गेवान् सवरुणानपि॥१८॥
ज्ञानी ब्रह्मास्त्र जाणे तो मायावी नि महाबली।
करतो युद्धात बेशुद्ध देवांना वरुणासह ॥१८॥
तस्यान्तरिक्षे चरत: सरथस्य महायश:।
न गतिर्ज्ञायते वीर सूर्यस्येवाभ्रसम्प्लवे॥१९॥
आकाशी संचारणाऱ्या गति त्याची रथासह्।
न कळे जशी वीरा सूर्याची अभ्राच्छादित॥१९॥

राघवस्तु रिपोर्ज्ञात्वा मायावीर्यं दुरात्मन:।
लक्ष्मणं कीर्तिसम्पन्नमिदं वचनमब्रवीत्॥२०॥
त्य दुरात्मा शत्रुचे मायाबल जाणुनी ।
राघव म्हणे लक्ष्मणा कीर्तिमान ऐसे वच॥२०॥
यद् वानरेन्द्रस्य बलं तेन सर्वेण संवृत:।
हनूमत्प्रमुखैश्चैव यूथपै: सह लक्ष्मण॥२१॥
सैन्य वानरराजाचे आणि यूथपतींसह
हनुमान प्रमुख ज्यां लक्ष्मणा जासि तू॥२१॥

जाम्बवेनर्क्षपतिना सह सैन्येन संवृत:।
जहि तं राक्षससुतं मायाबलसमन्वितम्॥२२॥
ऋक्षपति जाम्बवान संगे सैन्यासह वेढुनी।
मायाबलयुक्त त्या राक्षसपुत्रास मार तू॥२२॥
अयं त्वां सचिवै: सार्धं महात्मा रजनीचर:।
अभिज्ञस्तस्य मायानां पृष्ठतोऽनुगमिष्यति॥२३॥
रजनीचर महात्मा हा माया जाणे त्याचि जो।
मन्त्र्यांसह त्याच्या तुझ्यामागून येइल ॥२३॥

राघवस्य वचः श्रुत्वा लक्ष्मणः सविभीषणः।
जग्राह कार्मुकश्रेष्ठमन्यद भीमपराक्रमः॥२४॥
राघवाचे ऐकुनि बोल भीमपराक्रमी लक्ष्मण।
बिभीषणासह श्रेष्ठ दुसरे धनुष्य घेतसे ॥२४॥
संनद्धः कवची खड्गी सशरी वामचापभृत्।
रामपादावुपस्पृश्य हृष्टः सौमित्रिरब्रवीत्॥२५॥
कवचासह खड्गधारी बाणासह वामहस्ते।
धनुष्यधारी लक्ष्मण आनंदित होउनिया।
करुनी चरणस्पर्श रामास वदला असे॥२५॥

अद्य् मत्कार्मुकोन्मुक्ता: शरा निर्भिद्य रावणिम्।
लङ्कामभिपतिष्यन्ति हंसा पुष्करिणीमिव॥२६॥
धनुष्यातील मम बाण इन्द्रजितास भेदुनी।
जातील लंकेवरी जसे हंस पुष्करिणीवरी॥२६॥
अद्यैव तस्य रौद्रस्य शरीरं मामका: शरा:।
विधमिष्यन्ति भित्त्वा तं महाचापगुणच्युता:॥२७॥
धनुष्यातुन मम आज सुटलेले बाण भेदुनी।
शरीरा इन्द्रजिताच्या करतील क्षतविक्षित॥२७॥

एवमुक्त्वा तु वचनं द्युतिमान् भ्रातुरग्रतः।
स रावणिवधाकांक्षी लक्ष्मणस्त्वरितं ययौ॥२८॥

असे वचन बोलून तेजस्वी तो बन्धूपुढे।
इन्द्रजित वधाकांक्षी लक्ष्मण त्वरेने निघे॥२८॥

सोऽभिवाद्य गुरोः पादौ कृत्वा चापि प्रदक्षिणम्।
निकुम्भिलामभिययौ चैत्यं रावणिपालितम्॥२९॥

वंदुनी गुरुचरणा त्या घालुनिया प्रदक्षिणा।
लक्ष्मण निकुम्भिला चैत्या जाई रावणिरक्षित॥२९॥

विभीषणेन सहितो राजपुत्रः प्रतापवान्।
कृतस्वस्त्ययनो भ्रात्रा लक्ष्मणस्त्वरितो ययौ॥३०॥
स्वस्तिवाचन करता रामे निघे त्वरेने ।
लक्ष्मण प्रतापवान् निघे बिभीषणासह ॥३०॥
वानरानां सहस्त्रैस्तु हनूमान् बहुभिर्वृतः।
बिभीषणश्च सामात्यो लक्ष्मणं त्वरितं ययौ ॥३१॥
सहस्त्र वानरे आवृत्त हनूमान् आणि त्यासवे।
बिभीषण मंत्रिगणांसह जाती लक्ष्मणासवे॥३१॥

महता हरिसैन्येन सवेगमभिसंवृत:।
ऋक्षराजबलं चैव ददर्श पथि विष्ठितम्॥३२॥
मोठ्या वानरसैन्यासह वेगे जाता लक्ष्मण।
ऋक्षराज जाम्बवाना सैन्यासह मार्गी पाहतो॥३२॥
स गत्वा दूरमध्वानं सौमित्रिर्मित्रनन्दन:।
राक्षसेन्द्रबलं दूरादपश्यद् व्यूहमाश्रितम्॥३३॥
दूर जाउनि सौमित्री मित्रा आनंद देणारा।
व्यूह रचुनी उभे राक्षससैन्या पहातसे॥३३॥

स सम्प्राप्य धनुष्पाणिर्मायायोगदरिंदमः।
तस्थौ ब्रह्मविधानेन विजेतुं रघुनन्दनः॥३४॥
लक्ष्मण धनुष्य हाती मायायोगे जाई तिथे।
ब्रह्मविधानापरी विजयास्तव राही उभा॥३४॥
विभीषणेन सहितो राजपुत्रः प्रतापवान्।
अङ्गदेन च वीरेण तथानिलसुतेनच॥३५॥
विभीषण अङ्गदासह राजपुत्र प्रतापवान्।
तैसा वायुपुत्र मारुतीसह जाउनी तेथे उभा॥३५॥

विविधममलशस्त्रभास्वरं तद् ध्वजगहनं महारथैश्च।
प्रतिभयतममप्रमेयवेगं तिमिरमिव द्विषतां बलं विवेश॥३६॥
विविध निर्मल शस्त्रे तेजस्वी ध्वजयुक्तमहारथिंनी भरलेले।
वेग भयंकर अमर्याद शत्रुसैन्यात प्रवेशी जणु अन्ध:कारी॥३६॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे पञ्चाशीतितम:सर्ग:॥८५॥

युद्धकाण्ड सर्ग ८६

अथ तस्यामवस्थायां लक्ष्मणं रावणानुज:।
परेषामहितं वाक्यमर्थसाधकमब्रवीत्॥१॥
तेव्हा त्या अवस्थेत लक्ष्मणा रावणबन्धु।
अहितकारी शत्रूना स्वकार्यसाधक वच म्हणे॥१॥
यदेतद् राक्षसानीकं मेघश्यामं विलोक्यते।
एतदायोध्यतां शीघ्रं कपिभिश्च शिलायुधै:॥२॥

मेघासम श्यामवर्णी राक्षससैन्य जे हे दिसे।
शिलांनी युद्ध करावे वानरांनी त्यांच्यासवे ॥२॥
तस्यानीकस्य महतो भेदने यत् लक्ष्मण।
राक्षसेन्द्रसुतोऽप्यत्र भिन्ने दृश्यो भविष्यति॥३॥
प्रयत्न कर लक्ष्मणा भेदण्या मोठे सैन्य ते।
ज्यामुळे दिसू लागेल रावणपुत्र इंद्रजित॥३॥
स त्वमिन्द्राशनिप्रख्यै: शरैरवकिरन् परान्।
अभिद्रवाशु यावद् वै नैतत् कर्म समाप्यते॥४॥

टाक झाकुनि शत्रूंना बाणांनी इन्द्रवज्रासम।
यज्ञसमाप्तीपूर्वी हल्ला त्याच्यावरि करी ॥४॥
जहि वीर दुरात्मानं मायापरमधार्मिकम्।
रावणिं क्रूरकर्माणं सर्वलोकभयावहम्॥५॥
अधार्मिक क्रूरकर्मा मायानिपुण दुरात्मा ।
भयकारी सर्व लोकां मार रावणपुत्रास॥५॥
विभीषणवच: श्रुत्वा लक्ष्मण: शुभलक्ष्मण:।
ववर्ष शरवर्षेण राक्षसेन्द्रसुतं प्रति॥६॥

विभीषण वच ऐकोनि शुभलक्ष्मण लक्ष्मण।
करी तो शरवर्षाव राक्षसेन्द्रसुतावर॥६॥
ऋक्षा: शाखामृगाश्चैव द्रुमप्रवरयोधिन:।
अभ्यधावन्त सहितास्तदनीकमवस्थितम्॥७॥
वृक्ष हेच श्रेष्ठ शस्त्र असलेले ऋक्ष वानर।
जाती धावुनि एकत्र राक्षससैन्यावरी उभ्या॥७॥
राक्षसाश्च शितैर्बाणैरसिभि: शक्तितोमरै:।
अभ्यवर्तन्त समरे कपिसैन्यजिघांसव:॥८॥

तलवारी तीक्ष्ण बाण शक्तितोमर घेउनी।
वधण्या राक्षससैन्या समोर येती राक्षस॥८॥
स सम्प्रहारस्तुमुल: संजज्ञे कपिरक्षसाम्।
शब्देन महता लंका नादयन् वै समन्तत:॥९॥
होतसे तुम्बळ युद्ध राक्षसवानरांमधे ।
ज्यांच्या मोठ्या गर्जनेने लंका जाई दणाणुनि॥९॥
शस्त्रैश्च विविधाकारै: शितैर्बाणैश्च पादपै:।
उद्यतैर्गिरिशृङ्गैश्च घोरैराकाशमावृतम्॥१०॥

विविधाकार शस्त्रांनी तीक्ष्ण बाण वृक्षे तशी।
पर्वतशिखरे घोर जाई आकाश झाकुनी ॥१०॥
राक्षसा वानरेन्द्रेषु विकृताननबाहव:।
निवेशयन्त: शस्त्राणि चक्रुस्ते सुमहद्भयम्॥११॥
वानरांवर शस्त्रांचा विकृत मुख बाहु राक्षस।
मारा करुनी निर्माण करती अतिमोठे भय॥११॥
तथैव सकलैर्वृक्षैर्गिरिशृङ्गैश्च वानरा:।
अभिजघ्नुर्निजघ्नुश्च समरे सर्वराक्षसान्॥१२॥

वानरांनी सुद्धा सर्व वृक्षपर्वतशिखरांसह।
राक्षसांवर प्रहार करुनी ठार् त्याना मारले॥१२॥
ऋक्षवानरमुख्यैश्च महाकायैर्महाबलै:।
रक्षसां युद्धमानानां महद्भयमजायत॥१३॥
ऋक्षवानरमुख्य महाकाय महाबल।
लढता त्यांच्याशी भय राक्षसां वाटु लागले॥१३॥
स्वमनीकं विषण्णं तु श्रुत्वा शत्रुभिरर्दितम्।
उदतिष्ठत दुर्घर्ष: स कर्मण्यननुष्ठिते॥१४॥

स्वसैन्य पीडित खिन्न जाहले ऐकूनि हे।
न पूर्ण करता यज्ञ कर्म इन्द्रजित् उठे ॥१४॥
वृक्षान्धकारान्निर्गत्य जातक्रोध: स रावणि:।
आरुरोह रथं सज्ज पूर्वयुक्तं सुसंयतम्॥१५॥
वृक्षान्धकारातून निघे क्रोधाने रावणपुत्र तो।
आणि सज्ज कृत पूर्वी आरूढ रथी होतसे॥१५॥
स भीमकार्मुकशर: कृष्णाञ्जनचयोपम:।
रक्तास्यनयनो भीमो बभौ मृत्युरिवान्तक:॥१६॥

महाधनुष्यासह कृष्ण अञ्जन राशिसम।
लाल मुख नेत्र दिसे काळरूपी मृत्युसम॥१६॥
दृष्ट्वैव तु रथस्थं तं पर्यवर्तत तद् बलम्।
रक्षसा भीमवेगानां लक्ष्मणेन युयुत्सताम्॥१७॥
पाहुनि रथी बसता त्या उत्सुक युद्ध कराया।
वेगवान राक्षसांचे ते एकत्र सैन्य जमे ॥१७॥
तस्मिंस्तु काले हनुमानरुजत् स दुरासदम्।
धरणीधरसंकाशो महावृक्षमरिंदमः॥१८॥

तेव्हांच पर्वतासम हनुमाने महावृक्ष ।
पोचण्या कठिण ऐसा काढिला उपटूनिया॥१८॥
स राक्षसानां तत् सैन्यं कालग्निरिव निर्दहन्।
चकार बहुभिर्वृक्षैर्नि:संज्ञं युधि वानर:॥१९॥
कालरूपी अग्नीसम राक्षससैन्या मारुती।
अनेक वृक्षांनी युद्धात निष्प्राण त्यां करीतसे॥१९॥
विध्वंसयन्तं तरसा दृष्ट्वैव पवनात्मजं।
राक्षसानां सहस्राणि हनूमन्तमवाकिरन्॥२०॥

वेगे विध्वंस करणाऱ्या पाहुनी पवनात्मजा।
करती सहस्र राक्षस शस्त्रवर्षाव त्यावरी ॥२०॥
शिलशूलधरा: शूलैरसिभिश्चासिपाणय:।
शक्तिहस्ताश्च शक्तीभि: पट्टिशै: पत्तिशायुधा:॥२१॥
परिघैश्च गदाभिश्च कुन्तैश्च शुभदरशनै:।
शतशश्च शतग्नीभिरायसैरपि मुद्गरै:॥२२॥
घोरै: परशुभिश्चैव भिन्दिपालैश्च राक्षसा:।
मुष्टिभिर्वज्रकल्पैश्च तलैरशनिसंनिभै:॥२३॥

त्रिशूळधारी त्रिशूळांनी खड्गधारि खड्गांनी।
भाल्यांनी तसेच पट्टिशांनी हल्ला करति ते॥२१॥
परिघ गदा सुन्दर् भाले शतघ्नी शेकडो।
तसेच लोखंडी मुद्गर वापरती त्यासवे ॥२२॥
भिन्दिपाल भयंकर वज्रासम मुष्टि तश्या।
वज्रासम थापडांनी प्रहार करती ते तसे॥२३॥
अभिजघ्नु: समासाद्य समन्तात् पर्वतोपमम्।
तेषामपि च संक्रुद्धश्चकार कदनं महत्॥२४॥

पर्वतासम घेरुनी सर्व बाजूंनी त्या मारती।
हनूमंतहि क्रुद्ध तदा महासंहार त्यांचा करी॥२४॥
स ददर्श कपिश्रेष्ठमचलोपममिन्द्रजित्।
सूदमानमसंत्रस्तममित्रान् पवनात्मजम् ॥२५॥
पाहिले इन्द्रजिताने पर्वतासम पवनात्मजा।
करी जो न घाबरता शत्रूंचा संहार महा॥२५॥
स सारथिमुवाचेदं याहि यत्रैष वानरः।
क्षयमेव हि नः कुर्याद् राक्षसानामुपेक्षितः॥२६॥

सारथ्यास म्हणे नेई रथ जेथे तो वानर।
दुर्लक्ष करता नाश करेल राक्षसांचा हा ॥२६॥
इत्युक्त: सारथिस्तेन ययौ यत्र स मारुति:।
वहन् परमदुर्घर्षं स्थितमिन्द्रजितं रथे॥२७॥
तेव्हां सारथी रथात बसलेल्या इन्द्रजिता ।
परमदुर्घर्ष जातसे घेउनी जेथ मारुती ॥२७॥
सोऽभ्युपेत्य शरान् खड्गान् पट्टिशांश्च परश्वधान्।
अभ्यवर्षत दुर्धर्ष: कपिमूर्धनि राक्षस:॥२८॥

जाउनी तेथ शर खड्ग परशु आणि पट्टिश।
मारुतीवर वर्षाव दुर्धर्ष इन्द्रजित् करी॥२८॥
तानि शस्त्राणि घोराणि प्रतिगृह्य स मारुतिः।
रोषेण महताविष्टो वाक्यं चेदमुवाच ह॥२९॥
ती भयंकर शस्त्रे सहन करुनी मारुती।
क्रोधाने व्याप्त होऊनि त्या वाक्य ऐसे बोलला॥२९॥
युधस्व यदि शूरोऽसि रावणात्मज दुर्मते।
वायुपुत्रं समासाद्य न जीवन प्रतियास्यसि॥३०॥

दुर्बुद्धि रावणपुत्रा अससी शूर तरी लढ।
वायुपुत्रा पुढे जाता राहसी न जिवन्त तू ॥३०॥
बाहुभ्यां सम्प्रयुध्यस्व यदि मे द्वंद्वमाहवे।
वेगं सहस्व दुर्बुद्धे ततस्त्वं रक्षसां वर:॥३१॥
बाहूंनी करसी युद्ध जर द्वंद्व करु पाहसी।
कर वेग सहन माझा तेव्हां राक्षसश्रेष्ठ तू॥३१॥
हनूमंतं जिघासन्तं समुद्यतशरासनम्।
रावणात्मजमाचष्टे लक्ष्मणाय विभीषण:॥३२॥

वधण्यास हनुमन्ता इच्छी रावणपुत्र जो। ।
दाखवी धनुष्यासह लक्ष्मणा त्या विभीषण ॥३२॥
यः स वासवनिर्जेता रावणस्यात्मसंभवः।
स एष रथमास्थाय् हनूमन्तं जिघांसति॥३३॥
इन्द्रास जिंकणारा जो रावणपुत्र रथामध्ये।
आरूढ होउनी इच्छी हनूमन्तास मारण्या॥३३॥
तमप्रतिमसंस्थानैः शरैः शत्रुनिवारणैः।
जीवितान्तकरैर्घोरैः सौमित्रे रावणिं जहि॥३४॥

सौमित्रे शत्रुनाशी तू जीवान्तक भयंकर।
अनुपम तव बाणांनी रावणपुत्रा तू वध॥३४॥
इत्येवमुक्तस्तु तदा महात्मा विभीषणेनारिविभीषणेन।
ददर्श तं पर्वतसंनिकाशं रथस्थितं भीमबलं दुरास्दम्॥३५॥
शत्रूस भय देणाऱ्या बिभीषणाने सांगता महात्मा लक्ष्मण।
पाहतसे पर्वतासम रथी स्थित जिंकण्या कठिण इन्द्रजिता॥३५॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे षडशीतितम:सर्ग:॥८६॥

युद्धकाण्ड सर्ग ८७

एवमुक्त्वा तु सौमित्रिं जातहर्षो विभीषण:।
धनुष्पाणिं तमादाय त्वरमाणो जगाम स:॥१॥
वदुनी लक्ष्मणा ऐसे आनन्दित बिभीषण।
धनुष्यबाणासह त्याला त्वरेने घेउनी निघे॥१॥
अविदूरं ततो गत्वा प्रविश्य तु महद् वनम्।
अदर्शयत् तत्कर्म लक्ष्मणाय विभीषण:॥२॥

तेथुनिया थोडे दूर जाउनी प्रवेशी वनी।
दाखवी लक्ष्मणा इन्द्रजिताचे यज्ञस्थान॥२॥
नीलजीमूतसंकाशं न्यग्रोधं भीमदर्शनम्।
तेजस्वी रावणभ्राता लक्ष्मणाय न्यवेदयत्॥३॥
नील मेघासमान वटवृक्ष भयंकर।
दाखवून बिभीषण लक्ष्मणास ऐसे वदे॥३॥
इहोपहारं भूतानां बलवान् रावणात्मज:।
उपहृत्य तत: पश्चात् संग्राममभिवर्तते॥४॥

बलवान् रावणात्मज येथे भूतांना बळी ।
अर्पून त्यानन्तर तो युद्धास्तव जातसे॥४॥
अदृश्य: सर्वभूतानां ततो भवति राक्षस:।
निहन्ति समरे शत्रून् बध्नाति च शरोत्तमै:॥५॥
राक्षस तो सर्व प्राण्यांना नन्तर अदृश्य होतसे।
युद्धात मग शत्रूंना शरे उत्तम मारतो।
तमप्रविष्टं न्यग्रोथं बलिनं रावणात्मजम्।
विध्वंसय शरैर्दीप्तै: सरथं साश्वसारथिम्॥६॥

पोचण्यापूर्वी वडाच्या झाडापाशी इन्द्रजित्।
करी नष्ट तया अश्व रथ सारथ्यासहित॥६॥
तथेत्युक्त्वा महातेजा:सौमित्रिर्मित्रनन्दन:।
बभूवावस्थितस्तत्र चित्रं विस्फारयन् धनु:॥७॥
करतो तैसे वदुनी महातेजस्वी लक्ष्मण।
मित्रनन्दन उभा राही धनुष्य ताणुनि रणी॥७॥
स रथेनाग्निवर्णेन बलवान् रावणात्मज:।
इन्द्रजित् कवची खड्गी सध्वज: प्रत्यदृश्यत॥८॥

अग्नीसमान आरूढ रथी कवचधारी त्या।
रावणपुत्र इन्द्रजित हाती खड्ग ध्वजासह॥८॥
तमुवाच महातेजा: पौलस्त्यमपराजितम्।
समाह्वये त्वां समरे सम्यग् युद्धं प्रयच्छ मे॥९॥
महातेजस्वी लक्ष्मण पौलस्त्या अपराजित।
म्हणे आवाहतो युद्धा करी मजसवे युद्ध तू॥९॥
एवमुक्तो महातेजा मनस्वी रावणात्मज:।
अब्रवीत् परुषं वाक्यं तत्र दृष्ट्वा विभीषणम्॥१०॥

ऐसे महातेजस्वी रावणपुत्रा म्हणता।
बिभीषणा पाहुनि तो कठोर वच ऐसे वदे॥१०॥
इह त्वं जातसंवृद्धः साक्षात् भ्राता पितुर्मम।
कथं द्रुह्यसि पुत्रस्य पितृव्यो मम राक्षस॥११॥
जन्मलास तू येथे पित्याचा बंधु तू मम।
असे असता करसी कसा पुत्रासी द्रोह तू॥११॥
न ज्ञातित्वं न सौहार्दं न जातिस्तव दुर्मते।
प्रमाणं न च सौंदर्यं न धर्मो धर्मदूषण॥१२॥

नसे पर्वा तुज जातीची मानाची न धर्माची।
सौजन्याची तशी करसी धर्मा दूषण दुर्मते॥१२॥
शोचस्त्वमसि दुर्बुद्धे निन्दनीयश्च साधुभि:।
यस्त्वं स्वजनमुत्सृज्य परभृत्यत्वमागत:॥१३॥
शोक करण्या योग्य सज्जनां तू निंदनीय ।
कारण स्वजनां सोडुनि परक्यांना सेवसी॥१३॥
नैतच्छिथिलया बुद्ध्या त्वं वेत्सि महदन्तरम्।
क्व च स्वजनसंवास: क्व च नीच पराश्रय:॥१४॥

कुठे स्वजनांसवे वास नीच परक्यांचा आश्रय।
न शिथिल बुद्धीमुळे फरक तुजला कळे॥१४॥
गुणवान् वा परजन: स्वजनो निर्गुणोऽपि वा।
निर्गुण: स्वजन: श्रेयान् य: पर: पर एव स:॥१५॥
परका जरि गुणवान आणि स्वजन निर्गुण।
गुणहीन स्वजन श्रेष्ठ परका तो परकाच॥१५॥
य: स्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेवते।
स स्वपक्षे क्षयं याते पश्चात् तैरेव हन्यते॥१६॥

पक्ष सोडुनि आपुला परपक्षास सेवि जो
स्वपक्ष नष्ट झाल्यास मरे परक्यांहातुन॥१६॥
निरनुक्रोशता चेयं यादृशी ते निशाचर।
स्वजनेन त्वया शक्यं पौरुषं रावणानुज॥१७॥
निशाचरा निर्दयता तुझी हे रावणानुजा।
स्वजनांवरचि चाले तुझे शौर्यही तसे॥१७॥
इत्युक्तो भ्रातृपुत्रेण प्रत्युवाच विभीषण:।
अजानन्निव मच्छीलं किं राक्षस विकत्थसे॥१८॥

म्हणता हे बन्धुपुत्रे विभीषण देइ उत्तर।
बोलसि का जैसे मम शील न जाणसी॥१७॥
राक्षसेन्द्रसुतासाधो पारुष्यं त्यज गौरवात्।
कुले यद्यप्यहं जातो रक्षसां क्रूरकर्मणाम्।
गुणो यः प्रथमो नृणां तन्मे शीलमराक्षसम्॥१९॥
साधु हो रावणपुत्रा दे सोडुनि कठोरता।
जरी राक्षसकुले जन्म माझा क्रूरकर्म अश्या।
असे गुण मानवाचा माझे शील अराक्षस॥१९॥

न रमे दारुणेनाहं न चाधर्मेण वै रमे।
भ्राता विषमशीलोऽपि कथ भ्राता निरस्यते॥२०॥
क्रूरतेत न रमतो मी नच अधर्मातही।
बन्धुस्वभाव विरुद्ध बन्धु भावा कसा त्यजे॥२०॥
धर्मात् प्रच्युतशीलं हि पुरुषं पापनिश्चयम्।
त्यक्त्वा सुखमवाप्नोति हस्तादाशीविषं यथा॥२१॥
धर्मापासुनि ढळलेला पापनिश्चय पुरुषा।
सोडूनी सुख मिळवी विषारी साप हातून जसा।

परस्वहरणे युक्तं परदाराभिमर्शकम्।
त्याज्यमाहुर्दुरात्मानं वेश्म प्रज्वलितं यथा॥२२॥
जो परधनापहरण करी स्पर्श परस्त्रीस।
सोडावे पुरुषा ऐशा जळणारे घर जसे॥२२॥
परस्वानां च हरणं परदाराभिमर्शनम्।
सुहृदामतिशङ्कां च त्रयो दोषा: क्षयावहा:॥२३॥
अपहरण परधनाचे परस्त्रीचा स्पर्शही।
अतिसंशय मित्रांचा विनाशी तीन दोष हे॥२३॥

महर्षीणां वधो घोर: सर्वदेवैश्च विग्रह:।
अभिमानश्च रोषश्च वैरित्वं प्रतिकूलता॥२४॥
वध घोर महर्षींचा देवांशी सर्व शत्रुता।
अभिमान शत्रुता प्रतिकूलता सर्व दोष हे॥२४॥
एते दोषा मम भ्रातुर्जीवितैश्वर्यनाशना:।
गुणान् प्रच्छादयामासु: पर्वतानिव तोयदा:॥२५॥
मम भावाचे हे दोष ऐश्वर्य जीविता नाशती।
गुणा झाकति ते त्याच्या जसे ढग पर्वतां॥२५॥

दोषैरेतैः परित्यक्तो मया भ्राता पिता तव।
नेयमस्ति पुरीं लङ्का न च त्वं न च ते पिता॥२६॥
सोडले दोषांमुळे या बन्धूस जो पिता तव।
न राहील ही लंका न तू न तुझा पिता॥२६॥
अतिमानश्च बालश्च दुर्विनीतश्च राक्षस।
बद्धस्त्वं कालपाशेन ब्रूहि मां यद् यदिच्चसि॥२७॥
राक्षसा अतिगर्विष्ठ अविचारी तू उद्धट।
बद्ध कालपाशे असशी बोल मज वाटेल जे॥२७॥

अद्येह व्यसनं प्राप्तं यन्मां परुषमुक्तवान्।
प्रवेष्टुं न त्वया शक्यं न्यग्रोधं राक्षसाधम॥२८॥
बोलता कठोर वचने संकटी पडसी आज तू।
अशक्य जाणे तुजला त्या वटवृक्षाकडे ॥२८॥
धर्षयित्वा च काकुत्स्थं न शक्यं जीवितुं त्वया।
युद्ध्यस्व नरदेवेन लक्ष्मणेन रणे सह।
हतस्त्वं देवताकार्यं करिष्यसि यमक्षयम्॥२९॥

आव्हयिता काकुत्स्था न जीवित राहशील तू।
नरश्रेष्ठ लक्ष्मणासी करी युद्ध रणामधे।
होता मृत देवकार्य करसी जाशील यमलोकी ॥२९॥
निदर्शयस्वात्मबलं समुद्यतं कुरुष्व सर्वायुधसायकव्ययम्।
न लक्ष्मणस्यैत्य हि बाणगोचरं त्वमद्य जीवन् सबलो गमिष्यसि॥३०॥
तुझे काय बल असे दाखव कर सर्व शस्त्रे आणि बाणांचा वापर।
न आज लक्ष्मणाच्या बाणांच्या टप्प्यातुनि जिवन्त परत् जाशील तू॥३०॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे सप्ताशीतितम: सर्ग:॥८७॥

युद्धकाण्ड सर्ग ८८

विभीषणवचः श्रुत्वा रावणिः क्रोधमूर्च्छितः।
अब्रवीत् परुषं वाक्यं क्रोधेनाभ्युत्पपात च॥१॥
ऐकोनि विभीषणबोल क्रोधे बेभान् इन्द्रजित्।
बोलूनि कठोर वाक्य रागाने मारितसे उड्या॥१॥
उद्यतायुधनिस्त्रिंशो रथे सुसमलंकृते।
कालाश्वयुक्ते महति स्थितः कालान्तकोपमः॥२॥

शस्त्रे हाती उगारुनी तलवार रथी आरूढ।
कृष्ण अश्वासह सुसज्ज दिसे कालासम॥२॥
महाप्रमाणमुद्यम्य विपुलं वेगवद् दृढम्।
धनुर्भीमबलो भीमं शरांश्चामित्रनाशनान्॥३॥
इन्द्रजित् भीमबलवान उचली दृढ धनुष्य ।
विस्तीर्ण आणि त्यासवे शत्रुनाशी बाणही॥३॥
तं ददर्श महेष्वासो रथस्य समलंकृत:।
अलंकृतममित्रघ्नो रावणस्यात्मजो बली॥४॥

हनूमत्पृष्ठमारूढमुदयस्थरविप्रभम्।
उवाचैनं सुसंरब्धः सौमित्रिं सविभीषणम् ॥५॥
अलंकृत शत्रुनाशी बसलेला उत्तम रथी ।
इन्द्रजित् लक्ष्मणास उगवत्या सूर्यासम ॥४॥
तेजस्वी धनुर्धारी पाहुनी स्कन्धी आरूढ ।
हनुमानाच्या बोलला विभीषणाच्या सवे॥५॥
तांश्च वानरशार्दूलान् पश्यध्वं मे पराक्रमम्।
अद्य मत्कार्मुकोत्सृष्टं शरवर्षं दुरासदम्॥६॥

हे वानरश्रेष्ठानो पराक्रम माझा पहा।
धनुष्यातुन होणारा असह्य बाणवर्षावही॥६॥
मुक्तवर्षमिवाकाशे धारयिष्यथ संयुगे।
अद्य वो मामका बाणा महाकार्मुकनि:सृता:।
विधमिष्यन्ति गात्राणि तूलराशिमिवानल:॥७॥
झेलाव्या पर्जन्य धारा तसे झेला रणामध्ये।
बाण माझे निघालेले मोठ्या धनूतून मम।
करतील विदीर्ण जसा अग्नी कापुसराशिला॥७॥

तीक्ष्णसायकनिर्भिन्नान् शूलशक्त्र्युष्टितोमरैः।
अद्य वो गमयिष्यामि सर्वानेव यमक्षयम्॥८॥
शूल शक्ति ऋष्टि तोमर तीक्ष्ण बाणे अश्या।
तुम्हा सर्वां पाठवीन यमसदना आज मी ॥८॥
सृजतः शरवर्षाणि क्षिप्रहस्तस्य संयुगे।
जीमूतस्येव नदतः कः स्तास्यति ममाग्रतः॥९॥
करी जो शरवर्षाव जलद गतीने गर्जुनी।
मेघासम मजपुढे उभा कोण राहू शके॥९॥

रात्रियुद्धे तदा पूर्वं वज्राशनिसमै: शरै:।
शायितौ तौ मया भूयो विसंज्ञौ सपुर:सरौ॥१०॥
पूर्वी रात्रीच्या युद्धात वज्र आणि विजेसम।
बाणांनी उभया होते बेशुद्ध मी झोपविले॥१०॥
स्मृतिर्न तेऽस्ति वा मन्ये व्यक्तं यातो यमक्षयम्।
आशीविषसमं क्रुद्धं यन्मां योद्धुमुपस्थित:॥११॥
न स्मरसि वा जाणार यमलोकी आज निश्चित।
येसी लढण्या मजसी कृद्ध विषारी सर्पासम॥११॥

तच्छ्रुत्वा राक्षसेन्द्रस्य गर्जितं राघवस्तदा।
अभीतवदन: कृद्धो रावणिं वाक्यमब्रवीत्॥१२॥
गर्जना ऐकूनि त्याची क्रुद्ध होउनि लक्ष्मण।
निर्भय मुखाने वदे रावणपुत्रा यापरी॥१२॥
उक्तश्च दुर्गम: पार: कार्याणां राक्षस त्वया।
कार्याणां कर्मणा पारं यो गच्छति स बुद्धिमान्॥१३॥
राक्षसा करणे पार कार्या दुर्गम बोलसी।
कर्मे करी कार्याचा जो पार बुद्धिमान तो॥१३॥

स त्वमर्थस्य् हीनार्थो दुरवापस्य् केनचित्।
वाचा व्याहृत्य जानीषे कृतार्थोऽस्मीति दुर्मते॥१४॥
वंचित जयापासुनि तो काठिण्ये मिळतसे।
कृतार्थ समजसी स्वतास करुनीया बडबड॥१४॥
अन्तर्धानगतेनाजौ यत्तया चरितस्तदा।
तस्कराचरितो मार्गो नैष वीरनिषेवित:॥१५॥
युद्धी अदृश्य होऊन केले होतेस कृत्य जे।
तो मार्ग असे चोरांचा न वीरांनी सेवित॥१५॥

यथा बाणपथं प्राप्य स्थितोऽस्मि तव राक्षस।
दर्शयस्वाद्य तत्तेजो वाचा त्वं किं विकत्थसे॥१६॥
बाणाच्या टप्प्यात तुझ्या राक्षसा उभा असता मी।
दाखव तेज उगीच बडबड करू नको॥१६॥
एवमुक्तो धनुर्भीमं परामृश्य महाबल:।
ससर्ज निशितान् बाणानिन्द्रजित् समितिंजय:॥१७॥
ऐसे बोलता धनुष्य भयंकर उचलुनी।
करी महाबलवान् शरवर्षाव इन्द्रजित् ॥१७॥

तेन सृष्टा महावेगा: शरा: सर्पविषोपमा:।
सम्प्राप्य लक्ष्मणं पेतु: श्वसन्त इव पन्नगा:॥१८॥
त्याचे महावेगवान् बाण् सर्पाच्या विषासम जे।
फुत्कारत सर्पासम जाती लक्ष्मणावरी॥१८॥
शरैरतिमहावेगैर्वेगवान् रावणात्मज:।
सौमित्रिमिन्द्रजिद् युद्धे विव्याध शुभलक्षणम्॥१९॥
इन्द्रजित वेगवान शुभलक्षण लक्ष्मणा।
अतिवेगवान् आपुल्या बाणांनी विद्ध करीतसे॥१९॥

स शरैरतिविद्धाङ्गो रुधिरेण समुक्षित:।
शुशुभे लक्ष्मण: श्रीमान् विधूम इव पावक:॥२०॥
जखमी बाणांनी त्या रक्ताने न्हायल्यामुळे।
श्रीमान् लक्ष्मण शोभे अग्नीसम धुराविना॥२०॥
इन्द्रजित् त्वामन: कर्म प्रसमीक्ष्याभिगम्य च।
विनद्य सुमहानादमिदं वचनमब्रवीत् ॥२१॥
पाहुनी आपुले कृत्य येउनी जवळ करी।
गर्जना महानादे आणि ऐसे बोलला॥२१॥

पत्रिण: शितधारास्ते शरा मत्कार्मुकच्युता
आदास्यन्तेऽद्य सौमित्रे जीवितं जीवितान्तका:॥२२॥
धनुष्यातुन सुटलेले धारायुक्त पंखांसवे।
प्राणघातक बाण जीव घेतिल आज तव॥२२॥
अद्य गोमायुसङ्घाश्च श्येनसंघाश्च लक्ष्मण।
गृध्राश्च निपतन्तु त्वां हतासुं निहतं मया॥२३॥
मजकडुनी मारला जाता लक्ष्मणा तुझ्यावरी।
कोल्हे बहिरी ससाणे गिधाडे पडोत तुजवरी॥२३॥

क्षत्रबन्धु सदानार्यं रामः परमदुर्गतिः।
भक्तं भ्रातरमद्यैव त्वां द्रक्ष्यति हतं मया॥२४॥
परमदुर्मती राम अनार्य आचरणी सदा।
भक्त बन्धूस पाहील माझ्याकडुनी मृत॥२४॥
विस्रस्तकवचं भूमौ व्यपविद्धशरासनम्।
हृतोत्तमाङ्गं सौमित्रे त्वामद्य निहतं मया॥२५॥
कवच गळलेले धनु फेकले गेलेले ज्याचे।
मस्तक छिन्न लक्ष्मणा मजकडून पाहिन॥२५॥

इति ब्रुवाणं संक्रुद्धः परुषं रावत्मजम्।
हेतुमद् वाक्यमर्थज्ञो लक्ष्मणः प्रत्युवाच ह॥२६॥
कठोर बोल रागाने बोलणाऱ्या इन्द्रजिता।
युक्तीने उत्तर देई लक्ष्मण ऐसे बोलुनी॥२६॥
वाग्बलं त्यज दुर्बुद्धे क्रूरकर्मन् हि राक्षस।
अथ कस्माद् वदस्येतत् सम्पादय सुकर्मणा॥२७॥
बडबड क्रूरकर्म्या न करी दुर्बुद्धे परी।
स्वपराक्रमाने करी सिद्ध तव भाषण॥२७॥

अकृत्वा कत्थसे कर्म किमर्थमिह राक्षस।
कुरु तत् कर्म येनाहं श्रद्धेयं तव कत्थनम्॥२८॥
कर्म न करता बोलसि कशास्तव हे राक्षसा।
कर्म करी ऐसे ज्याने विश्वास मज होइल॥२८॥
अनुक्त्वा परुषं वाक्यं किंचिदप्यनवक्षिपन्।
अविकत्थन् वधिष्यामि त्वां पश्य पुरुषादन्॥२९॥
नरभक्षका कठोर वाक्य न बोलता निन्देविना।
बढाई न मारता मी करीन तव वध पहा॥२९॥

इत्युक्त्वा पञ्च नाराचानाकर्णापूरितान् शरान्।
विजघान महावेगाल्लक्ष्मणो राक्षसोरसि॥३०॥
बोलुनि पाच आकर्ण ओढून बाण सोडितसे।
महावेगवान् नाराच राक्षसाच्या वक्षस्थळी॥३०॥
सुपत्रवाजिता बाणा ज्वलिता इव पन्नगा:।
नैर्ऋतोरस्यभसन्त सवितू रश्मयो यथा॥३१॥
उत्तम पंखयुक्त बाण जळत्या सर्पासम।
छातीवर राक्षसाच्या रविकिरणापरि शोभले॥३१॥

स शरैराहतस्तेन सरोषो रावणात्मज:।
सुप्रयुक्तैस्त्रिभिर्बाणै: प्रतिविव्याध लक्ष्मणम्॥३२॥
बाणांनी विद्ध झालेला रावणपुत्र क्रोधाने।
लक्ष्मणा करी विद्ध बाणांनी सुनियोजित॥३२॥
स बभूव महाभीमो नरराक्षससिंहयो:।
विमर्दस्तुमुलो युद्धे परस्परजयैषिणो:॥३३॥
परस्परांवर् विजयी होण्यास्तव भयंकर।
राक्षस नरसिंहामध्ये महासंग्राम होतसे॥३३॥

विक्रान्तौ बलसंपन्नावुभौ विक्रमशालिनौ।
उभौ परमदुर्जेयावतुल्यबलतेजसौ॥३४॥
पराक्रमी बलसंपन्न दोघे विक्रमयुक्तही।
दोघेही अतिदुर्जय अतुल बल तेजासह॥३४॥
युयुधाते तदा वीरौ ग्रहाविव नभोगतौ।
बलवृत्राविव हि तौ युधि वै दुष्प्रधर्षणौ॥३५॥
दोघे वीर नभातील करती युद्ध ग्रहासम ।
युद्धात दुर्धर् दोघे इन्द्र वृत्रासुरापरी॥३५॥

युयुधाते महात्मानौ तदा केसरिणाविव।
बहूनवसृजन्तौ हि मार्गणौघानवस्थितौ।
नरराक्षसमुख्यौ तौ प्रहृष्टावभ्ययुध्यताम्॥३६॥
करती सिंहापरी युद्ध महात्मे दोन ते तदा।
सतत बाणसमूह सोडित स्थिर राहुनी।
लढती नर राक्षस मुख्य होउनिया हर्षित ॥३६॥
ततः शरान् दाशरथिः संधायामित्रकर्षणः।
ससर्ज राक्षसेन्द्राय क्रुद्धः सर्प इव श्वसन् ॥३७॥

शत्रूंना खेचणाऱ्या लक्ष्मण क्रुद्ध होउनी।
सर्पासम फुसफुसत सोडी बाण इन्द्रजितावरि॥३७॥
तस्य ज्यातलनिर्घोषं स श्रुत्वा राक्षसाधिप:।
विवर्णवदनो भूत्वा लक्ष्मणं समुदैक्षत॥३८॥
प्रत्यंचेचा त्याचा घोर टणत्कार ऐकुनी।
पाही लक्ष्मणाकडे भयाने विवर्ण मुखे॥
विवर्णवदनं दृष्ट्वा राक्षसं रावणात्मजम्।
सौमित्रिं युद्धसंयुक्तं प्रत्युवाच विभीषण:॥३९॥

रावणपुत्र राक्षसाचे विवर्ण मुख पाहुनी।
लक्ष्मणा युद्ध करणाऱ्या वदे विभीषण असे॥३९॥
निमित्तान्युपपश्यामि यान्यस्मिन् रावणात्मजे।
त्वर तेन महाबाहो भग्न एष न संशय:॥४०॥
लक्षणे पराभवाची दिसती रावणपुत्रात मज।
त्वरा करी पराभूत हा झालेला निश्चित॥४०॥
तत: संधाय सौमित्रि: शरानाशीविषोपमान्।
मुमोच विशिखांस्तस्मिन् सर्पानिव विषोल्बणान्॥४१॥

नंतर धनुष्यावर चढवी लक्ष्मण बाण जे।
सर्पासम विषारी सोडीतसे त्याच्यावरी॥४१॥
शक्राशनिसमस्पर्शैर्लक्ष्मणेनाहत: शरै:।
मुहूर्तमभवन्मूढ: सर्वसंक्षुभितेन्द्रिय:॥४२॥
इन्द्रवज्रासम स्पर्श करणाऱ्या बाणांनि त्या।
इन्द्रजित मूर्च्छित त्याची इन्द्रिये क्षुब्ध होउनी॥४२॥
उपलभ्य मुहूर्तेन संज्ञां प्रत्यागतेन्द्रिय:।
ददर्शावस्थितं वीरमाजौ दशरथात्मजम्।

सोऽभिचक्राम सौमित्रिं रोषात् संरक्तलोचन:॥४३॥

मुहूर्ते शुद्धीत येता येता ताब्यात इन्द्रिये

पाही युद्धास्तव उभ्या वीर दशरथपुत्रास ।

रक्तलोचन क्रोधाने धवुनी जाइ त्यावरी॥४३॥

अब्रवीच्चैनमासाद्य पुन: स परुषं वच:।

किं न स्मरसि तद् युद्धे प्रथमे मत्पराक्रमम्।

निबद्धस्त्वं सह भ्राता यसा युधि विचेष्टसे॥४४॥

त्याच्याजवळ जाऊनी कठोर वच बोलला।

का न स्मरसि युद्धात पूर्वीच्या मम पराक्रमा।
तदा बन्धुसवे बद्ध निश्चेष्ट झालास तू॥४४॥
युवां खलु महायुद्धे वज्राशनिसमै: शरै:।
शायितौ प्रथमं भूमौ विसंज्ञो सपुर:सरौ॥४५॥
महायुद्धी तुम्हा उभया सैन्यासह अग्रत:।
मूर्च्छित करुनी होते भूमीवर मी पाडले ॥४५॥
स्मृतिर्वा नास्ति ते मन्ये व्यक्तं वा यमसादनम्।
गन्तुमिच्छसि यन्मां त्वमाधर्षयितुमिच्छसि॥४६॥

न स्मरसि मज वाटे अथवा यमसदनी।
जाण्या इच्छसि म्हणुनी तिरस्कारसि तू मज॥४६॥
यदि ते प्रथमे युद्धे न दृष्टो मत्पराक्रम:।
अद्य त्वां दर्शयिष्यामि तिष्ठेदानीं व्यवस्थित:॥४७॥
पराक्रम न दिसला पहिल्या युद्धामध्ये मम।
दाखवतो तुजला आज स्थिर आता उभा रहा॥४७॥
इत्युक्त्वा सप्तभिर्बाणैरभिविव्याध लक्ष्मणम्।
दशभिस्तु हनूमन्तं तीक्ष्णधारै: शरोत्तमै:॥४८॥

असे बोलुनी करी विद्ध सात बाणांनि लक्ष्मणा।
हनूमन्ता दश बाणांनी तीक्ष्ण धारेच्या उत्तम॥४८॥
ततः शरशतेनैव सुप्रयुक्तेन वीर्यवान्।
क्रोधाद् द्विगुणसंरब्धो निर्बिभेद विभीषणम्॥४९॥
पराक्रमी इन्द्रजित क्रोधे संतप्त दुप्पट।
शंभर बाणे छेदूनि टाकी बिभीषणा तदा॥४९॥
तद् दृष्ट्वेन्द्रजिता कर्म कृत रामानुजस्तदा।
अचिन्त्ययित्वा प्रहसन्नैतत् किंचिदिति ब्रुवन्॥५०॥

पाहुनी इन्द्रजिताचे कर्म तेव्हां लक्ष्मण।
हासुनी पर्वा न करता म्हणे हे काही नसे॥५०॥
मुमोच च शरान् घो रान् संगृह्य नरपुङ्गवः।
अभीतवदनः क्रुद्धो रावणिं लक्ष्मणो युधि॥५१॥
निर्भय मुखे क्रुद्ध नरश्रेष्ठ लक्ष्मण
सोडी इन्द्रजितावरि घोर बाण युद्धामधे॥५१॥
नैवं रणगताः शूराः प्रहरन्ति निशाचर।
लघवश्चाल्पवीर्याश्च शरा हीमे सुखास्तव॥५२॥

रती प्रहार शूर न निशाचरा रणी असे ।
असती हे तव बाण अल्पवीर्य नि निष्प्रभ॥५२॥
नैवं शूरास्तु युध्यन्ते समरे युद्धकांक्षिण:।
इत्येवं तं ब्रूवन् धन्वी शरैरभिववर्ष ह॥५३॥
समरांगणि युद्धेच्छु करती युद्ध न असे।
म्हणूनि करी लक्ष्मण बाण वर्षाव त्याचरी॥५३॥
तस्य बाणै: सुविध्वस्तं कवचं काञ्चनं महत्।
व्यशीर्यत रथोपस्थे ताराजालमिवाम्बरात्॥५४॥

सुवर्णकवच तुटुनी त्याच्या बाणे गळूनिया।
नभातून जसे ताराजाल रथी बैठकी पडे॥५४॥
विधूतवर्मा नाराचैर्बभूव स कृतव्रण:।
इन्द्रजित् समरे वीर: प्रत्यूषे भानुमानिव॥५५॥
नाराच बाणे कवच गळता जखमी वीर।
इन्द्रजित् दिसे रणी पहाटेच्या सूर्यापरि ॥५५॥
तत: शरसहस्रेण संक्रुद्धो रावणात्मज:।
बिभेद समरे वीरो लक्ष्मणं भीमविक्रम:॥५६॥

तदा अतिक्रुद्ध वीर रावणपुत्र पराक्रमी।
सहस्र बाणांनी करी समरी विद्ध लक्ष्मणा ॥५६॥
व्यशीर्यत महद्दिव्यं कवचं लक्ष्मणस्य तु।
कृतप्रतिकृतान्योन्यं बभूवतुररिंदमौ॥५७॥
लक्ष्मणाचेही कवच दिव्य त्याने तोडले ।
प्रहार प्रतिप्रहार करती उभय वीर ते ॥५७॥
अभीक्ष्णं नि:श्वसन्तौ तय् युद्ध्येतां तुमुलं युधि।
शरसंकृत्त सर्वाङ्गौ सर्वतो रुधिरोक्षितौ॥५८॥

करती उभय घोर युद्ध उसासे टाकित।
छिन्नभिन्न अंगे चिंब रक्ताने न्हाउनी॥५८॥
सुदीर्घकालं तौ वीरावन्योन्यं निशितै: शरै:।
ततक्षतुर्महात्मानौ रणकर्मविशारदौ।
बभूवतुश्चात्मजये यत्तौ भीमपराक्रमौ॥५९॥
रणकर्मात निपुण उभय वीर महान् ।
दीर्घ काळ बाणे तीक्ष्ण उभया करती जखमी।
विजया प्रयत्नशील भयंकर पराक्रमी॥५९॥

तौ शरौघैस्तथाकीर्णौ निकृत्तकवचध्वजौ।
सृजन्तौ रुधिरं चोष्णं जलं प्रस्रवणाविव॥६०॥
बाणसमूहे व्याप्त कवच ध्वज तुटलेले।
दोघांच्या अश्या रक्त झऱ्यासम वाहतसे॥६०॥
शरवर्षं ततो घोरं मुञ्चतोर्भीमनि:स्वनम्।
सासारयोरिवाकाशे नीलयो: कालमेघयो:॥६१॥
बाणवर्षाव करणारे भयंकर गर्जनेसह।
दिसती मेघासम नील जे जलधारा सोडती॥६१॥

तयोरथ महान् कालो व्यतीयाद् युध्यमानयो:।
न च तौ युद्धवैमुह्यं क्लमं चाप्युपजग्मतु:॥६२॥
मोठा काळ झाला तरि न थकवा येई त्यां।
युद्धापासुन दोघेही पराङ्मुख न होती ते॥६२॥
अस्त्राण्यस्त्रविदां श्रेष्ठौ दर्शयन्तौ पुन: पुन:
शरानुच्चावचाकारानन्तरिक्षे बबन्धतु:॥६३॥
अस्त्रविदांमध्ये श्रेष्ठ दाखवूनी पुन:पुन:।
अन्तरिक्षा भरुनि टाकति बाणांनी विविध॥६३॥

व्यपेतदोषमस्यन्तौ लघु चित्रं च सुष्ठु च।
उभौ तु तुमुलं घोरं चक्रतुर्नरराक्षसौ॥६४॥
दोषरहित जलद विचित्र आणि सुन्दर।
प्रकारे सोडित बाण करती तुमुल युद्ध॥६४॥
यतो: पृथक् पृथग् भीम: शुश्रुवे तलनिस्वन:।
स कम्प जनयामास निर्घात इव दारुण:॥६५॥
हातांच्या तळव्यांचा नाद ऐकू जो येतसे।
करी कंप निर्माण वज्रपातासम् भयंकर॥६५॥

तयोः स भ्राजते शब्दस्तथा समरमत्तयोः।
सिघोरयोर्निष्टनतोर्गगने मेघयोरिव॥६६॥
समरी मत्त दोघांचा अतिघोर गर्जनांचा।
नाद तो मेघापरि आकाशातिल शोभतो॥६६॥
सुवर्णपुंखैर्नाराचैअर्बलवन्तौ कृतव्रणौ।
प्रसुस्रुवाते रुधिरं कीर्तिमन्तौ जये धृतौ॥६७॥
जखमी नाराच बाणे सुवर्णपंखयुक्त जे।
बलवान कीर्तिमान् रक्त स्रवति जयोत्सुक॥६७॥

ते गात्रयोर्निपतिता तुक्मपुंखा: शरा युधि।
असृग्दिग्धा विनिष्प्रतुर्विविशुर्धरणीतलम्॥६८॥
शरीरी घुसले बाण सुवर्णपंखी माखुन।
रक्ताने पडुनि बाहेर् शिरती भूपृष्ठामधे॥६८॥
अन्यै सुनिशितै:शस्त्रैराकाशे संजघट्टिरे।
बभञ्जुश्चिच्छिदुश्चैव तयोर्बाणा: सहस्रश:।६९॥
करती अन्य आकाशी तीक्ष्ण शस्त्रे आघात।
हजारो बाण त्यांचे त्यामुळे पडती मोडुनी॥६९॥

स बभूव रणो घोरस्तयोर्बाणमयश्चय:।
अग्निभ्यामिव दीप्ताभ्यां सत्रे कुशमयश्चय:॥७०॥

दोघामधले बाणांनी जाहले घोर युद्ध जे।
जसा यज्ञी प्रज्वलित अग्नी पेटवी दर्भांस॥७०॥

तयो: कृतव्रणौ देहौ शुशुभाते महात्मनो:।
सुपुष्पाविव निष्पत्रौ वने किंशुकशाल्मली॥७१॥

देह त्या महात्म्यांचे भरलेले जखमांनी।
दिसती पळस शाल्मली पुष्पयुक्त वृक्षासम ॥७१॥

चक्रतुस्तुमुलं घोरं संनिपातं मुहुर्मुहुः।
इन्दजिल्लक्ष्मणश्चैव परस्परजयैषिणौ॥७२॥
इन्द्रजित नि लक्ष्मण दोघेही विजयोत्सुक।
एकमेकावरी करती घोर तुमुल संघर्ष॥७२॥
लक्ष्मणो रावणिं युद्धे रावणिश्चापि लक्ष्मणम्।
अन्योन्यं तावभिघ्नन्तौ न श्रमं प्रतिपाद्यताम्॥७३॥
इन्द्रजितावरि लक्ष्मण इन्द्रजित् लक्ष्मणावरी।
परस्पर प्रहार करता उभया न वाट्ती श्रम॥७३॥

बाणजालै: शरीरस्थैरवगाढैस्तरस्विनौ।
शुशभाते महावीर्यो प्ररूढाविवपर्वतौ॥७४॥
बाणजाले शरीरस्थ बाणांच्या जाळ्यामुळे।
उभय शोभति अंकूरासवे दोन पर्वत जणु ॥७४॥।
तरो रुधिरसक्तानि संवृतानि शरौर्भृशम्।
बभ्राजु: सर्वगात्राणि ज्वलन्त इव पावला:॥७५॥
अंगे रक्ताने न्हालेली बाणे झाकलेली पूर्ण।
झळकती पेटलेल्या तेजाने अग्नीपरी॥७५॥

तयोरथ महान् कालो ब्यतीयाद् युध्यामानयो:।
न व तौ युद्धवैमुख्यंश्रमं चाप्यभिजग्मतु:॥७६॥
युद्ध करणाऱ्या त्यांचा जाई निघुनी मोठा काळ।
परि न होती परावृत न थकतीही ते तसे॥७६॥
अथ समरपरिश्रमं निहन्तुं समदमुखेष्वजितस्य् लक्ष्मणस्य।
प्रियहितमुपपादयन् महात्मा समरमुपेत्य विभीषणोऽवतस्तथे॥७७॥
आघाडीवरील लक्ष्मणाचा अजिंक्य थकवा दूर करण्यास्तव।
बिभीषण त्याचे प्रिय आणि हित करणारा येतसे समरभूवरी॥७७॥
इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे अष्टाशीततम: सर्ग:॥८८॥

युद्धकाण्ड सर्ग ८९

युद्धमानौ ततो दृष्ट्वा प्रसक्तौ नरराक्षसौ।
प्रभिन्नाविव मातङ्गौ परस्परजयैषिणौ॥१॥
पाहता ते युध्यमान विजयेत्सु नर राक्षस।
दिसती ते मदोन्मत्त दोन मातङ्गांसम॥१॥
तयोर्युद्धं द्रष्टुकामो वरचापधरो बली।
शूरः स रावणभ्राता तस्थौ संग्राममूर्धनि॥२॥

पाहण्या उभययुद्ध श्रेष्ठ बलवान् शूर।
धनुष्यधारी विभीषण उभा युद्धभूमीवरी॥२॥
ततो विस्फारयामास महद् धनुरवस्थित:।
उत्ससर्ज च तीक्ष्णाग्रान् राक्षसेषु नहाशरान्॥३॥
उभा राहुनि प्रत्यंचा चढवून स्वधनूवरी।
राक्षसावरि तीक्ष्णाग्र बाण् मोठे सोडि तो॥३॥
ते शरा: शिखिसंस्पर्शा निपतन्त समाहिता:।
राक्षसान् द्राव्यामासुर्वज्राणीव महागिरीन्॥४॥

अग्नीपरी स्पर्शणारे एकाग्रचित्ते बाण ते।
पळविती राक्षसांना वज्र जसे भंगे पर्वता॥४॥
विभीषणस्यानुचरास्तेऽपि शूलासिपट्टिशै:।
चिच्छिदु: समरे वीरान् राक्षसान् राक्षसोत्तमा:॥५॥
अनुचर बिभीषणाचे शूल तलवार् पट्टिश।
यांनी राक्षसां वीर टाकती छेदुनि रणी॥५॥
राक्षसैस्तै: परिवृत्त: स तदा तु विभीषण:।
बभौ मध्ये प्रधृष्टानां कलभानामिव द्विप:॥६॥

विभीषण राक्षसांनी वेढलेला हत्तीपरी।
दिसे उन्मत्त पिलांनी वेढलेल्या हत्तीच्या॥६॥
तत: संचोदमानो वै हरीन् रक्षोवधप्रियान्।
उवाच वचनं काले कालज्ञो रक्षसां वर:॥७॥
राक्षसवधे उत्सुक वानरां प्रेरणा देत।
कालज्ञ विभीषण योग्य वचन बोले असे॥७॥
एकोऽयं राक्षसेन्द्रस्य परायणमवस्थित:।
एतच्छेषं बलं तस्य किं तिष्ठत् हरीश्वरा:॥८॥

एकटाच राक्षस हा मुख्य आधार रावणा।
हेच सैन्य त्याचे तुम्ही थाम्बला काहरीश्वरां॥८॥
अस्मिंश्च निहते पापे राक्षसे रण मूर्धनि।
रावणं वर्जयित्वा तु शेषमस्य बलं हतम्॥९॥
हा राक्षस रणामध्ये मरता केवळ रावण।
सोडूनि सैन्य त्याचे नष्ट जणु झाले असे॥९॥
प्रहस्तो निहतो वीरो निकुम्भश्च महाबल:।
कुम्भकर्णश्च कुम्भश्च धूम्राक्षश्च निशाचर:॥१०॥

प्रहस्त वीर निकुम्भ महाबली जाइ मारला।
तसेच् राक्षस कुम्भ कुम्भकर्ण धूम्राक्षही ॥१०॥
जम्बुमाली महामाली तीक्ष्णवेगोऽशनिप्रभ:।
सुप्तघ्नो यज्ञकोपश्च वज्रदंष्ट्रश्च राक्षस:॥११॥
जम्बुमाली महामाली तीक्ष्णवेग वज्रासम।
यज्ञकोप वज्रदंष्ट्र सुतघ्न सर्व राक्षस ॥११॥
संह्रादी विकटोऽरिघ्नस्तपनो मन्द एव च।
प्रघास: प्रघसश्चैव प्रजङ्घो जङ्घ् एव च॥१२॥

शत्रुनाशक विकट तपन मन्द संह्लादी ।
प्रघास प्रघस जंघ प्रजंघहि त्यांसवे॥१२॥
अग्निकेतुश्च दुर्घर्षो रश्मिकेतुश्च वीर्यवान्।
विद्युज्जिह्वो द्विजिह्वश्च सूर्यशत्रुश्च राक्षसः॥१३॥
अकम्पनःसुपार्श्वश्च चक्रमाली च राक्षसः।
कम्पनः सत्त्ववन्तौ तौ देवान्तक नरान्तकौ॥१४॥
दुर्घर्ष अग्निकेतु रश्मिकेतु पराक्रमी।
विद्युज्जिह्व सूर्यशत्रु द्विजिह्व हे राक्षस॥१३॥

अकम्पन चक्रमाली सुपार्श्व कम्पण तसे।
बलवान् मारले जाती देवान्तक नरान्तक॥१४॥
एतान् निहत्यातिबालान् बहून् राक्षससत्तमान् ।
बाहुभ्यां सागरं तीर्त्वा लङ्घ्यतां गोष्पदं लघु॥१५॥
ह्या अतिबलवान् पुष्कळ श्रेष्ठ राक्षसां।
मारुनी तरुनी गेलो जसा सागर् बाहुंनी।
उरे शेवटी हे छोटे गोष्पदासम पुरे करी॥१५॥
एतावदेव शेषं वो जेतव्यमिति वानरा:।
हता: सर्वे समागम्य राक्षसा: बलदर्पिता:॥१६॥

एवढे उरले शेष राही जिंकायचे तुम्हा।
बाकी बलगर्व मत्त असति गेले मारले॥१६॥
अयुक्तं निधनं कर्तुं पुत्रस्य जनितुर्मम।
घृणामपास्य रामार्थे निहन्यां भ्रातुरात्मजम्॥१७॥
पुत्राच्या मम बन्धूंच्या वध मी करणे योग्य न।
परि दया न करता रामास्तव ते करीन मी॥१७॥
हन्तुकामस्य मे बाष्पं चक्षुश्चैव निरुध्यति।
तमेवैअष महाबाहुर्लक्षमण: शमयिष्यति॥१८॥

असुनी इच्छा रोखती अश्रु मम त्या मारण्या।
वधील म्हणूनी त्यास महाबाहु लक्ष्मण हा॥१८॥
वानरा घ्नत सम्भूय भृत्यानस्य समीपगान्।
इति तेनातियशसा राक्षसेनाभिचिदिता:॥१९॥
हे वानरांनो एकत्र त्याच्याजवळिल सेवकां।
मारा अशी प्रेरणा देई यशस्वी राक्षस॥१९॥
वानरेन्द्रा जह्रुषिरे लाङ्गूलानि च विव्यधु:।
ततस्तु कपिशार्दूला: क्ष्वेडन्तश्च पुन: पुन:।

मुमुचुर्विविधान् नादान् मेघान् दृष्ट्वेव बर्हिण:॥२०॥
आनंदित वानरश्रेष्ठ शेपट्या हालविती।
गर्जना करती सर्व वानर ते पुन्हा पुन्हा।
ओरडती मयूर जैसे मघांना पाहुनिया॥२०॥
जाम्बवानपि तै: सर्वै: स्वयूथ्यैरभिसंवृत:।
तेऽश्मभिस्ताडयामासुर्नखैर्दन्तैश्च राक्षसान् ॥२१॥
जाम्बवान् वेढलेला यूथ अस्वलांसहित।
दगड नखे दातांनी मारु लागति राक्षसां॥२१॥

निघ्नन्तमृक्षाधिपतिं राक्षसास्ते महाबला:।
परिवव्रुर्भयं त्यक्त्वा तमनेकविधायुधा:॥२२॥
मार देणाऱ्या त्या जाम्बवानास राक्षस।
महाबलि भय सोडुनी घेरती शस्त्रांसह ॥२२॥
शरै:परशुभिस्तीक्ष्णै: पट्टिशैर्यष्टितोमरै:।
जाम्बवन्तं मृधे जघुर्निघ्नन्तं राक्षसीं चमूम्॥२३॥
राक्षससेना संहार करणाऱ्या जाम्बवानावरी।
करती प्रहार ते तीक्ष्ण परशु पट्टिश तोमरे॥२३॥

स सम्प्रहारस्तुमुल: संजज्ञे कपिरक्षसाम्।
देवासुरानां क्रुद्धानां यथा भीमौ महास्वन:॥२४॥
होत् घनघोर संग्राम वानर राक्षसांमध्ये।
जसा क्रुद्ध देव आणि असुरांमध्ये होतसे॥२४॥
हनूमानपि संक्रुद्ध: सालमुत्पाट्य पर्वतात् ।
स लक्ष्मणं स्वयं पृष्ठादवरोप्य महामना:॥२५॥
पर्वतावरुनी उपटे सालवृक्षास क्रोधित।
लक्ष्मणा पाठीवरुनी उतरवी तो महारथी॥२५॥

रक्षसां कदनं चक्रे दुरासाद: सहस्रश:।
स दत्त्वा तुमुलं युद्धं पितृव्यस्येन्द्रजिद् बली॥२६॥
दुर्जय हनुमान संहारी सहस्रावधि राक्षसा।
इन्दजित् करी घोर युद्ध चुलत्यासवे॥२६॥
लक्ष्मणं परवीरघ्न:पुनरेवाभ्यधावत।
तौ प्रयुद्धौ तदा वीरौ मृधे लक्ष्मणराक्षसौ॥२७॥
पुन्हा धावुनि जाई इन्द्रजित् लक्ष्मणावरी।
युद्ध ते करती वीर लक्ष्मण नि इन्द्रजित् ॥२७॥

शरौघानभिवर्षन्तौ जघ्नतुस्तौ परस्परम्।
अभीक्ष्णमन्तर्दधतु: शरजालैर्महाबलौ॥२८॥

प्रहार बाणवर्षावे करित परस्परांवरी
बाणजाले एकमेकां वारंवार ते झाकती॥२८॥

चन्द्रादित्याविवोष्णान्ते यथा मेघैस्तरस्विनौ।
नह्यादानं न संधानं धनुषो वा परिग्रह:॥२९॥

झाकले जाति बाणांनी चन्द्र मेघांनी जसा।
जोडणे धरणे बाण न दिसे धनुष्यासही॥२९॥

न विप्रमोक्षो बाणानां न विकर्षो न विग्रहः।
न मुष्टिप्रतिसंधानं न लक्ष्यप्रतिपादनम्॥३०॥
सोडणे बाण जोडणे हाती धनुष्या पकडणे।
वेगाने सर्व झाल्याने दिसे काही न वेगळे॥३०॥
अदृश्यत तयोस्तत्र युध्यतोः पाणिलाघवात्।
चापवेगप्रयुक्तैश्च बाणजालैः समन्ततः॥३१॥
हस्तचापल्ये वेगाने मुक्त बाणजालामुळे।
युद्ध करणारे दोघे अदृश्य जाहले जणु॥३१॥

अन्तरिक्षेऽभिसम्पन्ने न रूपाणि चकाशिरे।
लक्ष्मणो रावणिं प्राप्य रावणिश्चापि लक्ष्मणम्॥३२॥
बाणे भरुनि आकाश न दिसती रूपे त्यांची।
अन्ती लक्ष्मण इन्द्रजित् परस्परांनागाठती॥३२॥
अव्यवस्था भवत्युग्रा ताभ्यामन्योन्यविग्रहे।
ताभ्यामुभाभ्यां तरसा प्रसृष्टैर्विशिखै: शितै:॥३३॥
परस्पर युद्धे त्यांच्या अव्यवस्था भयंकर।
दोघांनी वेगाने तीक्ष्ण सोडलेल्या बाणांनी॥३३॥

निरन्तरमिवाकाशं बभूव तमसा वृतम्।
तै: पतद्भिश्च बहुभिस्तयो: शरशतै: शितै:॥३४॥
शेकडो तीक्ष्ण बाणांनी त्यांनी सोडलेल्या नभ।
अखंड जणु होऊनि तमे होतसे व्याप्त ते॥३४॥
दिशश्च प्रदिशश्चैव बभूवु: शरसंकुला:।
तमसा पिहितं सवमासीत् प्रतिभयं महत्॥३५॥
दिशा उपदिशा सर्व बाणांनी भरुनी जाती।
अन्धार सर्वत्र पसरे भय मोठे निर्मित॥३५॥

अस्ते गते सहस्रांशी संवृत तमसा च वै।
रुधिरौघा महानद्य: प्रावर्तन्त सहस्रश:॥३६॥
अस्ता जाई सहस्रांश सर्वत्र पसरे तम।
वाहु लागति रक्ताच्या मोठ्या प्रवाही नद्या॥३६॥
क्रव्यादा दारुणा वाग्भिश्चिक्षिपुर्भीमनि:स्वनान् ।
न तदानीं ववौ वायुर्न च जज्वाल पावक:॥३७॥
ओरडू लागती जीव मांसाहारी भयंकर।
वाहणे थाम्बवी वारा अग्निही न पेटतसे॥३७॥

स्वस्त्यस्तु लोकेभ्य: इति जजल्पुस्ते महर्षय:।
सम्पेतुश्चात्र संतप्ता गन्धर्वा: सह चारणै:॥३८॥
होवो कल्याण लोकांचे महर्षि करती जप।
संतप्त गन्धर्व चारण एकत्र जमती तिथे॥३८॥
अथ राक्षससिंहस्य कृष्णान् कनकभूषणान्।
शरैश्चतुर्भि: सौमित्रिर्विव्याध चतुरो हयान्॥३९॥
राक्षससिंहाचे काळे सुवर्णालंकृत चार।
हय बाणांनी लक्ष्मण चारी टाकी मारुनी॥३९॥

ततोऽपरेण भल्लेन पीतेन निशितेन च।
सम्पूर्णायतमुक्तेन सुपत्रेण सुवर्चसा॥४०॥
महेन्द्राशनिकल्पेन सूतस्य विचरीष्यतः।
स तेन बानाशनिना तलशब्दानुनादिना॥४१॥

अन्य पीत भल्लबाण जयाचे पंख तेजस्वी।
उत्तम तीक्ष्ण धनुष्या पूर्ण ओढुनि सोडुनी॥४०॥
इन्द्राच्या वज्रासम निनादे तलवारीच्या।
वज्ररूपी बाणाने सारथ्यास त्याने मारले॥४१॥

लाघवाद् राघवः श्रीमान् शिरः कायादपाहरत्।
स यन्तरि महातेजा हते मन्दोदरीसुतः॥४२॥
स्वयं सारथ्यमकरोत् पुनश्च धनुरस्पृशत्।
तदद्भुतमभूत् तत्र सारथ्यं पश्यतां युदि॥४३॥ ।
लक्ष्मणाने चापल्याने धडापासून उडविता।
सारथ्याचे शिर तदा इन्द्रजित मन्दोदरीसुत॥४२॥
स्वतः करी सारथ्य धनुष्य पुन्हा हाति घे।
पाहणाऱ्यांस सारथ्य त्याचे अद्भुत वाटले॥४३॥

हयेषु व्यग्रहस्तं तं विव्याध निशितै: शरै:।
धनुष्यथ पुनर्व्यग्रं हयेषु मुमुवे शरान्॥४४॥
तीक्ष्ण बाणे करी विद्ध जेव्हा व्यस्त घोड्यावरी
आणि धनुष्यी व्यस्त होता घोड्यास लक्ष्य करी॥४४॥
छिद्रेषु तेषु बाणौघैर्विचरन्तमभीतवत्।
अर्दयामास समरे सौमित्रि: शीघ्रकृत्तम:॥४५॥
निर्भये त्या छिद्रातुनि फिरणाऱ्या इन्द्रजिता।
बाणवर्षावे लक्ष्मण पीडा युद्धात् देतसे॥४५॥

निहतं सारथिं दृष्ट्वा समरे रावणात्मज:।
प्रजहौ समरोद्दर्ष् विषण्ण: स बभूव ह॥४६॥
सारथि मारला जाई पाहून् हे इन्द्रजित्।
सोडी युद्धाचा उन्माद विषण्ण अति होतसे॥४६॥
विषण्णवदनं दृष्ट्वा राक्षसं हरियूथपा:।
तत: परमसंहृष्टा लक्ष्मणं चाभ्यपूजयन्॥४७॥
विषण्णवदन पाहुनि राक्षसा सर्व वानरयूथप।
अत्यन्त हर्षित होती प्रशंसति ते लक्ष्मणा॥४८॥

ते चास्य हयमुख्येषु तूर्णमुत्पत्य वानराः।
चतुर्षु सुमहावीर्या निपेतुर्भीमविक्रमाः॥४९॥
ते चार महावीर वानर भीमपराक्रमी।
करती हल्ला त्याच्या चार मुख्य घोड्यांवर॥४९॥
तेषामधिष्ठितानां तैर्वानरैः पर्वतोपमैः।
मुखेभ्यो रुधिरं व्यक्तं हयानां समवर्तत॥५०॥
पर्वतोपम वानरे घोड्यांना दाबल्यावर।
रक्त वाहु लागे त्या घोड्यांच्या मुखातुनी॥५०॥

ते हया मथिता भग्ना व्यसवो धरणीं गता:।
ते निहत्य हयांस्तस्य प्रमथ्य च महारथम्।
पुनरुत्पत्य वेगेन तस्थुर्लक्ष्मणपार्श्वत:॥५१॥
मर्दने भग्न होऊनि अश्व पडती भूवरी।
मारूनि घोडे त्याचे आणि रथ मोडुनी।
वानर उड्या मारुनी येती लक्ष्मणासवे॥५१॥
स हताश्वादवप्लुत्य रथान्मथितसारथि:।
शरवर्षेण सौमित्रिन्भ्यधावत रावणि:॥५२॥

घोडे मारले जाता सारथीही त्यांसवे ।
इन्द्रजित शरवर्षावे धावतसे लक्ष्मणावरी॥५२॥
ततो महेन्द्रप्रतिम: स लक्ष्मण: पदातिनं तं निहतैर्हयोत्तमै:।
सृजन्तमाजौ निशितान् शरोत्तमान् भृशं तदा बाणगणैर्व्यदारयत्॥५३॥
तेव्हां इन्द्रासमान पराक्रमी लक्ष्मण हत अश्व त्या इन्द्रजिता।
युद्धात तीक्ष्ण बाण सोडणाऱ्या करी बाणसमूहे अत्यंत विदीर्ण॥५३॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोननवतितम: सर्ग:॥८९॥

युद्धकाण्ड सर्ग ९०

स हताश्वो महातेजा भूमौ तिष्ठन् निशाचरः।
इन्द्रजित् परमकृद्धः सम्प्रजज्वाल तेजसा॥१॥
हताश्व महातेजस्वी निशाचर भूवरी उभा ।
अतिक्रोधे इन्द्रजित प्रज्वलित तेजे होतसे॥१॥
तौ धन्विनौ जिघांसन्तावन्योन्यमिषुभिर्भृशम्।
विजयेनाभिनिष्क्रान्तौ वने गजवृशाविव॥२॥

एकमेका मारण्याचे इच्छुक दोघे धनुर्धर।
विजयास्तव पुढे येती श्रेष्ठ गजांसम वनी॥२॥
निर्बह्यन्तश्चान्योन्यं ते राक्षसावनौकस:।
भर्तारं न जुहुर्युद्धे सम्पतन्तस्ततस्तत:॥३॥
एकमेका मारणारे राक्षस आणि वानर।
न सोडति स्वस्वामींना धावताना चहुकडे॥३॥
ततस्तान् राक्षसान् सर्वान् हर्षयन् रावणात्मज:।
स्तुन्वानौ हर्षमाणश्च इदम् वचनमब्रवीत्॥४॥

तेव्हा राक्षसां त्या सर्व करुनी हर्षित तदा।
स्तुती करुनिया त्यांची वचन ऐसे बोलला॥४॥
तमसा बहुलेनेमा: संसक्ता: सर्वतो दिश:।
नेह विज्ञायते स्वो वा परो वा राक्षसोत्तमा:॥५॥
व्यापल्या जाति काळोखे राक्षसांनो दिशा सर्व।
न कळे त्यामुळे कोण आपला परका तसा॥५॥
धृष्टं भवन्तो युध्यन्तु हरीणां मोहनाय वै।
अह् तथमास्थाय आगमिष्यामि संयुगे॥६॥

करा धिटाईने युद्ध करण्या मोहित वानरां।
येईन पुन्हा युद्धात होऊनि स्वार रथावरी॥६॥
तथा भवन्त: कुर्वन्तु यथेमे हि वनौकस:।
न युद्ध्येयुर्महात्मान: प्रविष्टे नगरं मयि॥७॥
तुम्ही सर्व करा ऐसे ज्यामुळे सर्व वानर ।
युद्ध न करती जोवरी मी नगरात प्रवेशीन ॥७॥
इत्युक्त्वा रावणसुतो वञ्चयित्वा वनौकस:।
प्रविवेश पुरीं लंकां रथहेतोरमित्रहा॥८॥

बोलुनी इद्रजित् ऐसे न कळू देता वानरां।
प्रवेश करि लंकेत रथ येण्यास घेउनी॥८॥
स रथं भूषयित्वाथ रुचिरं हेमभूषितम्।
प्रासासिशरसंयुक्तं युक्तं परमवाजिभि:॥९॥
रथ् सुवर्णभूषित भाले तलवारी सह।
बाणयुक्त उत्तम घोडे जोडलेला असे॥९॥
अधिष्ठितं हयज्ञेन सूतेनाप्तोपदेशिना।
आरुरोह महातेजा रावणि: समितिंजय:॥१०॥

घोड्याचे ज्ञान ज्या ऐसा हितोपदेशी सारथी।
युक्त रथावर चढे तेजस्वी रावणपुत्र ॥१०॥
स राक्षसगणैर्मुखैर्वृतो मन्दोदरीसुतः।
निर्ययौ नगराद् वीरः कृतान्तबलचोदितः॥११॥
कालबले प्रेरित् मन्दोदरीपुत्र वीर तो।
राक्षसांच्या समूहासवे नगराबाहेर पडे॥११॥
सोऽभिनिष्क्रम्य नगरादिन्द्रजित परमौजसा।
अभ्ययाज्जववैरर्लक्ष्मणं सविभीषणम्॥१२॥

नगरातुनि बाहेर् पडे ओजस्वी इन्द्रजित्।
चाल करुनी जाई सविभीषण लक्ष्मणावरी ॥१२॥
ततो रथस्थमालोक्य सौमित्री रावणात्मजम्।
वानराश्च महावीर्या राक्षसश्च विभीषण:॥१३॥
पाहूनि रथी आरूढ रावणपुत्रास लक्ष्मण।
वानर महापराक्रमि राक्षस विभीषण॥१३॥
विस्मयं परमं जग्मुर्लाघवात् तस्य धीमत:।
रावणिश्चापि संक्रुद्धो रणे वानरयूथपान् ॥१४॥

चपळाईने त्याच्या आश्चर्यचकित ते अति।
रावणपुत्र क्रोधाने वानरसेनापतीवरी ॥१४॥
पातयामास बाणौघैः शतशोऽथ सहस्रशः।
स मण्डलीकृतधनू रावणिः समितिंजयः॥१५॥
सहस्रशत बाणांनी त्यांना पाडु लागला।
सोडी बाण करुनिया मण्डलाकार धनु॥१५॥
हरीनभ्यहत् क्रुद्धः परं लाघवमास्थितः।
ते वध्यमाना हरयो नाराचैर्भीमविक्रमाः॥१६॥

क्रोधित करी चपळाईने प्रहार वानरांवरी।
पराक्रमी वानर् होती घायाळ् नाराच बाणे ॥१६॥
सौमित्रिं शरणं प्राप्ता: प्रजापतिमिव प्रजा:।
तत: समरकोपेन ज्वलितो रघुनन्दन:।
चिच्छेद कार्मुकं तस्य दर्शयन् पाणिलाघवम्॥१७॥
लक्ष्मणा शरण येतीजशी ब्रह्मदेवा प्रजा।
प्रज्वलित युद्धज्वरे रघुनन्दन लक्ष्मण।
धनुष्या त्याच्या तोडी आपल्या हस्तलाघवे॥१७॥

सोऽन्यत्कार्मुकमादाय सज्यं चक्रे त्वरन्निव।
तदप्यस्य त्रिभिर्बाणैर्लक्ष्मणो निरकृन्तत॥१८॥
आणुनी धनुष्य दुसरे त्वरेने प्रत्यंचा लावि त्या।
तेसुद्धा तीन बाणांनी लक्ष्मण टाकि तोडुनी॥१८॥
अथैनं छिन्नधन्वानमाशीविषविषोपमै:।
विव्याधोरसि सौमित्री रावनं पञ्चभि: शरै:॥१९॥
नंतर धनुष्यहीन रावणपुत्रास लक्ष्मण।
सोडुनिया शर पाच छातीत घायाळ करी॥१९॥

ते तस्य् कायं निर्भिद्य महाकार्मुकनि:सृता:।
निपेतुर्धरणीं बाणा रक्ता इव महोरगा:॥२०॥
महाधनुष्यातुनि बाण त्याच्या शरीरा भेदुनी।
रक्ते लाल सर्पापरी पडती जमिनीवरी॥२०॥
स च्छिन्नधन्वा रुधिरं वमन् वक्त्रेण् रावणि:।
जग्राह कार्मुकश्रेष्ठं दृढज्यं बलवत्तरम्॥२१॥
धनुहीन रावणपुत्र रक्त ओकत असता।
प्रत्यंचा ज्या बळकट धनु अन्य श्रेष्ठ घेतसे॥२१॥

स लक्ष्मणं समुद्दिश्य परं लाघवमास्थित:।
ववर्ष शरवर्षाणि वर्षाणीव पुरंदर:॥२२॥
लक्ष्मणा करुनी लक्ष्य वेगाने करि वर्षाव।
बाणांचा जसा वर्षाव पाण्याचा इन्द्र करी॥२२॥
मुक्तमिन्द्रजिता तत्तु शरवर्षमरिंदम:।
आवारयदसम्भ्रान्तो लक्ष्मण: सुदुरासदम्॥२३॥
दुर्धर बाणाचा वर्षाव इन्द्रजिताने सोडला।
अडवी न घाबरता शत्रुनाशन लक्ष्मण॥२३॥

संदर्शयामास तदा रावणिं रघुनन्दनः।
अस्म्भ्रान्तो महातेजास्तदद्भुतमिवाभवत्॥२४॥
महातेजस्वी लक्ष्मण रावणपुत्रा आपला।
दाखवी पराक्रम जो वाटे सर्वां अद्भुत ॥२४॥
ततस्तान् राक्षसान् सर्वांस्त्रिभिरेकैकमाहवे।
अविध्यत् परमक्रुद्धः शीघ्रास्त्रं सम्प्रदर्शयन्।
राक्षसेन्द्रसुतं चापि बाणौघैः समताडयन्॥२५॥
नन्तर अत्यन्त क्रुद्ध शीघ्रास्त्र प्रयोग करी।

करी राक्षसांना सर्व वापरूनि बाणत्रय्।
करी राक्षसराजपुत्रा बाणसमूहे ताडन् ॥२५॥
सोऽतिविद्धो बलवता शत्रुणा शत्रुघातिना।
असक्तं प्रेषयामास लक्ष्मणाय बहून् शरान्॥२६॥
शत्रुघातक लक्ष्मणे झालेला घायाळ तो।
सोडी अविरतपणे बाण अनेक त्याच्यावरी ॥२६॥
तान्प्राप्तान् शितैर्बाणैश्चिच्छेद परवीरहा।
सारथेरस्य च रणे रथिनो रथसत्तम:॥२७॥

तोडी लक्ष्मण ते बाण जवळ येण्यापूर्विच।
आणि सारथ्याला त्याच्या करी घायाळ तदा॥२७॥
शिरो जहार धर्मात्मा भल्लेनानतपर्वणा।
असूनास्ते हयास्तत्र् रथमूहुरविक्लवा:॥२८॥
मस्तक सारथ्याचे करी हरण लक्ष्मण।
भल्ल बाणे तरी घोडे ओढती रथ निर्भय॥२८॥
मण्डलान्यभिधावन्ति तदद्भुतमिवाभवत्।
अमर्षवशमापन्न: सौमित्रिर्दृढविक्रम:॥२९॥

धावती मंडलाकार अश्व जे दिसे अद्भुत।
तदा दृढ पराक्रमी लक्ष्मणही क्रोधे वश॥२९॥
प्रत्यविद्ध्यद्धयांस्तस्य शरैर्विंत्रासयन् रणे।
अमर्षमाणस्तत्कर्म रावणस्य सुतो रणे॥३०॥
इन्द्रजितावरि क्रुद्ध करीतसे विद्ध लक्ष्मण।
त्याच्या घोड्यांस तदा इन्द्रजित क्रुद्ध होतसे॥३०॥
विव्याध दशभिर्बाणै: सौमित्रिं तममर्षणम्।
ते तस्य वज्रप्रतिमा: शरा: सर्पविषोपमा:।

विलयं जग्मुरागत्य कवचं कांचनप्रभम्॥३१॥
करी विद्ध दश बाणे लक्ष्मणा क्रोधे इन्द्रजित् ।
वज्रासमान बाण सर्पाच्या विषासमान ते।
सुवर्णकान्ति त्याच्या कवचावर येउनी नष्ट॥३२॥
अभेद्यकवचं मत्त्वा लक्ष्मणं रावणात्मज:।
ललाटे लक्ष्मणं बाणै: सुपुङ्खैस्त्रिभिरिन्द्रजित्॥३२॥
अविध्यत् परमक्रुद्ध: शीघ्रमस्तं प्रदर्शयन्।
तै: पृषत्कैर्ललाटस्थै: शुशुभे रघुनन्दन:॥३३॥

जाणुनी लक्ष्मणाचे कवच अभेद्य इन्द्रजित्।
कौशल्ये शीघ्रास्त्राच्या करी प्रहार मस्तकी॥३२॥
बाणांनी तीन पिसांनी चांगल्या युक्त इन्द्रजित् ।
त्या बाणांनी शोभून दिसू लागे लक्ष्मण॥३३॥
रणाग्रे समरश्लाघी त्रिशृङ्ग इव पर्वत:।
स तथाप्यर्दितो बाणै राक्षसेन तदा मृधे॥३४॥
रणाग्री युद्धप्रशंसी तीन शिखरे असति ज्या।
अश्या पर्वतासम लक्ष्मण त्या बाणें शोभला।

परी तो पीडित होई बाणांनी इन्द्रजिताच्या॥३४॥
तमाशु प्रतिविव्याध लक्ष्मण: पंचभि:शरै:।
विकृष्येन्द्रजितो युद्धे वदने शुभकुण्डले॥३५॥
लक्ष्मण त्याच्या सुन्दर कुण्डलयुक्त मुखावरी।
पांच बाणांनी करी प्रतिवार तत्काळ् युद्धामध्ये॥३५॥
लक्ष्मणेन्द्रजितौ वीरौ महाबलशरासनौ।
अन्योन्यं जघ्नतुर्वीरौ विशिखेर्भीमविक्रमौ॥३६॥
लक्ष्मण इन्द्रजित् वीर महाबली पराक्रमी।
एकमेकावरी करती बाणांनी प्रहार ते॥३६॥

ततः शोणितदिग्धांगौ लक्ष्मणेन्द्रजितावुभौ।
रणे तौ रेजतुर्वीरौ पुष्पिताविव किंशुकौ॥३७॥
रक्ताने माखलेले ते लक्ष्मण आणि इन्द्रजित्।
शोभति रणात फुललेल्या पलाशवृक्षापरी॥३७॥
तौ परस्परमभ्येत्य सर्वगात्रेषु धन्विनौ।
घोरैर्विव्यधतुर्बाणैः कृतभावावुभौ जये॥३८॥
एकमेकां धनुर्धारी विद्ध सर्वाङ्गावरी ।
घोर बाणांनी करती जयास्तव कृतनिश्चय॥३८॥

ततः समरकोपेन संयुतो रावणात्मजः।
विभीषणं त्रिभिर्बाणैर्विव्याध वदने शुभे॥३९॥
युद्धाच्या रागाने युक्त रावणपुत्र इन्द्रजित्।
करी प्रहार बिभीषणाच्या सुन्दर् मुखावरी॥३९॥
अयोमुखैस्त्रिभिर्विद्ध्वा राक्षसेन्द्र विभीषणम्।
एकैकेनाभिविव्याध तान् सर्वान् हरियूथपान्॥४०॥
बाणे तीन लोहमुखी करुनी विद्ध विभीषणा ।
एकेक बाणाने करी इतर सर्वां वानरां ॥४०॥

तस्मै दृढतरं क्रुद्धो जघान गदया हयान्।
विभीषणो महातेजा रावणे: स दुरात्मन:॥४१॥
विभीषण महातेजस्वी दुरात्मा इन्द्रजितावरी
क्रुद्ध होउनि गदेने घोड्यास त्यांच्या मारिले॥४१॥
स हताश्वादवप्लुत्य रथान्निहतसारथे:।
अथ शक्तिं महातेजा: पितृव्याय मुमोच ह॥४२॥
सारथी मृत तसे घोडे मेलेला इन्द्रजित् तदा।
उतरे उडी मारुनी रथावरुनी खालती।
शक्ति अस्त्र सोडी तो आपल्या चुलत्यावरि॥४२॥

तामापतन्तीं सम्प्रेक्ष्य सुमित्रानन्दवर्धन:।
चिच्छेद निशितैर्बाणैर्दशधापातयद् भुवि॥४३॥
शक्तीस पाहुनी येता सुमित्रानन्दन तीक्ष्ण
बाणांनी दहा तुकडे करुनी पाडी भूवरी॥४३॥
तस्मै दृढधनु: क्रुद्धो हताश्वाय विभीषण:।
वज्रस्पर्शसमान् पंच ससर्जोरसि मार्गणाम्॥४४॥
तेव्हां कृद्ध विभीषण दृढ धनुष्य धारक।
सोडी वज्रासम पाच बाण इन्द्रजितावरी॥४४॥

ते तस्य कायं भित्त्वा तुरुष्कपुङ्खा निमित्तगा:।
बभूवुर्लोहितादिग्धा तक्षा इव महोरगा:॥४५॥
सुवर्णपंखयुक्त बाण शरीर त्याचे भेदुनी।
माखता रक्ते लाल सर्पासम दिसु लागती॥४५॥
स पितृव्यस्य संकृद्ध इन्द्रजिच्छरमाददे।
उत्तमं रक्षसां मध्ये यमदत्तं महाबल:॥४६॥
इन्द्रजित् राक्षसश्रेष्ठ कृद्ध विभीषणावरी ।
लागला घेउ यमाने दिलेला बाण उत्तम ॥४६॥

तं समीक्ष्य महातेजा महेषुं तेन संहितम्।
लक्ष्मणोऽप्याददे बाणमन्यद् भीमपराक्रम:॥४७॥
जोडता त्या महाबाण पाहून भीमपराक्रम।
महातेजस्वी लक्ष्मण दुसरा बाण घेतसे ॥४७॥
कुबेरेण स्वयं स्वप्ने यद् दत्तमितात्मना।
दुर्जयं दुर्विषह्यं च सेन्द्रैरपि सुरासुरै:॥४८॥
स्वत: कुबेराने स्वप्नात दिलेला जो इन्द्रासह।
देवासुरां जिंकण्या कठिण आणि असह्य जो॥४९॥

तयोस्तु धनुषी श्रेष्ठे बाहुभि: परिघोपमै:।
विकृष्यमाणे बलवत् क्रौन्चाविव चुकूजतु:॥४९॥
मुसळासम बाहूंनी ओढली जाति श्रेष्ठ जी।
धनुष्ये क्रौन्च पक्ष्यापरी आवाज करु लागती॥४९॥
ताभ्यां तु धनुषी श्रेष्ठे संहितो सायकोत्तमौ।
विकृष्यमाणौ वीराभ्यां भृशं जज्वलतु: श्रिया॥५०॥
धनुष्यावरि उत्तम बाण जोडलेले ओढता।
उभय वीरांनी कांतीने अत्यंत चमकू लागले॥५०॥

तौ भासतन्तावाकाशं धनुभ्र्यां विशिखौ च्युतौ।
मुखेन मुखमाहत्य संनिपेततुरोजसा॥५१॥
धनुष्यातुन मुक्त ते बाण उजळुनी नभा।
वेगाने परस्परांवरि आदळती मुखांवरी॥५१॥
संनिपातस्तयोश्चासीच्छरयोर्घोररूपयो:।
सधूमविस्फुलिङ्गश्च तज्जोऽग्निर्दारुणोऽभवत्॥५२॥
आघाते त्या घोररूपी बाणांच्या परस्परांवरी।
होई त्यातून ठिणग्या धुरासह अग्नि उत्पन्न॥५२॥

तौ महाग्रहसंकाशावन्योन्यं संनिपत्य च।
संग्रामे शतधा यातौ मेदिन्यां चैव पेततु:॥५३॥
महाग्रहासम ते दोन बाण एकमेकावरी ।
आदळून शतधा तुटुनी पडती आणि भूवरी॥५३॥
शरौ प्रतिहतौ दृष्ट्वा तावुभौ रणमूर्धनि।
व्रीडितौ जातरोषौ च लक्ष्मणेन्द्रजितौ तदा॥५४॥
पाहुनी आपले बाण नष्ट होता रणामध्ये।
दोघेहि लज्जित होती आणि होती क्रोधित॥५४॥

सुसंरब्धस्तु सौमिरिरस्त्रं वारुणमाददे ।
रौद्रं महेन्द्रजिद् युद्धेऽप्यसृजद् युधि निष्ठित:॥५५॥
लक्ष्मण अतिसंतप्त वारुणास्त्रा घेतसे।
तदा महेन्द्रजित् सुद्धा सोडी रौद्रास्त त्यावरी॥५५॥
तेन तद्विहितं शस्त्रं वारुणं परमाद्भुतम्।
तत: क्रुद्धो महातेजा इन्द्रजित् समितिंजय:।
अग्नेयं संदधे दीप्तं स लोकं संक्षिपन्निव॥५६॥
रौद्रास्त्रे नष्ट होता वारुणास्त्र परम अद्भुत।

तेव्हां इन्द्रजित क्रोधे योजी आग्नेयास्त्र जे।
जणु सर्व लोकां जाळूनि टाकणारे असे॥५६॥
सौरेणास्त्रेण तद् वीरो लक्ष्मण: पर्यवारयत्।
अस्त्रं निवारितं दृष्ट्वा रावणि: क्रोधमूर्च्छित:॥५७॥
आग्नेयास्त्रा लक्ष्मण सौरास्त्राने थांबवी।
पाहुनी ते रावणपुत्र क्रोधाने लाल होतसे॥५७॥
आददे निशितं बाणमासुरं शत्रुदारणम् ।
तस्माच्चापाद् विनिष्पेतुर्भास्वरा: कूटमुद्गरा:॥५८॥

घेई तो आसुर बाण शत्रूस विदीर्ण जो करी।
पडति कूटमुद्गर बाहेर् तेव्हां धनुष्यातुनी ॥५८॥
शूलानि च भुशुण्ड्यश्च गदा: खड्गा: परश्वधा:।
तद् दृष्ट्वा लक्ष्मण: संख्ये घोरमस्त्रमथासुरम्॥५९॥
शूल भृशुण्डी गदा खड्ग परशु ऐसी तयातुनी।
निघू लागती अस्त्रे पाहुनि युद्धात् लक्ष्मण ॥५९॥
अवार्यं सर्वभूतानां सर्वशस्त्रविदारणम्।
महेश्वरेण् द्युतिमांस्तदस्त्रं प्रत्यवारयत्॥६०॥

अनिवार्य सर्व प्राण्यां सर्व शस्त्रां जे थोपवी।
थाम्बवी ते तेजस्वी लक्ष्मण माहेश्वर अस्त्रे ॥६०॥
तयो: समभवद् युद्धमद्भुतं रोमहर्षणम्।
गगनस्थानि भूतानि लक्ष्मणं पर्यवारयन्॥६१॥
दोघात होतसे युद्ध अद्भुत आणि रोमांचक।
आकाशातील जमती प्राणी लक्ष्मणासवे॥६१॥
भैरवाभिरुते भीमे युद्धे वानररक्षसाम्।
भूतैबहुभिराकाशं विस्मितैरावृतं बभौ॥६२॥

भीषण युद्ध ते राक्षस वानरांतील भयंकर।
शोभे भूतांनी पाहण्या जमलेल्यातदा नभ॥६३॥
ऋषय: पितरो देवा गन्धर्वगरुडोरगा:।
शतक्रतुं पुरस्कृत्य ररक्षुर्लक्ष्मणं रणे॥६३॥
ऋषी पितर् गन्धर्व गरुड नाग इन्द्रासवे।
करती रणांगणात लक्ष्मणाचे रक्षण॥६३॥
अथान्यं मार्गणश्रेष्ठं संदधे राघवानुज:।
हुताशनसमस्पर्शं रावणात्मजदारणम्॥६४॥

लक्ष्मण नन्तर लावी अग्निस्पर्शी श्रेष्ठ बाण।
विदीर्ण रावणपुत्रा करण्या धनुष्यावरी॥६४॥
पत्रमनुवृताङ्गं सुपर्वाणं सुसंस्थितम् ।
सुवर्णविकृतं वीरः शरीरान्तकरं शरम्॥६५॥
पिसे उत्तम ज्यास सुव्यवस्थित जो असे।
सुवर्णभूषित बाण शरीराचा अन्त जो करी॥६५॥
दुरावारं दुर्विषहं राक्षसानां भयावहम्।
आशीविषप्रख्यं देवसंघैः समर्चितम्॥६६॥

दुरास्पद दुर्विष जो भयकारी राक्षसां ।
सर्पासम विषारी देवांकडुनी पूजित॥६६॥
येन शक्रो महातेजा दानवानजयत् प्रभु:।
पुरा देवासुरे युद्धे वीर्यवान् हरिवाहन:॥६७॥
पूर्वी देव असुर युद्धे महातेजस्वी पराक्रमी।
घोड्यावर बसुनी इन्द्राने दानवा जिंकले असे॥६७॥
अथैन्द्रमस्त्रं सौमित्रि: संयुगेष्वपराजितम्।
शरश्रेष्ठं धनुश्रेष्ठे विकर्षन्निदमब्रवीत्॥६८॥

असे अपराजित ऐन्द्रास्त्र श्रेष्ठ बाण जो।
लावता धनुष्यावर् लक्ष्मण ऐसे बोलला॥६८॥
लक्ष्मीवोंल्लक्ष्मणो वाक्यमर्थसाधकमात्मन:।
धर्मात्मा सत्यसंघश्च रामो दाशरथिर्यदि।
पौरुषं चाप्रतिद्वन्द्वस्तदैनं जहि रावणिम्॥६९॥
लक्ष्मण आपला हेतु साधणारे वदे वाक्य।
असतील जर श्रीराम धर्मात्मा सत्यप्रतिज्ञ।
पौरुषे प्रतिस्पर्धी जर त्यांना कोणी नसे।

तर इन्द्रजिता मारो बाण् हा जो मी सोडतो॥६९॥

इत्युक्त्वा बाणमाकर्णं विकृष्य तमजिह्वगम्।
लक्ष्मण: समरे वीर: ससर्जेन्द्रजितं प्रति।
ऐन्द्रास्त्रेण समायुज्य लक्ष्मण: परवीरहा॥७०॥

ऐसे बोलुनि लक्ष्मणे आकर्ण बाण् तो ओढुनी।
करुनि युक्त ऐन्द्रास्त्रे इन्द्रजितावरि सोडला ॥७०॥

तच्छिर: सशिरस्त्राणं श्रीमज्ज्वलितकुण्डलम्।
प्रमथ्येन्द्रजित: कायात् पातयामास भूतले॥७१॥

बाणे त्या सशिरस्त्राण कुण्डलासह ज्वलन्त।
शिर इन्द्रजिताचे तोडुनि शरीरापासुनि पाडले॥७१॥
तद् राक्षसतनूजस्य भिन्नस्कन्धं शिरो महत्।
तपनीयनिभं भूमौ ददृशे रुधिरोक्षितम्॥७२॥
तदा राक्षसपुत्राचे वेगळे खान्द्यापासुनी।
झालेले मस्तक मोठे तेजस्वी सोन्यापरी।
रक्ताने माखलेले जे भूवरी पडलेले दिसे॥७२॥
हत: स निपपताथ धरण्यां रावणात्मज:।
कवची सशिरस्त्राणो विप्रविद्धशरासन:॥७३॥

रावणपुत्र मारला गेलेला शिरस्त्राण कवचासह।
कोसळे धरणीवर धनुष्य पडता भूवरी॥७४॥
चुक्रुशुस्ते तत: सर्वे वानरा: सविभीषणा:।
हृष्यन्ते निहते तस्मिन् देवा वृत्रवधे यथा॥७४॥
करती गर्जना मोठी बिभीषणासह वानर।
आनंदित सुरांसम वृत्रासुर वध समयी॥७४॥
अधान्तरिक्षे देवानामृषीणां च महात्मनाम्।
जज्ञेऽथ जयसंनादो गन्धर्वाप्सरसामपि॥७५॥

त्यानन्तर नभी देव गन्धर्व ऋषि अप्सरा।
यांच्या जयजयकाराचा नाद घुमू लागला॥७५॥
पतितं समभिज्ञाय राक्षसी सा महाचमू:।
वध्यमाना दिशौ भेजे हरिभिर्जितकाशिभि:॥७६॥
पडता राक्षससेना पळू लागे दिशोदिशां।
विजयी वानर सेना हाकले जेव्हां तयां॥७६॥
वानरैर्वध्यमानास्ते शस्त्राण्युत्सृज्य राक्षसा:।
लङ्कामभिमुखा: सस्त्रुर्भ्रष्टसंज्ञा: प्रधाविता:॥७७॥

वानरे मारले जाता शस्त्रे टाकुनी राक्षस।
भान हरपुनि पळती लंकेकडे जाण्यास्तव॥७७॥
दद्रुवुर्बहुधा भीता राक्षसा: शतशो दिश:।
त्यक्त्वा प्रहरणान् सर्वे पत्तिशासिपरश्वधान्॥७८॥
राक्षस घाबरलेले पळती सर्व दिशांना।
टाकुनी पट्टिश परशु तरवारी शस्त्रे अशी॥७८॥
केचिल्लङ्कां परित्रसता: प्रविष्टा वानरार्दिता:।
समुद्रे पतिता: केचित् केचित् पर्वतमाश्रिता:॥७९॥

वानरपीडित काही घाबरलेले राक्षस।
शिरती लंकेत काही काही सागर पर्वती॥७९॥
हतमिन्द्रजितं दृष्ट्वा शयानं च रणक्षितौ।
राक्षसानां सहस्रेषु न कश्चित् प्रत्यदृश्यत॥८०॥
इन्द्रजित मृत होऊन् रणभूमीवर पडे ।
सहस्र राक्षसांपैकी न उरे कोणी पाहुनी ॥८०॥
यथास्तं गतं आदित्ये नावतिष्ठन्ति रश्मय:।
तथा तस्मिन् निपतिते राक्षसास्ते गता दिश:॥८१॥

सूर्य मावळता जैसे उरती न रविकिरणे।
तसा इन्द्रजित् पडता राक्षस उरती न तिथे॥८१॥
शान्तरश्मिरिवादित्यो निर्वाण इव पावक:।
बभूव स महाबाहुर्व्यपास्तगतजीवित:॥८२॥
नष्टकिरण सूर्यासम अग्नीसम विझलेल्या।
दिसे तसा महाबाहु पडता प्राण जाउनी॥८२॥
प्रशान्तपीडाबहुलो विनष्टारि: प्रहर्षवान्।
बभूव लोक: पतिते साक्षसेन्द्रसुते तदा॥८३॥

पडता रावणपुत्र लोकांच्या पीडेचा महा।
भाग शान्त होतसे त्यामुळे लोक हर्षित्॥८३॥
हर्षं च शक्रो भगवान् सह सर्वैर्महर्षिभि:।
जगाम निहते तस्मिन् राक्षसे पापकर्मणि॥८४॥
पापकर्मी राक्षसाचा त्या झाल्यावरी वध।
महर्षींसह भगवान् इन्द्र हर्षित होतसे॥८४॥
आकाशे चापि देवानां शुश्रुवे दुन्दुभिस्वन:।
नृत्यद्भिरप्सरोभिश्च गन्धर्वैश्च महात्मभि:॥८५॥

आकाशी आणि देवांच्या ऐकु ये दुंदुभिध्वनी।
महात्मे गन्धर्व आणि नृत्य करती अपसरा॥८५॥
ववर्षु: पुष्पवर्षाणि तदद्भुतमिवाभवत्।
प्रशशाम हते तस्मिन् राक्षसे क्रूरकर्मणि॥८६॥
पुष्पवृष्टि करती देव अद्भुत ती वाटली।
सर्वत्र शान्तता होई राक्षसाच्या वधामुळे॥८६॥
शुद्धा आपो नभश्चैव जहृषुर्देवदानवा:।
आजग्मु: पतिते तस्मिन सर्वलोकभयावहे॥८७॥

शुद्ध नभ तसे पाणी हर्षित देव दानव।
लोकांना भयकारी तो पडता येती ते तिथे॥८७॥
ऊचुश्च सहितास्तुष्टा देवगन्धर्वदानवा:।
विज्वरा: शान्तकलुषा ब्राह्मणा विचरन्विस्ति॥८८॥
संतुष्ट देवगन्धर्व दानव म्हणती असे।
ब्राह्मणे चिंतारहित् विचरावे शान्तपणे॥८८॥
रणी अप्रतिम बळ तो इन्द्रजित मृत पाहुनी।
करती वानरयूथप अभिनन्दन हर्षित॥८९॥

विभीषणो हनूमांश्च जाम्बवांश्चर्क्षयूथप:।
विजयेनाभिननदन्तस्तुष्टुवुश्चापि लक्ष्मणम्॥९०॥
विभीषण हनुमान ऋष्ययूथप जाम्बवान।
अभिनन्दति लक्ष्मण स्तवोनि विजयास्तव॥९०॥
क्ष्वेडन्तश्च प्लवन्तश्च गर्जन्तश्च प्लवंगमा:।
लब्धलक्षा रघुसुतं परिवार्योपतस्थिरे॥९१॥
काही वानर मोठ्याने गर्जती उड्या मारती।
उभे लक्ष्मणाभंवती लक्ष्य साध्य ज्याच्यामुळे॥९१॥

लाङ्गलानि प्रविध्यन्त्: स्फोटयन्तश्च वानरा:।
लक्ष्मणो जयतीत्येव वाक्यं विश्रावयंस्तदा॥९२॥
शेपट्या हलवित तेव्हां वानर टाळ्या पिटित।
करती घोष विजय असो लक्ष्मणाचा उच्चस्वरे॥९२॥
अन्योन्यं च समाश्लिष्य हरयो हृष्टमानसा।
चक्रुरुच्चावचगुणा राघवाश्रयसत्कथा:॥९३॥
वानर हर्षित मने आश्रयस्थान राघवा।
मानून करती त्याची गुणगौरव सत्कथा॥९३॥

तदसुकरमथाभिचीक्ष्य हृष्टा: प्रियसुहृदो युधि लक्ष्मणस्य कर्म।
परममुपलभन्नन: प्रहर्षं विनिहतमिन्द्ररिपु नि:शम्य देवा:॥९४॥
दुष्कर कृत्य पाहूनि लक्ष्मणाचे युद्धात हर्षित प्रिय सुहृद त्याचे।
इन्द्रजित इन्द्राचा शत्रु मारला जाइ ऐकोनि देवहि परमहर्षित॥९४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे नवतितम: सर्ग:॥९०॥

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.


श्याम कुलकर्णी
तुझी माझी गोष्टी

हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी बारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION


महाकविकालिदासविरचित
मेघदूत
श्याम
कुलकर्णी

श्याम
कुलकर्णी

तिची सतार


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय पुढील भाग

www.esahity.com

9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव Whatsapp करा)